CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

धाराशिव | बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २६६ । पाने १२ । किंमत रु. ६/ ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विचारपुष्प

निर्भांडवल, श्रम आणि उपभोग या त्रयींमध्ये संघर्ष नव्हे, समन्वय आहे. समजा कारखानदार आणि कामगार परस्पर विश्वस्त (न्यासी) बनले आणि दोघेही ग्राहकांचे विश्वस्त बनले तर उत्पादन वाढेल, सोबतच देशाच्या प्रगतीचा मार्गसुद्धा प्रशस्त करतील आणि स्वदेशीचा विचार याच मार्गाचा पुरस्कार करतो.

- बिंदुमाधव जोशी
संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत

महत्त्वाचे

सलग तिसऱ्या दिवशी बाजार गडगडला

मुंबई : मंगळवारी सलग तिसऱ्या सत्रात भारतीय शेअर बाजार मंदीच्या सावटाखाली राहिले. बाजारात कामकाजाची सुरुवात सकारात्मक राहिली तरी, दुपारनंतर जोरदार विक्री झाल्याने निर्देशांक आणि निफ्टी खाली आले. यामुळे गुंतवणूकदारांना मोठा फटका बसला. मुंबई बाजारातील निर्देशांक ३१४ अंकांनी घसरून ८४,५६८ वर बंद झाला तर निफ्टी ७४ अंकांनी कोसळून २५८८५ वर स्थिरावला. जोरदार विक्रीमुळे सोमवारच्या तुलनेत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ३३ हजार कोटी रुपयांची घट झाली. दिवसभरातील कारभारात सर्वाधिक फटका बँक क्षेत्राला बसला. धातू, औषध कंपन्या, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि रिअॅल्टी शेअर्समध्येही मोठी घसरण झाली. ■

भारत कमी करणार रशियन तेलाची आयात

नवी दिल्ली : भारताची रशियन तेलाची आयात डिसेंबरमध्ये तीन वर्षांच्या नीचांकी पातळीवर येऊ शकते. सध्या भारत रशियाकडून दररोज सुमारे १८ लाख बॅरल कच्चे तेल खरेदी करत आहे. डिसेंबरमध्ये हे ६ ते ६.५ लाख बॅरल राहण्याचा अंदाज आहे. भारतीय रिफायनरी कंपन्यांनी अमेरिकन, युरोपीय आणि ब्रिटिश निर्बंधांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी रशियन कच्च्या तेलाच्या खरेदीत वेगाने कपात करण्यास सुरुवात केली आहे. रिफायनर्स आता रशियन तेलासाठी पर्यायी स्रोत शोधत आहेत. रशियाकडून तेल न खरेदी करण्याचे मुख्य कारण म्हणजे अमेरिका आणि युरोपीय युनियनने रशियावर लादलेले ताजे निर्बंध आहे. ■

अयोध्येत ‘स्वप्नपूर्ती’चे धर्मध्वजारोहण

● पंतप्रधान मोदी, सरसंघचालकांच्या हस्ते भगवा फडकला
● मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याने आनंदले रामभक्त

◆ अयोध्या, २५ नोव्हेंबर

अयोध्येत रामललाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर ६०० पेक्षा अधिक दिवसांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते श्रीराम मंदिराच्या शिखरावर धर्मध्वजारोहण करण्यात आले. सकाळी ११:५० वाजता, अभिजित मुहूर्ताच्या वेळी, बटण दाबताच १६१ फूट उंच शिखरावर दोन किलो वजनाचा भगवा ध्वज फडकला. यासोबतच राममंदिराचे काम पूर्ण झाले. यादरम्यान, पंतप्रधान मोदी भावुक झाले. त्यांनी हात जोडून धर्मध्वजाला प्रणाम केला. ◀(वृत्तसंस्था)

बलिदान देणाऱ्यांचा आत्मा सुखावला : सरसंघचालक

या दिवसासाठी अनेक रामभक्तांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. त्या सर्वांचा आत्मा आज सुखावला आहे, अशा शब्दांत सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

सरसंघचालक म्हणाले, कित्येक लोकांनी स्वप्न पाहिले, कित्येक लोकांनी प्रयत्न केले. कित्येकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली; आज त्यांच्या आत्म्याला समाधान मिळाले असेल. आज अशोकजींना खरोखर शांती मिळाली असेल. त्यांनी आपले प्राण अर्पण केले आणि अनेकांनी घाम गाळला. अनेकांनी बलिदान दिले, पण जे मागे राहिले त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत. आज राममंदिर बांधण्याची शास्त्रीय प्रक्रिया पूर्ण झाली. ध्वज फडकवण्यात आला. आम्ही ते आमच्या डोळ्यांनी पाहिले याचा मला अभिमान आहे.

हा धर्मध्वज आहे, त्याचा भगवा रंग आहे. या धर्मध्वजात रघुकुलाचे प्रतीक असलेले कोविदार वृक्ष आहे. कोविदार वृक्ष हे दोन पवित्र वृक्षांच्या गुणांचे मिश्रण आहे. आपल्याला धर्मध्वज शिखरावर उंचावयाचा आहे. आजचा दिवस आपल्या संकल्पाची पूर्ती करण्याचा आहे. आपल्याला शांती देणारा आणि सर्वांना समृद्धी देणारा भारत निर्माण करायचा आहे. ■

जखमा भरून निघाल्या : पंतप्रधान

आज संपूर्ण भारत आणि संपूर्ण जग रामाने भरलेले आहे. रामभक्तांच्या हृदयात अतुलनीय समाधान आहे. अपार, अलौकिक आनंद आहे. शतकांच्या जखमा बऱ्या होत आहेत, शतकांच्या वेदना अखेर शांत होत आहेत. शतकानुशतकांचे संकल्प पूर्ण होत आहेत. आज त्या यज्ञाचा अंतिम अर्पण आहे, ज्याची आग ५०० वर्षे जळत होती. एक यज्ञ जो कधीही श्रद्धेत डगमगला नाही, असे भावोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धर्मध्वजारोहण प्रसंगी काढले.

पंतप्रधानांनी आपल्या भाषणाची सुरुवात ‘जय सीयावर रामचंद्र, जय सीयावर रामचंद्र, जय सीयाराम’ अशा घोषणेने केली. पंतप्रधान म्हणाले, हा धर्मध्वज केवळ एक ध्वज नाही; तो भारतीय संस्कृतीच्या पुनर्जागरणाचे प्रतीक आहे. त्याचा भगवा रंग, त्यावर कोरलेल्या सूर्यवंशाची कीर्ती, कोविदार वृक्ष आणि सूर्य हे रामराज्याचे प्रतीक आहेत. हा ध्वज एक संकल्प आहे, एक यश आहे, संघर्षातून निर्माण होण्याची गाथा आहे, शतकानुशतके चालणाऱ्या संघर्षाचे मूर्त स्वरूप आहे, संतांच्या आध्यात्मिक साधना आणि समाजाच्या सहभागाचा अर्थपूर्ण पराकाष्ठा आहे. येणाऱ्या शतकानुशतके हा ध्वज भगवान रामाच्या आदर्शांचा उद्घोष करेल.

पंतप्रधान मोदी म्हणाले, हा ध्वज ‘सत्यमेव जयते’ या घोषणेचे प्रतीक असेल, म्हणजेच विजय सत्याचा आहे, असत्याचा नाही. ■

मेळघाटात जाऊन प्रत्यक्ष आढावा घ्या

उच्च न्यायालयाकडून प्रशासनाची कानउघाडणी

कुपोषणाची टक्केवारी कमी झाल्याचा अभिमान बाळगू नका

◆ मुंबई, २५ नोव्हेंबर

शासनाच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी अमरावती जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त मेळघाटात जावे आणि तेथील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेवून अहवाल सादर करावा. कागदावर सगळे चांगले आणि योग्य पद्धतीने सुरू असल्याचे राज्य सरकार नेहमीच भासवते. प्रत्यक्षात परिस्थिती गंभीर आणि वेगळीच असते. कुपोषणाची टक्केवारी कमी झाल्याचा अभिमान बाळण्याचे कारण नाही, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाची कानउघाडणी केली.

पाच वर्षात ८४ हजार ३०४ बाल मृत्यू झाल्याचे माहितीच्या अधिकारातून उघडकीस आल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते बंड्या साने यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. मेळघाटातील कुपोषणाच्या समस्येची दखल घेत न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने मंगळवारी सुनावणी घेतली. मेळघाटातील बालमृत्यू आणि मातामृत्यूच्या वाढत्या घटना अतिशय चिंताजनक आहे. मृत्यूची टक्केवारी घटल्याचा अभिमान बाळगणे लाजीरवाणा प्रकार आहे. कोट्यवधींचा खर्च करीत असल्याचे सरकार सांगते, मग वर्षानुवर्षांपासून या भागात कुपोषणामुळे सातत्याने मृत्यू होतात कसे, या समस्येचे संपूर्ण उच्चाटन व्हायला हवे. शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मेळघाटमध्ये जावे आणि तेथील प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करावा, असे न्यायालयाने म्हटले.

> **...तर आम्ही मेळघाटात जाणार**
>
> शासनाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मेळघाटात जाताना याचिकाकर्त्यांनाही सोबत न्यावे आणि १५ दिवसांत तेथे उपलब्ध असलेल्या सुविधांच्या माहितीचा अहवाल सादर करावा. अहवालावर समाधान झाले नाही, तर आम्ही स्वतः जावून आढावा घेऊ अशी तंबी खंडपीठाने प्रशासनाला दिली. ■

यावर युक्तिवाद करताना सरकारी वकील भूपेश सामंत यांनी सांगितले की, मेळघाटात जुलै महिन्यात १२ बालकांचा मृत्यू झाला, त्यापैकी तीन जण कॉलराने दगावले. त्यांच्या कुटुंबीयांना भरपाई देण्यात आली. तसेच २०११ मध्ये कुपोषण हे जवळपास ४१ टक्क्यांवर होते आणि आता हा दर १४.७ टक्क्यांवर आला.

पायाभूत सुविधा उपलब्ध करा

आदिवासी भागात पायाभूत, मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करा, वैद्यकीय रिक्त पदे भरा, तज्ज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्या, डॉक्टर, परिचारिका यांच्या राहण्याची सोय, नवीन रुग्णालयाची निर्मिती आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे वेळेवर वेतन देण्याचा आदेश खंडपीठाने दिला. ◀(वृत्तसंस्था)

स्थानिक निवडणुकीवर शुक्रवारी अंतरिम निर्णय

आरक्षणावरील सुनावणी पुढे ढकलली

◆ नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्या प्रकरणी दाखल याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने शासनाकडे यासंदर्भात सविस्तर माहिती मागविली. या मुद्यावर शुक्रवारी अंतरिम निर्णय घेणार असल्याचे न्यायासनाने मंगळवारी नमूद केले.

याचिकाकर्ते विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेत काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचा दावा केला. यापूर्वीच्या सुनावणीत न्यायासनाने बांठिया आयोगाच्या अहवालाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यासनासमोर मंगळवारी झालेल्या सुनावणीत राज्य सरकारला ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली का, असा प्रश्न विचारला आणि यासंदर्भात माहिती सादर करण्याचा आदेश दिला. ◀(वृत्तसंस्था)

वंदना गुप्ते यांना रंगकर्मी जीवनगौरव

मुंबई : मराठी नाट्य कलाकार संघातर्फे दिला जाणारा रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ अभिनेत्री वंदना गुप्ते यांना जाहीर झाला आहे. जागतिक रंगकर्मी दिवसाचे औचित्य साधून या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. व्यावसायिक रंगभूमीवर काम करणाऱ्या रंगकर्मींचा हक्काचा एक दिवस असावा आणि त्या निमित्ताने रंगकर्मींच्या कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने मराठी नाट्य कलाकार संघातर्फे दरवर्षी जागतिक रंगकर्मी दिवस साजरा करण्यात येतो.

आयसीसीने टी-२० विश्वचषक २०२६ चे वेळापत्रक जाहीर

भारत-पाक सामना १५ फेब्रुवारीला

नवी दिल्ली, दि.२५ नोव्हेंबर-

आयसीसीने टी-२० विश्वचषक २०२६ चे वेळापत्रक जाहीर केले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील गट फेरीचा (ग्रुप स्टेज) सामना १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये होईल. ही स्पर्धा भारत आणि श्रीलंकेतील ७ शहरांमधील ८ ठिकाणी (वेन्यू) खेळवली जाईल. २९ दिवसांत ५५ सामने होतील. भारताचे विश्वचषक विजेते कर्णधार रोहित शर्मा यांना स्पर्धेचे ब्रँड अॅम्बेसेडर बनवण्यात आले आहे.

मुंबईत आयसीसीचा समारंभ झाला, जिथे समितीने सांगितले की, उद्घाटनाचा सामना ७ फेब्रुवारी रोजी पाकिस्तान आणि नेदरलँड्स यांच्यात होईल. गट फेरीत (ग्रुप स्टेज) दररोज ३ सामने खेळले जातील. अंतिम सामना अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होईल. जर पाकिस्तानने नॉकआउट फेरीत प्रवेश केला, तर सामने श्रीलंकेत होतील. या स्पर्धेत २० संघ आहेत, ज्यांना ४ वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले आहे. गट स्टेजमध्ये एकूण २० संघ सामील आहेत, ज्यांना ४ वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले गेले आहे. प्रत्येक संघ आपल्या गटात ४ लीग सामने खेळेल. लीग स्टेज नंतर प्रत्येक गटातून २-२ अव्वल संघांना सुपर-८ स्टेजमध्ये प्रवेश मिळेल. सुपर-८ मध्येही संघांना 'द आणि ध' गटांमध्ये विभागले जाईल. येथेही २-२ अव्वल संघांना उपांत्य फेरीत प्रवेश मिळेल. जो जिंकणारा संघ असेल तो ८ मार्च रोजी अहमदाबादमध्ये अंतिम सामना खेळेल. ग्रुप-सी मधील बांगलादेश आणि ग्रुप-डी मधील अफगाणिस्तानचा गट सर्वात कठीण दिसत आहे. कारण यात इंग्लंड, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांचा समावेश आहे. चारही संघांना अंतिम सामना खेळण्याचा अनुभव आहे, तर बांगलादेश आणि अफगाणिस्तान कधीही कोणत्याही विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचू शकले नाहीत.

भारत-पाकिस्तान सामना कोलंबोमध्ये का होत आहे?

चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी बीसीसीआय आणि पीसीबी यांच्यात अशी सहमती झाली होती की भविष्यात दोन्ही संघ एकमेकांच्या देशांना भेट देणार नाहीत. तसेच मल्टिनेशन स्पर्धेतील सामने तटस्थ ठिकाणी खेळतील. याच वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत-पाकिस्तान सामना दुबईमध्ये झाला होता. म्हणून विश्वचषक सामना कोलंबोमध्ये खेळवला जाईल.भारतात अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम, नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियम, कोलकातामधील ईडन गार्डन्स स्टेडियम, चेन्नईतील चेपॉक स्टेडियम आणि मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये स्पर्धेचे सामने खेळले जातील. तर श्रीलंकेत कोलंबो आणि कँडीमध्ये सामने होतील. कोलंबोमध्ये आर प्रेमदासा आणि सिंहलीज स्पोर्ट्स क्लब स्टेडियमवर सामने खेळले जातील. टीम इंडिया मुंबई, दिल्ली, कोलंबो आणि अहमदाबादमध्ये गट फेरीचे सामने खेळेल.

इटलीने पहिल्यांदाच पात्रता मिळवली

युरोपीय देश इटलीने पहिल्यांदाच टी-२० विश्वचषकात स्थान मिळवले. यजमान देशांव्यतिरिक्त, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आणि वेस्ट इंडीजने विश्वचषकाच्या सुपर-८ टप्प्यात पोहोचल्यामुळे पात्रता मिळवली.

२० फेब्रुवारीपर्यंत ग्रुप स्टेज

ग्रुप स्टेजमध्ये ७ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारीपर्यंत दररोज ३ सामने खेळले जातील. २० फेब्रुवारी रोजी ऑस्ट्रेलिया आणि ओमान यांच्यात एकच सामना होईल. पहिल्या फेरीत ४० सामने होणार आहेत. २१ फेब्रुवारीपासून सुपर-८ फेरी सुरू होईल, ज्यात १२ सामने असतील. येथे २२ फेब्रुवारी, २६ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी प्रत्येकी २ सामने असतील. तर इतर दिवशी एकच सामना होईल. सामने सुरू होण्याची वेळ सकाळी ११.00, दुपारी ३.00 आणि संध्याकाळी ७ वाजता असेल. ४ मार्च रोजी कोलकाता येथे पहिली उपांत्य फेरी होईल, जर पाकिस्तानने प्रवेश केला, तर सामना कोलंबोमध्ये होईल. ५ मार्च रोजी मुंबईत दुसरी उपांत्य फेरी होईल. ८ मार्च रोजी अहमदाबादमध्ये अंतिम सामना होईल, पाकिस्तान पोहोचला, तर हा सामना देखील कोलंबोमध्ये खेळला जाईल.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

पाकिस्तानचा अफगाणवर हवाई हल्ला; १२ ठार

सीमेवर तणाव वाढला ● तालिबानने दिला प्रत्युत्तराचा इशारा

◆ **काबुल, २५ नोव्हेंबर**

पाकिस्तानी वायुदलाने सोमवारी मध्यरात्रीनंतर पूर्व अफगाणिस्तानातील तीन प्रांतांमध्ये जोरदार हवाई हल्ले केले. त्यात १२ नागरिक ठार झाले, तर १५ जण गंभीर आहे. दोन्ही देशांत शांतता चर्चा फिस्कटल्यानंतर पाकिस्तानचा अफगाणवर केलेला हा पहिलाच हल्ला आहे. या हल्ल्यामुळे दोन्ही देशांच्या सीमेवर तणाव वाढला असून, लष्कराची अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली. तालिबानने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे.

तालिबानी सरकारचे मुख्य प्रवक्ते जबीउल्लाह मुजाहिद यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा देत म्हटले की, खोस्त, कुणार आणि पक्तिया प्रांतात पाकिस्तानच्या वायुदलाने निवासी इमारतींना लक्ष्य केले. त्यात खोस्त प्रांतातील गोरबुझ जिल्ह्यातील मुगलगेई भागात नऊ मुलांचा मृत्यू झाला, तर इतर भागांत झालेल्या हल्ल्यात चार नागरिक ठार झाले. वायुदलाने लढाऊ विमानातून बॉम्बचा मारा केला. बचाव पथकाने ढिगाऱ्यातून एकूण १२ मृतदेह बाहेर काढले, तर १५ जखमी नागरिकांना रुग्णालयात हलविले. या भागात अजूनही शोधमोहीम सुरू असून, मृतकांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. अफगाणच्या हद्दीत करण्यात आलेला हल्ला आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन असून, याला जोरदार प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहे.

पाकिस्तानात विध्वंस घडविल्याशिवाय आम्ही राहणार नाही. देशाच्या सुरक्षेसाठी सीमेवर लष्कराची अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली.

पेशावर हल्ल्याचा बदला घेतला

अफगाणिस्तानातील हल्ल्यावर पाकिस्तानी लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, आम्ही तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान अर्थात् टीटीपीच्या अड्ड्यांना लक्ष्य करून बॉम्बचा मारा केला आणि सोमवारी पेशावरमध्ये झालेल्या हल्ल्याचा बदला घेतला. अफगाणच्या निवासी भागांवर कोणताही हल्ला करण्यात आलेला नाही. टीटीपीवरील आमचे हल्ले सुरूच राहणार असून, तालिबानी फौजांनी प्रत्युत्तर दिल्यास त्यांना किंमत चुकवावी लागेल. ■

तुर्कीचे शिष्टमंडळ काबुलच्या दौऱ्यावर

सध्या दोन्ही देशांमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने तुर्कीचे एक शिष्टमंडळ काबुलच्या दौऱ्यावर आहे आणि त्यानंतर ते पाकिस्तानला जाणार आहे. अशातच पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यामुळे दोन्ही देशांतील युद्धबंदीच्या चर्चेला गालबोट लागले आहे. ◂(वृत्तसंस्था)

युद्धाचा धोका वाढला : झल्मय खलीलझाद

अफगाणिस्तानातील अमेरिकेचे राजदूत झल्मय खलीलझाद म्हणाले, नागरिकांना मारणे आणि युद्धाचा धोका पत्करणे हा पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील समस्यांवर उपाय नाही. संयम आणि राजनैतिक कूटनीतीने समाधान काढण्याला प्राधान्य द्यावे. पाकिस्तानचे हल्ले या भागात अशांतता निर्माण करू शकते. ■

भंडाऱ्यात रुग्णाची उडी घेत आत्महत्या

व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल

◆ **भंडारा, २५ नोव्हेंबर**

भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी भरती असलेला रुग्ण अखिलेश मरसकोल्हे याने २५ नोव्हेंबरला रुग्णालयाच्या छतावरून उडी घेत आत्महत्या केली. त्याने आत्महत्या केली अथवा घातपात घडला, याबाबत चर्चांना पेव फुटले आहे.

उजवा हात आगीत होरपळल्याने उपचारासाठी मध्यप्रदेशातील तिरोडी येथील अखिलेश मरसकोल्हे दोन दिवसांपूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वॉर्ड क्रमांक १८ मध्ये दाखल झाला होता. आई कुठे गेली असे ओरडत अचानक तो मंगळवारी सकाळी तिसऱ्या मजल्यावरून सैरभर पळू लागला.

परिचारिकांनी अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो छताच्या दिशेने पळाला. रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या सुरक्षा रक्षकांना दाद न देता दार तोडून तो छतावर चढल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

छताची सुरक्षा भिंत ओलांडून पुढे गेल्याने को पाय घसरून पडल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. छतावरून कोसळल्यावर काही वेळातच त्याचा मृत्यू झाला. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला. ◂(तभा वृत्तसेवा)

उपचारासाठी दाखल झालेला हा रुग्णाला मनोविकार होता, असे जाणवते. आईच्या शोधात वॉर्डात आणि इतरत्र पळत सुटला. त्याला परिचारिका आणि सुरक्षा रक्षकांनी अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, न जुमानता दार तोडून छतावर चढला आणि अपघात झाला असावा.

- डॉ. अतुल टेंभुर्णे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक

युक्रेनच्या राजधानीत रशियाचा विध्वंस

८ ठार, २२ जखमी ● ट्रम्प यांचा शांतता प्रस्ताव धुडकावला

◆ **कीव्ह, २५ नोव्हेंबर**

रशिया-युक्रेन संघर्ष संपवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सादर केलेला २८ कलमी शांतता करार धुडकावत मंगळवारी पहाटे रशियाने युक्रेनची राजधानी कीव्हवर ड्रोन आणि क्षेपणास्त्राचा मारा करीत मोठा विध्वंस घडवून आणला. या हल्ल्यात आठ नागरिकांचा मृत्यू झाला असून, २२ जण जखमी आहेत. निवासी इमारती आणि ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करीत हे हल्ले करण्यात आले. सध्या शहरातील वीज व पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

कीव्हचे महापौर व्हिटाली क्लिचको यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की, रशियाच्या वायुदलाने कीव्ह शहरासह पेचेर्स्क आणि डनिप्रो प्रदेशात निवासी इमारतींना लक्ष्य करीत ड्रोन व क्षेपणास्त्राचा मारा केला. हल्ल्यांमध्ये निवासी इमारती आणि ऊर्जा पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. बचाव पथकाने इमारतीच्या ढिगाऱ्यातून आठ नागरिकांचे मृतदेह बाहेर काढले, तर २२ जखमींना रुग्णालयात हलवले. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी हल्ल्याची पुष्टी केली आणि म्हटले की, रशियाची आक्रमकता वाढतच असून, त्यांनी पुन्हा निष्पाप नागरिकांवर हल्ले चढविले. आम्ही याचा निषेध करतो, अशा परिस्थितीत शांतता चर्चा करणे कठीण आहे. युक्रेनचे सैन्य हल्ल्याला प्रत्युत्तर देईल.

रशियन संरक्षण मंत्रालयाने म्हटले की, युक्रेनच्या लष्कराने आमच्या क्षेत्रात हल्ले केले, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी कीव्ह शहराला लक्ष्य करण्यात आले. हवाई संरक्षण प्रणालींनी २४९ युक्रेनियन ड्रोन पाडले.

हल्ल्यांमुळे शांतता चर्चेवर प्रश्नचिन्ह

जीनेव्हा येथे अमेरिका आणि युक्रेनच्या प्रतिनिधींमध्ये प्रस्तावित शांतता योजनेवर चर्चा झाली. युक्रेनचे प्रतिनिधी अलेक्झांडर बेव्हझ यांनी चर्चेला दुजोरा देत म्हटले की, युद्धबंदीसाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या २८ कलमी करारावर आम्ही समाधानी आहे. बहुतांश मुद्द्यांवर आमची सहमती आहे, परंतु रशियाच्या हल्ल्यामुळे शांतता चर्चा अडचणीत येऊ शकते. तथापि, क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह म्हणाले की त्यांना या चर्चेसंदर्भात कुठलीही माहिती नाही.

अबू धाबीमध्ये रशियन अधिकाऱ्यांशी चर्चा

मंगळवारी अमेरिकन लष्कर सचिव डॅन ड्रिस्कोल यांनी अबू धाबीमध्ये रशियन अधिकाऱ्यांशी भेट घेतली आणि ट्रम्प यांच्या शांतता प्रस्तावावर चर्चा केली. ड्रिस्कॉल चर्चेच्या नवीन फेरीचे नेतृत्व करीत आहेत. त्यांनी म्हटले की सर्व पक्ष शक्य तितक्या लवकर युद्ध संपवण्यासाठी कराराकडे पुढे जाऊ इच्छितात आणि आमचे प्रयत्न त्याच दिशेने सुरू आहे. ◂(वृत्तसंस्था)

महत्त्वाचे

प्रणाली लोथे एमपीएससी परीक्षेत राज्यातून पाचवी

रिसोड : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षेत प्रणाली लोथे यांनी राज्यात पाचव्या क्रमांकासह घवघवीत यश मिळविले आहे. राज्यसेवा मुख्य परीक्षा-२०२४ च्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात रिसोड येथील औषध व्यापारी आणि योगेश मेडिकलचे संचालक अरुण लोथे यांची धाकटी सून प्रणाली अभिषेक लोथे (कुळकर्णी) यांनी दैदीप्यमान यश संपादन केले आहे. प्रणालीने या परीक्षेत खुल्या प्रवर्गातील महिलांमधून राज्यात पाचवा क्रमांक मिळविला आहे. या यशामुळे सर्वत्र प्रणालीचे कौतुक होत आहे. ■

छत्तीसगडमध्ये मुख्याध्यापक भटक्या कुत्र्यांवर लक्ष ठेवणार

रायपूर : छत्तीसगडमध्ये आता शाळांच्या आसपास भटक्या कुत्र्यांवर लक्ष ठेवण्याचे काम शाळेचे मुख्याध्यापक करतील. राज्य शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा निर्देश जारी केला आहे. आता शाळेच्या आत किंवा आसपासच्या कुत्र्यांवर लक्ष ठेवण्याची आणि त्यांची माहिती देण्याची जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकांवर असेल. विभागाने सांगितले की, हे मार्गदर्शक तत्त्वे नुकत्याच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यासाठी जारी करण्यात आले आहेत. सर्व शाळांना तत्काळ सुरक्षा उपाय लागू करण्याचे निर्देश देण्यात आला आहे. प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांना किंवा संस्था प्रमुखांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, जे शाळेच्या आवारात किंवा आसपासच्या भटक्या कुत्र्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांची माहिती देण्यासाठी जबाबदार असतील.

पतीला ड्रममध्ये पुरणाऱ्या मुस्कानने दिला मुलीला जन्म

मेरठ : पतीची हत्या करून मृतदेह निळ्या ड्रममध्ये सिमेंट टाकून पुरणाऱ्या आरोपी पत्नी मुस्कान रस्तोगीने मुलीला जन्म दिला आहे. डॉक्टरांनी २४ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६.५० वाजता नॉर्मल डिलिव्हरी केली. विशेष म्हणजे, मुस्कान ज्या पती सौरभच्या हत्येप्रकरणी तुरुंगात आहे, त्याचा जन्मही २४ नोव्हेंबर रोजीच झाला होता. ही मुस्कानची दुसरी मुलगी आहे. मोठी मुलगी पीहू तिच्या आजोबा-आजीसोबत राहते. २३ नोव्हेंबरच्या रात्री मुस्कानची तुरुंगातील डॉक्टरांनी तपासणी केली. नंतर अल्ट्रासाउंडसाठी तिला मेडिकल कॉलेजमध्ये पाठवण्यात आले. मुस्कानच्या बाळाचे वजन अडीच किलो आहे. ज्यावेळी पोलिसांनी तिला अटक केली, त्यावेळी मुस्कान दीड महिन्यांची गर्भवती होती.

आयुर्वेदिक दुकानात अभियंत्याची ४८ लाखांची फसवणूक

बंगळुरू : येथे एका २९ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनिअरची आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली ४८ लाखांची फसवणूक करण्यात आली. फसवणूक झालेल्याने २२ नोव्हेंबर रोजी ज्ञानभारती पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केल्यानंतर हे प्रकरण समोर आले आहे. पीडिताने आपल्या तक्रारीत सांगितले की, त्याला लैंगिक आरोग्याशी संबंधित समस्या होती. यावर उपचार घेण्यासाठी तो रस्त्याच्या कडेला असलेल्या एका आयुर्वेदिक तंबूत उपचारासाठी गेला होता. तेथे त्याला विजय गुरुजी नावाचा एक बोगस डॉक्टर भेटला. त्याच्या सांगण्यावरून इंजिनिअरने २० लाखांना १८ ग्रॅम औषधी वनस्पती, १७ लाखांना तेल यासह अनेक उत्पादने खरेदी केली होती. मात्र, सर्व औषधे घेऊनही त्याला काहीच फरक पडला नाही. ■

शेअर बाजार

सेन्सेक्स	८४,५८७.०१ (-३१३.७०)
निफ्टी	२५,८८४.८० (-७४.७०)



सराफा

सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम)	रु. १,२५,३००
चांदी (प्रतिकिलो)	रु. १,५७,७००

तापमान

	कमाल	किमान
सोलापूर	३३.0	१९.0
अमरावती	३२.२	१६.१
भंडारा	२९.०	१३.०
बुलडाणा	३१.८	१८.८
चंद्रपूर	३१.२	१६.६
गडचिरोली	३१.४	१५.४
गोंदिया	२९.६	१६.४
नागपूर	३०.४	१७.२
वर्धा	३१.०	१६.०
वाशीम	३३.०	१४.६
यवतमाळ	३२.०	१९.६

गुलामगिरीच्या मानसिकतेतून भारताला मुक्त करू : पंतप्रधान

◆ **अयोध्या, २५ नोव्हेंबर**

१९० वर्षांपूर्वी १८३५ मध्ये लॉर्ड मॅकॉलेने मानसिक गुलामगिरीचा पाया घातला. दहा वर्षांनंतर २०३५ मध्ये त्या अपवित्र घटनेला दोनशे वर्ष पूर्ण होतील. पुढील दहा वर्षांत आपण भारताला गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त करू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

मॅकॉले यांच्या दृष्टिकोनाचा परिणाम व्यापक झाला. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, पण आपण न्यूनगंडातून मुक्त झालो नाही. आपण असा विचार विकसित केला की परदेशातील गोष्टी चांगल्या आहेत, आपल्या गोष्टी वाईट आहेत. ही गुलामगिरीची मानसिकता आहे. आपण परदेशी देशांकडून लोकशाही उधार घेतली आहे आणि आपले संविधान देखील परदेशी देशांपासून प्रेरित आहे. तर वास्तव असे आहे की भारत लोकशाहीची जननी आहे.

नौदलाचा ध्वज आता अशा प्रतीकांनी सजवला जात आहे ज्यांचा आपल्या वारशाशी काहीही संबंध नाही. आम्ही गुलामगिरीचे प्रतीक काढून टाकले आहे. आम्ही छत्रपती महाराजांचा वारसा उंचावला आहे. ही रचना नव्हती, तर मानसिकतेत बदल घडवण्याचा क्षण होता. भारताची व्याख्या त्याच्या ताकदीने आणि प्रतीकांनी होईल, दुसऱ्याच्या वारशाने नाही. हा बदल आज अयोध्येत स्पष्ट दिसतो, असेही पंतप्रधान म्हणाले.

धर्मध्वज सत्य हे ब्रह्मचे मूर्त स्वरूप आहे याचे प्रतीक असेल. धर्म सत्यावर आधारित आहे. हा ध्वज आपल्याला आपले जीवन बलिदान देण्यास प्रेरित करेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. जे काही कारणास्तव मंदिरात जाऊ शकत नाहीत, परंतु फक्त मंदिराच्या ध्वजाला दुरूनच वंदन करतात आणि तेच पुण्य प्राप्त करतात. हा ध्वज मंदिराच्या उद्देशाचे देखील प्रतीक आहे; तो दूरवरून रामलल्लाच्या जन्मस्थानाची झलक देईल.

तो युगानुयुगे सर्व मानवजातीला रामाचे आदर्श पसरवेल. या प्रसंगी मी जगभरातील रामभक्तांना शुभेच्छा देतो आणि भक्तांचे तसेच योगदान देणाऱ्या उदार देणगीदारांचे आभार मानतो. बांधकामात सहभागी असलेल्या सर्व कामगारांचे, कारागिरांचे आणि वास्तुविशारदांचेही अभिनंदन करतो.

तत्पूर्वी, राममंदिरात, पंतप्रधान मोदींनी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्यासमवेत पहिल्या मजल्यावरील राम दरबारात पहिल्यांदाच पूजा आणि आरती केली. त्यांनी रामलल्लाचे दर्शन घेतले. पंतप्रधान रामलल्लासाठी वस्त्र घेऊन आले होते. त्यांनी सप्तर्षींचे दर्शन घेतले, भगवान शेषावतार आणि लक्ष्मणाची पूजा केली. यापूर्वी मोदींनी साकेत कॉलेजपासून रामजन्मभूमीपर्यंत सुमारे दीड किलोमीटर लांबीचा रोड शो केला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी ताफ्यावर फुले उधळली आणि जागोजागी महिलांनी आरती ओवाळून त्यांचे स्वागत केले.

ध्वजारोहण समारंभासाठी अमिताभ बच्चन, अंबानी यांच्यासह अनेक सेलिब्रिटींना निमंत्रण पाठवण्यात आले होते. राममंदिर परिसरात देशभरातील मठांचे संत उपस्थित होते. या विशेष प्रसंगाचे औचित्य साधून संपूर्ण अयोध्या शहर हजार क्विंटल फुलांनी सजवण्यात आले. मंदिर परिसरात पाच-स्तरीय सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली होती. एटीएस-एनएसजी कमांडोनी संपूर्ण परिसर वेढल्याचे चित्र होते. याशिवाय, एसपीजी, सीआरपीएफ आणि पीएसीचे जवानही तैनात होते. यापूर्वी सकाळी रामलल्लाची आरती करण्यात आली. या विशेष आयोजनासाठी रामलल्लांना सोने आणि रेशीम धाग्यांनी बनवलेले खास वस्त्र परिधान करण्यात होते. ◂(वृत्तसंस्था)

रामराज्याचा ध्वज उंचावला : सरसंघचालक

अयोध्येत एकेकाळी फडकणारा आणि संपूर्ण जगाला आपल्या प्रकाशाने समृद्धी देणारा रामराज्याचा ध्वज आज आपल्या डोळ्यांनी हळूहळू उंचावताना दिसत आहे. सात घोडे रथ ओढतात आणि लगाम त्यांच्यावर नियंत्रण ठेवते. दोरी किंवा सारथीशिवाय असे वाहन पुढे जाऊ शकत नाही. परंतु, सूर्य देव दररोज पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रवास करतात, कारण सिद्धी चांगुलपणाद्वारे प्राप्त होते. हिंदू समाजाने साडेपाच शतकांपासून आपले चांगुलपणा सिद्ध केले आहे. राममंदिर बांधले गेले आहे आणि रामललाचे आगमन झाले आहे, असेही सरसंघचालक म्हणाले. हे राम मंदिर काही लोकांनी स्वप्नात पाहिले होते. आज तसे मंदिर 'याचि देही याचि डोळा' पाहायला मिळणे ही अतिशय भाग्याची गोष्ट आहे. ■

पाक लष्कराची कारवाई, २२ टीटीपी सदस्य ठार

क्वेट्टा : पाकिस्तानी सुरक्षा दलांनी खैबर पख्तुनख्वामध्ये मंगळवारी पहाटे केलेल्या कारवाईत तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान अर्थात् टीटीपीचे २२ सदस्य ठार झाले. पेशावरमध्ये झालेल्या आत्मघाती हल्ल्यानंतर अफगाणिस्तानच्या सीमेजवळील भागात व्यापक शोधमोहीम राबवण्यात येत आहे. पाकिस्तानी लष्कराने निवेदनात म्हटले की, खैबर पख्तुनख्वा प्रांतातील वझिरीस्तानच्या सीमेजवळीस बन्नू जिल्ह्यात टीटीपीचे दहशतवादी लपले असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर या भागात अतिरिक्त सुरक्षा दलाचे पथक रवाना करण्यात आले. यावेळी दोन्ही बाजूने झालेल्या गोळीबारात टीटीपीच्या २२ सदस्यांना ठार करण्यात यश आले. ■

देशाच्या आर्थिक राजधानीत ११ लाख दुबार मतदार

महापालिकेकडून कबुली

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ नोव्हेंबर:

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला असताना देशाच्या आर्थिक राजधानीतील एक धक्कादायक बाब समोर आली आहे. मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यात तब्बल ११ लाखावर मतदारांची दुबार नावे असल्याचे दस्तरखुद्द महापालिकेकडून मंगळवारी जाहीर करण्यात आले आहे.

महापालिकेच्या २२७ वार्डामध्ये हे मतदार विभागलेले असून त्यावरून विरोधकांनी राज्य निवडणूक आयोगावर टीकेची झोड उठवली आहे. दुबार नोंदणी झालेली नावे तातडीने काढून टाकण्याची मागणी त्यांच्यातून होत आहे. मुंबई महापालिका ताब्यात घेण्यासाठी सत्ताधारी महायुतीतील भाजपा आणि शिवसेना पूर्ण तयारीनिशी उतरली आहे. तर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सेना व मनसे एकत्रितपणे त्यांना सामना देणार आहेत. तर काँग्रेस मुंबईत त्याला स्वतंत्रपणे सामोरे जाणार असे सद्याचे चित्र आहे, त्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी २0 नोव्हेंबरला जाहीर करण्यात आली आहे. त्याम ध्ये तब्बल ११ लाखावर दुबार मतदार असून अनेक वार्डामध्ये मतदार यादीत घोळ केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. त्याबाबत ठाकरे गट, मनसे आणि काँग्रेसच्या नेत्यांनी आयोगाकडे तक्रारी केल्या आहेत. दुबार मतदार हाही या याद्यांमधील महत्त्वाचा मुद्दा असून आता विरोधी पक्षांच्या आरोपानंतर दुबार मतदारांची आकडेवारी मुंबई महापालिकेकडून जारी करण्यात आली आहे. त्यानुसार, तब्बल ११ लाख दुबार मतदार असल्याचं समोर आलं आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादीवर विरोधी पक्षांनी अनेक प्रश्न उपस्थित केले होते. या प्रश्नांना उत्तर देत प्रारुप मतदार यादीतील संभाव्य दुबार म तदारांची वार्डप्रमाणे आकडेवारी समोर आली असून ११ लाखांहून अधिक दुबार मतदार असल्याचे समोर आलं आहे. प्रसारित केलेल्या यादीत ११,0१,५0५ एवढी दुबार नावे आहेत. एस. वार्डमध्ये सर्वाधिक दुबार मतदार असून येथे ६९५00 दुबार मतदारांची संख्या नोंद झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. तर,बी वार्डमध्ये सर्वात कमी दुबार मतदारांची आकडेवारी असून बी वार्ड मध्ये ८,३९८ दुबार मतदार आहेत.

विधान परिषदेचा अवमानाबद्दल सूर्यकांत मोरे यांच्यावर कारवाई करा

भाजपा आमदारांची मागणी

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ नोव्हेंबर:

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे तसेच परिषद सदस्यांबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कार्यकर्ते सूर्यकांत मोरे यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाची कारवाई करावी, अशी मागणी मी व आ. श्रीकांत भारतीय यांनी विधीमंडळाकडे केली आहे, अशी माहिती भाजपाचे विधान परिषदेतील गटनेते आ. प्रवीण दरेकर यांनी मंगळवारी दिली.

प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी व भारतीय यांनी सांगितले की, २३ नोव्हेंबरला अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड नगरपरिषदेच्या निवडणूक प्रचार सभेत बोलताना सूर्यकांत मोरे यांनी विधान परिषद, विधान परिषदेचे सदस्य व सभापती प्रा. राम शिंदे यांच्याबद्दल अत्यंत अवमानकारक भाषेत वक्तव्य केले. त्यामुळे परिषदेची अप्रतिष्ठा झाली असल्यामुळे मोरे यांच्यावर विशेषाधिकार भंगाची कारवाई करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे संविधान कलम १९४ नुसार राज्य विधानमंडळ व त्यांचे सदस्य यांना विशेषाधिकार व स्वातंत्र्य प्रदान केले आहे. सभागृहाची प्रतिष्ठा कमी करणारी कोणतीही कृती जर सभागृहाच्या कामकाजावर परिणाम करत असेल तर ती कृती विशेषाधिकार भंग कृती ठरते. मोरे यांच्यावर विशेषाधिकार भंग केल्याबद्दल कारवाई व्हावी, मोरे यांचे भाषण चालू असताना आ. रोहित पवार हे हसत होते, असेही आ. दरेकर यांनी निदर्शनास आणून दिले. आ. दरेकर म्हणाले की, मोरे यांच्या पक्षाचे प्रमुख शरद पवार हे विधान परिषदेचे १९९३ -१९९६ दरम्यान सदस्य तर १९९५ ते १९९६ विरोधी पक्ष नेते होते. सुप्रिया सुळे या २00६-0९ राज्यसभा सभासद होत्या. उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण देखील विधान परिषदेचे सभासद आहेत आणि होते. शप राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे देखील विधान परिषदेचे सदस्य आहेत. मोरे यांनी ज्या हीन भाषेत प्रा. शिंदे यांच्यावर अवमानकारक टिप्पणी केली ती टिप्पणी या सर्व नेत्यांनाही लागू होते का?, असा सवाल यांनी केला.

मविआ नेत्यांचा विश्वास ढासळला आहे. त्यांची निवडणुकीच्या मैदानात येऊन लढण्याची ना उमेद आहे ना धमक आहे. महायुतीचा कारभार स्वच्छ पारदर्शक असल्याने टीका करायलाही वाव नाही. अशा स्थितीत मविआ नेते रडीचा डाव खेळत आहेत. भाजपावर विश्वास असल्याने १00 ठिकाणी बिनविरोध नगरसेवकांची निवड झाली त्यामुळे पायाखालची जमीन सरकली आहे. त्यामुळे गंभीर आरोप करत नवनवीन रडण्याचे डाव खेळत असल्याची टीकाही दरेकर यांनी केली.

॥अति भव्य शिखरावर डौलात सांगे धर्मध्वजा शरयू तीरी विराजमान झाला अयोध्येचा राजा॥

अयोध्या येथील श्री राम जन्मभूमी मंदिराची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी २०२४ रोजी झाली होती, म्हणजे मंगळवारी २५ नोव्हेंबर २०२५ ला त्याला जवळजवळ २२ महिने होत आहेत. अयोध्या येथील भव्य श्री राम जन्मभूमी मंदिरात २५ नोव्हेंबर २०२५ रोजी विवाह पंचमीला झालेल्या धर्मध्वजारोहणाचा फार मोठा धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. मंदिराचे मुख्य निर्माण कार्य आता पूर्ण झाले असून, ध्वजारोहण हा त्याच्या पूर्णत्वाची अधिकृत घोषणा आहे. हा केवळ एक विधी नाही, तर मंदिराच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पूर्णतेचे प्रतीक आहे. थोडक्यात काय तर 'शिखरावरील भगवा धर्मध्वज म्हणजे स्वतः मर्यादा पुरुषोत्तम श्री रामांची विजयपताका; जी सांगतो की अयोध्येत पुन्हा रामराज्य अवतरले आहे!'

मंदिर बांधकाम पूर्ण झाल्याचे संकेत

राममंदिराचे बांधकाम हळूहळू प्रगतीपथावर होते. प्राणप्रतिष्ठेनंतरही शिखर, मूर्ती स्थापना (जून २०२५ मध्ये १८ मूर्तींची प्राणप्रतिष्ठा) आणि इतर भाग पूर्ण होत गेले. ध्वजारोहण हा शेवटचा मोठा विधी होता, जो मंदिराच्या वैभवाची अधिकृत सुरुवात करतो. राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या अध्यक्ष नृपेंद्र मिश्र यांच्या मते, ध्वजारोहण हे 'मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याचे संकेत' आहे. प्राणप्रतिष्ठेनंतरही काही भागांचे बांधकाम शिल्लक होते, ते आता पूर्ण झाले आहे. मंदिर पूर्णत्वाची अधिकृत घोषणा म्हणजे, शिखरावर भगवा धर्मध्वज फडकवला की मंदिराचे निर्माण पूर्ण झाले आणि देवतेची प्राणप्रतिष्ठा पूर्णत्वास गेली असे मानले जाते. म्हणूनच हे ध्वजारोहण मंदिराच्या 'उद्घाटनाचा शेवटचा टप्पा' मानला जातोय्.

विवाह पंचमीचा शुभ मुहूर्त

२५ नोव्हेंबर २०२५ ही मार्गशीर्ष शुक्ल पंचमी आहे, जी त्रेतायुगात श्री राम-सीतेच्या विवाहाशी जोडलेली आहे. हा दुर्मीळ संयोग आहे अभिजीत मुहूर्त (दुपारी ११:५२ ते १२:३५) मध्ये ध्वज फडकवला जातो. यामुळे मंदिरात राम-सीतेचे दाम्पत्य स्वरूप अधिक प्रकट होते. विशेष म्हणजे, ध्वजारोहणाचा दिवस मंगळवारच आहे. याचे महत्त्व आणखी वेगळे आहे. रामायणात श्रीराम आणि माता सीतेच्या विवाहात भावाने करावयाचे विधी आता होतील, असे पुरोहितांनी जाहीर केले. भावाला बोलवा, असा पुकारा झाल्यानंतर सारेच चिंतेत पडले की, आता हे विधी कोण करणार? तेव्हा उपस्थितांपैकी एक सावळा युवक समोर आला आणि हात जोडून म्हणाला, मी हे विधी करू इच्छितो. तेव्हा सर्वांच्या मनात प्रश्न उपस्थित झाला की, हा या विधीसाठी योग्य कसा? तो युवक म्हणजे मंगळ ग्रह होता.देवी, देवतांसह नवग्रह देखील या अद्भुत विवाह सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी आले होते. मंगळ हा पृथ्वीचा पुत्र मानला जातो आणि सीताही पृथ्वीचीच कन्या होती. त्यामुळे या नात्याने हे दोघे बहीण-भाऊ होतात. धर्मध्वजा फडकविण्याच्या शुभ मुहूर्ताला मंगळवारचा दिवस लाभणे, हा देखील अद्भुत योगायोग ठरला आहे. विशेष म्हणजे, याच दिवशी रामचरितमानस लिहून पूर्ण झाले होते.

राममंदिरात झालेल्या ध्वजारोहण सोहळ्यात सहभागी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत


सप्त ऋषींच्या मंदिरात पूजा करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

काय सांगते धार्मिक परंपरा?

वैदिक शास्त्रांनुसार, कोणत्याही मंदिरात शिखरावर धर्म ध्वज (भगवी पताका) फडकवणे अनिवार्य आहे. हा ध्वज देवतेची उपस्थिती, शक्ती आणि संरक्षणाचे प्रतीक आहे. प्राण प्रतिष्ठेनंतर हा विधी उशिरा होतो, कारण तो मंदिराच्या सात्विक ऊर्जेला सक्रिय ठेवतो.

ऐतिहासिक संदर्भ

५०० वर्षांच्या संघर्षानंतर मंदिराचे पूर्णत्व साजरे करण्यासाठी हा क्षण निवडला गेला. माननीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या उपस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते धर्म ध्वज फडकविणे, हा एक ऐतिहासिक क्षण ठरला आहे. अयोध्येतील वादग्रस्त ढाचा पाडण्यापासून तर मंदिरात श्रीरामललाच्या सावळ्या, सुंदर बालमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यापर्यंतचा प्रवास स्वत:चा एक वेगळा इतिहास सांगतो. मात्र, याच मंदिर परिसराची एकूणच आखणी, येथे असणारे विविध देवतांचे स्थान याचे महत्त्व वेगळेच आहे. त्या संपूर्ण कामाची इतिकर्तव्यता होण्याचा हा क्षण असल्याने सर्वार्थाने ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरला आहे.

काय सांगते धर्मध्वजा

भगवान रामांच्या उपस्थितीचे प्रतीक

धर्मध्वज म्हणजे स्वतः भगवान श्रीरामांची पताका. हा ध्वज फडकल्यावर मंदिरात श्री रामांचे संपूर्ण वैभव, शक्ती आणि संरक्षण सतत कार्यरत राहते, असे शास्त्र सांगते.

सात्त्विक ऊर्जेचे संचालन

शिखरावरील ध्वज मंदिरातील सात्विक ऊर्जेला दिशा देतो, नकारात्मक शक्तींपासून रक्षण करतो आणि भाविकांना दर्शनाचा पूर्ण फळ प्राप्त होण्यास मदत करतो.

वैदिक परंपरेचे पुनरुज्जीवन

प्राचीन काळी प्रत्येक देवालयात धर्मध्वज अनिवार्य असायचा. ५०० वर्षांच्या संघर्षानंतर पुन्हा अयोध्येत ही परंपरा जिवंत झाली, ही भारतीय संस्कृतीची पुनर्प्राप्ती आहे.

राष्ट्रीय एकतेचे प्रतीक

हा भगवा ध्वज केवळ राममंदिराचा नाही, तर संपूर्ण हिंदू समाजाच्या संकल्प, तपश्चर्या आणि विजयाचा झेंडा आहे. म्हणूनच देशभरातून लाखो लोकांनी हा क्षण उत्सव म्हणून साजरा केला.

धर्मध्वजाचे महत्त्व

धर्मध्वज धर्माधिष्ठित राज्याची प्रेरणा देत असल्याने धर्मध्वजाला प्रार्थना करण्याची पद्धत आहे. मंदिर ही यज्ञ भूमी असल्याने यज्ञ मंडपाच्या मांडणीचेही ते प्रतिकात्मक रूप आहेच. ही यज्ञ-भूमी असल्याने येथे कळसावर भगवाध्वज लावतात. मंदिरावरील भगवाध्वज अग्नी-ज्वालेचे प्रतीक आहे. ज्वालेचे रूप स्पष्ट दिसावे म्हणून ध्वजाच्या दोन शिखा दाखवितात. अग्नीच्या दोन शक्ती - स्वधा आणि स्वाहा, अशा सांगितल्या आहेत. अग्नी या दोन पत्नींसहच असायचा आणि म्हणून ध्वजाचा रंग आणि आकार अग्नी-शिखांसारखाच घेतला आहे. आणखीही एक कारण आहे. ध्वज वाऱ्यावर फडफडत असणार आणि इतर कोणत्याही आकारचे ध्वज वाऱ्यावर अधिक काळ फडफडत ठेवले तर, त्याच्या चिंध्या होतात. हा विशिष्ट आकार असल्याने भगव्या ध्वजाचे कधीच तुकडे होत नाहीत.

धर्मध्वजाविषयी थोडसे...

अयोध्येतील राममंदिरावर फडकलेल्या या धर्मध्वजाची लांबी २२ फूट बाय ११ फूट आहे. या ध्वजाला 'कोविदार ध्वज' असे नाव देण्यात आले आहे. हा ध्वज तीन थरांच्या 'पॅराशूट-ग्रेड' कापडापासून बनवला असून, श्रद्धेच्या रेशमी धाग्यांनी विणला आहे. हा अहमदाबाद येथे तयार करण्यात आला आहे. १६१ फूट उंच शिखरावर ४२ फूट लांबीचा खांब वापरून तो स्थापन करण्यात आला आहे. या खांबाला २१ किलोग्रॅम सोन्याचा मुलामा देण्यात आला आहे. या ध्वजावर भगवान श्री रामाचे सूर्यवंश आणि ओंकाराचे प्रतीक आहे, तसेच कोविदार वृक्षाचे चिन्ह आहे. या चिन्हांचा चार महिने अभ्यास करण्यात आला आणि ध्वजावर हाताने विणकाम करण्यात आले आहे.

ध्वजाबद्दल झाली प्रदीर्घ चर्चा

रामलालाच्या धामाचे पावित्र्य जपत आणि युगानुयुगे कायम राहणाऱ्या सनातन परंपरेचे प्रतिनिधित्व कोणते चिन्ह असेल यावर प्रदीर्घ चर्चा झाली. या चर्चेअंती चिन्हांची निवड करण्यासाठी रामचरित मानस आणि रामायणाचा अभ्यास करण्यात आला, असे आंतरराष्ट्रीय रामकथा संग्रहालयाचे संचालक डॉ. संजीवसिंह यांनी सांगितले.

ध्वजाच्या केशरी रंगाचे महत्त्व

विश्वकर्मा वास्तुशास्त्राच्या ४२ व्या अध्यायात ध्वजांच्या वैशिष्ट्यांचे तपशीलवार वर्णन दिले आहे. महाभारत, ऋग्वेद आणि विष्णुधर्मोत्तर पुराण ध्वजांचे वर्णन करतात. भगवान विष्णूच्या ध्वजाचे रंग पिवळे आणि सोनेरी असल्याचे वर्णन केले आहे. त्यांच्या अवतारांच्या ध्वजांचे रंग भगवे आणि पिवळे असतील. श्री राम हे विष्णूचे अवतार आहेत, म्हणून ध्वजाचा भगवा रंग आहे. सूर्याचे चिन्ह सूर्यवंशी राजवंशातील असल्याने दर्शविले आहे. सूर्य चैतन्य आणि उर्जेचे देखील प्रतीक आहे. ओम विश्वाचे प्रतिनिधित्व करतो, म्हणून ओम चिन्ह वापरले आहे. कोविदार वृक्षाचे चित्रण केले आहे कारण ते रघुकुल वंशाचे शाही प्रतीक आहे.

धर्मध्वजावर रेखाटलेला कोविदार वृक्ष कोणता?

अयोध्येतील राममंदिराच्या बांधकामाच्या पूर्णत्वाचे प्रतीक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करण्यात आले. या ध्वजावर कोविदार वृक्ष आणि सूर्य प्रतिमा आहे. धर्म ध्वजावरील कोविदार वृक्ष आहे. तो कांचनार वृक्षासारखा दिसतो. मात्र, पारिजात आणि मांदार यांचा संकर असलेला हा वृक्ष आहे. हा वृक्ष रघुकुल रीत दाखवणारा आहे. स्वतः उन्हात उभे राहून सगळ्यांना सावली देणारा हा वृक्ष आहे. असे वृक्ष सत्पुरुषांसारखे असतात. कांचनार वृक्षाचा उपयोग औषधांमध्येही होतो आणि अन्नातही होतो. धर्म जीवन हे असेच असते, अशा शब्दांत सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी कोविदाराचे वर्णन केले.

कोविदार वृक्षाची आख्यायिका काय?

वाल्मीकि रामायणात कोविदार वृक्षाचा उल्लेख आहे. प्रभू रामचंद्र जेव्हा सीता आणि लक्ष्मणासह वनवासात गेले, तेव्हा भरत तिथे नव्हता. भरताला जेव्हा रामाला वनवासात पाठवण्यात आले, हे कळले तेव्हा तो रामाची समजूत काढण्यासाठी आणि रामाला पुन्हा अयोध्येत परत, या ही विनंती करण्यासाठी चित्रकूट पर्वतावर भेटायला गेला होता. त्यावेळी अयोध्येतील सैन्यही भरतासह आले होते. वनवासात देखरेखीची जबाबदारी लक्ष्मणावर होती. त्याने एका झाडावर बसून हे पाहिले की एक सैन्य त्यांच्या दिशेने येते आहे. त्याने रामाला याबाबत सांगितले. तेव्हा रामाने कोविदार वृक्षाची खूण पाहिली आणि लक्ष्मणाला सांगितले की हे आपल्याच अयोध्येचे ध्वज आहेत. भरताने रामाची भेट घेतली पण रामाने वनवास भोगणार असे सांगितले. त्यानंतर भरताने रामाच्या पादुका डोक्यावर घेऊन येत अयोध्येत रामाचा प्रतिनिधी म्हणून १४ वर्षे राज्य केले. कोविदार वृक्षाला जगातील पहिला संकरित वृक्ष मानण्यात आले आहे. कश्यप ऋषींनी मांदार आणि पारिजात या दोन झाडांच्या संकरातून कोविदार वृक्षाची निर्मिती केली. या वृक्षाला कांचन वृक्ष, आपटा, कांचनार अशीही नावे आहेत.

कोविदारचे वनस्पती शास्त्रातील नाव काय?

कोविदार वृक्षाचे नाव 'बॉहिनिया व्हेरिएगेटा' असे आहे. संस्कृत भाषेत या वृक्षाला कांचनार असे म्हटले जाते. या वृक्षाची उंची १५ ते २५ मीटरपर्यंत असते. हा वृक्ष पानांनी आणि फुलांनी डवरलेला असतो आणि त्याची फुले वांग्याच्या रंगाची असतात. कोविदार वृक्ष हिमालयाचा दक्षिणी भाग, पूर्व भाग आणि दक्षिण भारतात आढळतो. कोविदार वृक्षाच्या सत्त्वाचा उपयोग त्वचेच्या रोगांसाठी होतो. पोटाचे विकार बरे करणारी गुणकारी याची साल आहे. असा बहुगुणी कोविदार वृक्ष रामराज्यात त्यांच्या ध्वजावर होता आणि राष्ट्रीय प्रतीक होता.

ध्वजारोहणाच्या मुख्य कार्यक्रमाला जाताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी रामललाचे मनोभावे पूजन केले

राममंदिर पूर्णत्वाचा टप्पा म्हणजे ध्वजारोहण सोहळ्यासाठी निमंत्रित साधूंचा आनंद ओसंडून वाहत होता

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

अग्रलेख...

माओवाद्यांच्या विनंतीमागे व्यूहरचना?

आतापर्यंत माओवाद हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक मुद्दा असल्याची सर्वांची धारणा होती. मात्र, केंद्र सरकारने घेतलेल्या कठोर भूमिकेमुळे व धडक कारवायांमुळे माओवाद प्रभावित क्षेत्र आता काही जिल्ह्यांपुरते मर्यादित झाले आहे. ते सतत संकुचित होत चालले आहे. अलिकडे केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोचा सदस्य भूपतीने शरणागती पत्करली आणि क्रूरकर्मा माडवी हिडमाचा खात्मा करण्यात आला. माओवाद्यांना एकामागून एक धक्के बसत असताना आता महाराष्ट्र-मध्यप्रदेश आणि छत्तीसगड (एमएमसी) क्षेत्रीय समितीचा प्रवक्ता अनंतने निवेदन जारी करीत तीन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना साकडे घातले आहे. आम्हाला शरणागती पत्करायची असल्याचे सांगत, यासाठी त्याने १५ फेब्रुवारीपर्यंतच्या मुदतीची मागणी केली आहे. केंद्र सरकार आणि भाजपाशासित राज्यांनी घेतलेल्या कणखर भूमिकेमुळे माओवाद्यांची पुरती कोंडी झाली असल्याचा हा पुरावा होय. सरकारने मनावर घेतल्यास मोठ्यात मोठ्या दहशतवादी चळवळी नेस्तनाबूत होतात, याची उदाहरणे आहेत. सुरक्षा दलांनी धडक कारवायांत नक्षल्यांना ठोकले. त्यामुळे एमएमसीने शरणागतीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत मिळण्याची विनवणी केली असावी, असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु, माओवाद्यांचा आतापर्यंतचा इतिहास पाहता ही त्यांची नवीन व्यूहरचना असावी, असा संशय व्यक्त करायलाही जागा आहे. त्यामुळे या मुद्यावर सरकारने अत्यंत सावधपणे पावले उचलणे अपेक्षित आहे.

पशुपती ते तिरुपती रेड कॉरिडॉर उभारण्याचे स्वप्न पाहणाऱ्या माओवाद्यांना केंद्र सरकारने प्रचंड धक्का दिला आहे. शरण या, नाही तर कारवाईसाठी सज्ज राहा, असा इशारा देऊनच केंद्र सरकार थांबले नाही, तर तो इशारा प्रत्यक्षात आचरणातही आणला गेला. अत्यंत दुर्गम भागात तयार केलेले माओवाद्यांचे गड उद्ध्वस्त केले गेले. नक्षल्यांचे कित्येक नेते ठार झाले तर अनेकांनी शरणागती पत्करली. माओवादी चळवळ विध्वंसक वादळासारखी समोर सरकत चालली होती. केंद्राने केलेल्या उपाययोजनांमुळे तिला अचानक पायबंद बसला. आता माओवादी सैरभैर झालेले आहेत. छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेशातील आदिवासीबहुल अरण्याच्या प्रदेशात नक्षल्यांनी संघटनात्मक यंत्रणा तयार केली होती. या भागांतील दारिद्र्य, आदिवासी समाजातील मागासलेपणा, प्रशासनापर्यंत पोहोचणाऱ्या सेवांचा अभाव, नैसर्गिक संसाधनांवर होणारा संघर्ष इत्यादी कारणांचा गैरफायदा घेत माओवादी संघटना वाढू लागल्या होत्या. त्या काळात जनताना सरकार, क्रांतिकारी न्यायालये आणि शेकडो सशस्त्र दले उभारली गेली. ही संपूर्ण साखळी पशुपतिनाथ (नेपाळ) ते तिरुपती (आंध्रप्रदेश) अशा विशाल भौगोलिक पट्ट्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी निर्माण केली जात होती. यूपीएच्या काळात केंद्र सरकारने माओवाद्यांच्या विरोधात फक्त भीमगर्जना केल्या. प्रत्यक्षात फारसे झाले नाही. केंद्रात भाजपाचे सरकार आल्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने नक्षल्यांची कोंडी झाली. माओवादाच्या विरोधातील ९० टक्के लढाई केंद्र सरकारने जिंकल्याचे दिसत आहे. त्यामुळेच एमएमसीने शरणागती पत्करण्याची तयारी दर्शविली असावी. मात्र, त्यासाठी मागण्यात आलेली १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत संशयास्पद आहे. केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोचा सदस्य भूपतीने शरण येण्यापूर्वी जारी केलेल्या पत्रात माओवाद्यांना सजग केले होते. शरणागती पत्करल्यानंतर समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचे आवाहनही त्याने माओवाद्यांना केले होते. अशा परिस्थितीत एमएमसीने शरणागतीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत मागणे अनाकलनीय ठरते. केंद्र सरकारने शरणागतीसाठी ३१ मार्च २०२६ ही 'डेडलाईन' यापूर्वीच माओवाद्यांसाठी जाहीर केलेली आहे. माओवाद्यांचा यापूर्वीचा इतिहास पाहता शरणागतीचा बहाणा करून सुरक्षा दलांना, स्थानिक प्रशासनाला आणि कधी-कधी गावकऱ्यांना फसवण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. शत्रूला भ्रमात टाकणे, खोटी माहिती पसरवणे आणि आपल्याला फायदा होईल, अशी परिस्थिती निर्माण करण्याची त्यांची पद्धत आहे. शरणागतीचा बनाव करून फसवणूक करणे हे त्यातील सर्वांत धोकादायक तंत्र. माओवादी गटांनी आत्मसमर्पणासाठी वाटाघाटी सुरू झाल्याचे संदेश देऊन सरकारी दलांना विशिष्ट ठिकाणी बोलाविले आणि सुरक्षा दले शांततेच्या अपेक्षेने पुढे जात असताना घातपात घडविण्यात आले, हाही इतिहास आहे. एमएमसीचे सदस्य अशा प्रकारची मुदत मागून भ्रमित करू शकतात. या अवधीचा वापर करीत छुपे गटही तयार करू शकतात किंवा परिस्थिती निवळेपर्यंत एखाद्या सुरक्षित आश्रयस्थळी जाण्याचा प्रयत्नही करू शकतात, हे नाकारता येत नाही. माओवाद्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवणे अशक्यच. भूपतीने शरणागती पत्करण्यापूर्वी जारी केलेल्या निवेदनात 'अस्थायी' स्वरूपात शस्त्रे खाली ठेवण्याचा उल्लेख केला होता. अस्थायी हा शब्द खटकणारा आहे आणि त्यामुळेच अशी मुदत मागणे ही धूळफेक तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित होतो. जंगलातील लढाईत माघार घ्यावी लागत असल्याने शहरी भागांतील लढाईवर लक्ष केंद्रित करण्यासाठी भूपतीसह इतर माओवाद्यांनी शरणागती पत्करली असावी, असा संशय 'अस्थायी' शब्दामुळे घेतला जाऊ शकतो. एमएमसीच्या पत्रासोबतच माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचे एक पत्रही समोर आले आहे. त्यात पीएलजीचा २५ वा स्थापना दिवस २ ते ८ डिसेंबर या कालावधीत देशभरात क्रांतिकारी उत्साहात साजरा करणार असल्याचे म्हटले आहे. याउलट हा सप्ताह साजरा करणार नसल्याचे एमएमसीने पत्रात म्हटले आहे. अशा परिस्थितीत संशय अधिकच गडद होतो. हिडमाच्या खात्म्यानंतर काही गोष्टींमध्ये अचानक बदल झाला आहे. समाज माध्यमांवर हिडमाला एखाद्या नायकासारखे चित्रित केले जात आहे. हिडमा हा आदिवासी, जंगल-जमीन आणि पाण्याचा रक्षक असल्याचे चित्र रंगविले जात आहे. वर्ष-दीड वर्षापूर्वी हिडमाने शाळकरी मुलाची गळा चिरून क्रूर हत्या केली होती. ज्या हिडमाने ७६ जवानांचा बळी घेतला, जिरम खोऱ्यात महेंद्र कर्मा आणि काँग्रेसच्या नेत्यांची हत्या केली, त्यांच्या मृतदेहांवर थयथयाट करण्याचा निर्दयी प्रकार करण्यात आला, तो हिडमा आदिवासी रक्षक कसा, या प्रश्नाचे उत्तर त्याला नायक ठरवू पाहणाऱ्यांनी दिले पाहिजे. दिल्लीत काही विद्यार्थ्यांनी त्याच्या समर्थनार्थ केलेल्या नारेबाजीमागे शहरी माओवादीच आहेत. जंगलातील लढाईत माओवाद्यांचा पराभव होत आहे. शहरांतील लढाई अत्यंत कठीण स्वरूपाची असते. तेथे नक्षल्यांना ओळखायचे कसे हा प्रश्न असतो. शिवाय, शहरी माओवाद अस्तित्वात नाही, असा युक्तिवाद केला जातो. सीपीआय (माओवादी) पक्षाच्या सैद्धांतिक दस्तऐवजांमध्ये मात्र शहरी कारवायांच्या घटकाला विशेष महत्त्व दिलेले आहे. माओवादी चळवळीची मुख्य लढाई ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात असली, तरी शहरांचा वापर हा धोरणात्मक तळ म्हणून केला जातो, असे त्या दस्तवेजांमध्ये स्पष्ट नमूद आहे. माओवादी विचारानुसार शहरी भाग हे क्रांतीसाठी दोन मुख्य कारणांनी महत्त्वाचे आहेत. पहिले म्हणजे शहरांतून आर्थिक, तांत्रिक, बौद्धिक आणि प्रचारात्मक आधार मिळू शकतो. दुसरे म्हणजे, शहरी समाजातील असंतोष, कामगार संघटना, विद्यार्थी चळवळी किंवा सामाजिक न्यायाच्या मुद्यांचा वापर करून शासनाविरुद्ध व्यापक वातावरण तयार करता येते. म्हणूनच त्यांच्या घटनेत शहरातील फ्रंटल संघटना, भूमिगत नेटवर्क, विद्यार्थ्यांच्या-कामगारांच्या संघटना आणि प्रचारयुद्ध लढणाऱ्या युनिटचा तपशीलवार उल्लेख आहे. शहरी कारवायांचा मुख्य उद्देश राजकीय अस्थिरता, माहिती संकलन, निधी उभारणी आणि कायद्याच्या राज्याविषयी अविश्वास निर्माण करण्याचा असतो. माओवादी संघटनांच्या धोरणानुसार शहरांतील समर्थकांनी थेट हिंसा न करता माहितीचे युद्ध, न्यायिक संघर्ष, प्रचार साहित्याचा प्रसार आणि राजकीय संरक्षण कवच तयार करणे अपेक्षित आहे. हे शहरी नेटवर्क जंगलातील सशस्त्र युद्धाला अप्रत्यक्ष आधार पुरवते. सध्या माओवादी घाबरलेले, गोंधळलेले असले, तरी ते मुळात हिंसक आणि कावेबाज आहेतच. त्यामुळे त्यांच्या कोणत्याच विनवणीवर किंवा आश्वासनावर विश्वास न ठेवता केंद्र व राज्य सरकारांनी त्यांना ठोकत राहावे, हेच योग्य?

विशेष

विकासाचे महामार्ग

प्रा. सुखदेव बखळे

भारतात गेल्या १० वर्षांमध्ये केंद्र शासनाच्या समग्र आणि एकात्मिक दृष्टिकोनामुळे पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकास झाला आहे. धोरणांमध्ये सुधारणा व युद्धपातळीवर राबविले जाणारे प्रकल्प यांच्या भक्कम पायाभरणीवर आधारित परिवर्तनामुळे दळणवळण सुविधांचा विस्तार तर झालाच; आर्थिक उत्पादकता वाढली. मालवाहतूक आणि साठवणुकीचा खर्च कमी झाला आणि पुरवठा सेवाही सुधारली. प्रगती, पीएम गतिशक्ती, राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण, भारतमाला, सागरमाला आणि उडान अशा प्रमुख राष्ट्रीय प्रकल्पांनी एकत्रितरीत्या संपर्कसुलभतेमुळे भारत जागतिक स्पर्धेला तयार झाला आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या उद्दिष्टाला अनुसरूनच हे रूपांतरण घडते आहे. 'प्रगती' उपक्रमांतर्गत आतापर्यंत ३६३ प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. याद्वारे पंतप्रधान केंद्र सरकारचे सचिव, राज्यांचे मुख्य सचिव यांच्यासोबत दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधतात. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन सरकारी योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीद्वारे हमी व निरनिराळ्या आंतर मंत्रालयीन किंवा संघराज्यीय समस्यांमुळे आधी रखडलेले महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कामकाजाची गती वाढविणे याद्वारे उद्दिष्ट साध्य करण्यात येते.

भारताच्या आर्थिक क्षेत्रांमधील बहुआयामी वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी 'पीएम गतिशक्ती' राष्ट्रीय बृहद आराखडा उपक्रम १३ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरू करण्यात आला. या सर्वसमावेशक उपक्रमाद्वारे १०० कोटी रुपयांचा निधी कार्यक्षमरीत्या वापरला जात आहे. रेल्वे, रस्ते, बंदरे, जलमार्ग, विमानतळ, अवजड वाहतूक आणि लॉजिस्टिक्ससंबंधी पायाभूत सुविधा या सात महत्त्वाच्या क्षेत्रांवर आधारित हा उपक्रम मंत्रालये व राज्य सरकारांच्या माध्यमातून विकासाला चालना देत आहे. 'पीएम गतिशक्ती' उपक्रमाच्या तत्त्वांनुसार विविध मंत्रालयांच्या १५.३९ लाख कोटी रुपये खर्चाच्या २०८ मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यांकन केले गेले आहे. विविध मंत्रालये आणि राज्य सरकारांच्या भारतमाला, सागरमाला, जलमार्ग, बंदरे, उडान यासारख्या पायाभूत सुविधा योजना यामुळे एकत्रित होतील.

वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक, मत्स्य व्यवसाय, कृषी इत्यादी आर्थिक क्षेत्रांमधली दळणवळणाची सुविधा सुधारल्यामुळे भारतीय उद्योग जागतिक स्पर्धेचा सामना करण्यास सज्ज असतील. यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. विदेशी गुंतवणूक वाढेल आणि जगातले भारताचे स्थान उंचावेल. राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण एकात्मिक, कार्यक्षम आणि वाजवी खर्चाच्या लॉजिस्टिक सुविधांचे जाळे निर्माण करून भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी १७ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. लॉजिस्टिक्सवरील खर्च कमी करणे, २०३० पर्यंत लॉजिस्टिक्स कार्यक्षमता निर्देशांका (एलपीआय) मध्ये जगातील पहिल्या २५ देशांमध्ये स्थान मिळविणे आणि माहिती आधारित निर्णयांना प्रोत्साहन देण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. यामुळे भारतीय उत्पादनांची भारतासह आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढेल तसेच कमी झालेल्या खर्चामुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांमधील कार्यक्षमता वाढीस लागेल; परिणामी मूल्यवृद्धी आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळेल. या पृष्ठभूमीवर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा (एनएचएआय) ने चालू आर्थिक वर्षात ५२ महामार्ग प्रकल्पांसाठी निविदा मागवल्या आहेत. त्यांची एकूण लांबी २१८८ किलोमीटर असून सर्व प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी १.१५ लाख कोटी रुपयांचा भांडवली खर्च आवश्यक आहे. त्यामुळे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय २०२५-२६ मध्ये १० हजार किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग बांधण्याचे उद्दिष्ट जलदगतीने पूर्ण करण्यास मदत करू शकते. या ५२ प्रकल्पांपैकी १८ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. १५ प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यात आले असून लवकरच मंजुरी देण्यात येईल. सहा प्रकल्प मंजुरीसाठी मंत्रिमंडळाकडे पाठविण्यात आले आहेत. १० प्रकल्प स्थायी वित्त समितीकडे (एसएफसी) मूल्यांकनासाठी पाठविण्यात आले आहेत आणि तीन प्रकल्पांचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यासाठी तयार आहे. 'एनएचएआय'ने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ४५०० किलोमीटर रस्ते देण्याचे आणि पाच हजार किलोमीटर रस्ते बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आतापर्यंत ५०४.३२ किलोमीटर लांबीचे ४३ प्रकल्प मंजूर केले आहेत आणि २,०६०.९९ किलोमीटरचे काम पूर्ण केले आहे. पहिल्या सहामाहीमध्ये सुरुवात मंद असली, तरी मंत्रालय निश्चितच वर्षासाठी निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करेल. सप्टेंबरच्या अखेरीस, गेल्या वर्षी याच कालावधीत ३८०० किलोमीटरच्या तुलनेत ३ हजार २०० किलोमीटर रस्ते पूर्ण करण्यात आले होते. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या महामार्ग मुद्रीकरणाच्या प्रकरणात 'आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर टोल ऑपरेट ट्रान्सफर' (टीओटी) मोडद्वारे मुद्रीकरण केलेल्या ऑपरेशनल मालमत्तेसाठी सर्वाधिक बोली लावणारी कंपनी म्हणून उदयास आली आहे. कंपनीने उत्तर प्रदेशमधील ३३३.४ किलोमीटर महामार्ग नेटवर्कसाठी ९,२०० कोटी रुपयांच्या ऑफरसह बोली जिंकली. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने चालू आर्थिक वर्षासाठीचे त्यांचे मुद्रीकरणाचे लक्ष्य वाढवून ४० हजार कोटी रुपये केले आहे. २०२४-२५ मध्ये महामार्ग निर्मात्याने मुद्रीकरणाद्वारे २८,७२४ कोटी रुपये उभारले होते. या वर्षाच्या एकूण उद्दिष्टापैकी १५ हजार कोटी रुपये 'टीओटी' आणि 'इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट' (आयआयटी) मार्गांद्वारे येतील; उर्वरित प्रकल्प आधारित वित्तपुरवठ्यातून येतील.

'टीओटी' अंतर्गत सर्वात जास्त बोली लावणाऱ्या आणि तांत्रिक निकष पूर्ण करणाऱ्याला ज्या महामार्गांसाठी सवलत मिळाली आहे, त्यावर टोल वसूल करण्याचा अधिकार मिळतो. सवलतीचा कालावधी २० वर्षांचा असतो. त्यानंतर मालमत्ता 'एनएचएआय'कडे परत येते. मालमत्तेच्या मुद्रीकरणाच्या पावत्या भांडवली खर्चासाठी 'एनएचएआय'कडे परत पाठविल्या जातात. सध्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या एकूण अर्थसंकल्पीय संसाधनांपैकी १० टक्के मुद्रीकरण पूर्ण करत आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे पायाभूत सुविधा गुंतवणूक ट्रस्ट मार्गाच्या पाचव्या फेरीसाठी मुद्रीकरणाची बोली प्रक्रिया लवकरच सुरू होईल.

पुढील काही आठवड्यांमध्ये सुरू होणाऱ्या पाचव्या फेरीत 'एनएचएआय'ने एकूण ५५० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे नऊ रस्ते मुद्रीकरणासाठी निवडले आहेत. हे रस्ते महाराष्ट्र, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील आहेत. या वर्षी महामार्ग मुद्रीकरणाद्वारे निधी उभारणीसाठी ४० हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाशिवाय राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांचे बांधकाम विभाग आदी माध्यमांमधून रस्तेबांधणीला चालना दिली जात आहे. त्यात पंतप्रधान ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून गावागावांपर्यंत चांगले रस्ते तयार होत आहेत. पाणंद रस्त्यांच्या माध्यमातून थेट बांधावर पोचण्याची व्यवस्था होत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

वेध

विजय निचकवडे

'दोस्ता'चा अलविदा!

चित्रपट म्हणजे कथा नव्हे, असे अधोरेखित करीत आपल्या अभिनय शैलीच्या जोरावर प्रत्येक व्यक्तिरेखेला जिवंत करणारा अभिनेता धर्मेंद्र यांनी स्वतःला सिद्ध केले. कुणीही सिद्धहस्त नसतो; मात्र संघर्षातून व्यक्ती घडत जाते. अशाच संघर्षाच्या अनेक खाचखळग्यातून वाटा काढीत आपले वेगळेपण दाखवून देतानाच, गत ६५ वर्षे हिंदी चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजविणाऱ्या अभिनेत्याच्या जाण्याने एक संघर्षगाथा संपली, असे म्हणता येईल.

काळ आला होता, पण वेळ आली नव्हती याची प्रचीती १५ दिवसांपूर्वी आली. हिंदी चित्रपटसृष्टीत आपले वेगळेपण अधोरेखित करणारे 'ही मॅन' अशी ओळख असलेले अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाचे वृत्त वाहिन्यांवर आले. मात्र नंतर त्यांच्या कुटुंबीयांनी वास्तविकता पुढे मांडून धर्मेंद्र उपचाराला प्रतिसाद देत असल्याचे सांगितले होते. त्यांच्यावर नंतर घरीच उपचार सुरू होते. दरम्यान, १५ दिवसांपूर्वी न आलेली वेळ २४ नोव्हेंबर रोजी आली अन् असंख्य चाहत्यांना वेड लावलेला अभिनेता जगाचा निरोप घेत निघून गेला. खरं तर धर्मेंद्र यांची चित्रपटसृष्टीतील कारकीर्द आणि त्यांनी केलेला खडतर प्रवास हा त्यांच्या जिद्द आणि चिकाटीची परीक्षा घेणारा होता. त्यातही न डगमगता चित्रपटसृष्टीला वेगळी ओळख देण्याचे धाडस आपल्यातच आहे, हे त्यांनी दाखवून दिले. शिक्षकाचा मुलगा, मात्र अभ्यासाची फारशी आवड नाही. आपण पडद्यावर दिसावे या भोळ्या आशेने चित्रपटसृष्टीत पाऊल टाकतो; स्वतःच्या अभिनय शैलीच्या जोरावर जे काही यश संपादन करतो, ते सुवर्ण अक्षरात लिहावे असेच! काहींकडे देखणेपणा, काहींकडे अभिनय अशा वैशिष्ट्यांसह हृदय जिंकणाऱ्या कलावंतांपैकी धर्मेंद्रही त्या काळी एक होते. साधेपणा, प्रामाणिकता आणि मेहनती स्वभाव घेऊन १९६० साली 'दिल भी तेरा, हम भी तेरे' या पहिल्या चित्रपटाच्या माध्यमातून धर्मेंद्र यांनी आपल्या अभिनयाला सुरुवात केली. काळ पुढे जात असताना अभिनायाच्या अनेक संधी मिळाल्या आणि त्यांच्यातील अभिनयाच्या छटा उलगडत गेल्या. बंधन, सत्यनाम, आई मिलन की बेला हे चित्रपट कायम चाहत्यांच्या स्मरणात घर करून राहावे असेच आहेत; ज्यात धर्मेंद्र यांच्या बहुआयामी अभिनयाची ओळख चित्रपटसृष्टीला झाली. चॉकलेट हिरो, रोमँटिक आणि ॲक्शन हिरो म्हणून स्वतःला अभिनयाच्या वेगवेगळ्या पठड्यांवर त्यांनी सिद्ध केले. 'फूल बने पत्थर' चित्रपटाने 'ही मॅन' म्हणून ओळख निर्माण करण्यात धर्मेंद्र यशस्वी झाले होते.

पडद्यावर रडता येत नव्हते. दुःख आणि राग या भावनांना चेहऱ्यावर व्यक्त करताना गोंधळ उडणारा हा अभिनेता मात्र जाता जाता चाहत्यांना रडवून गेला. नाचणे माहीत नसलेला हा अभिनेता नंतर मात्र ही कसोटीही तेवढ्याच दिमाखात यशस्वी झाला होता. 'स्त्रीचे सौंदर्य पाहावे आणि पुरुषांचा पराक्रम पाहावा' अशा मानसिकतेच्या असलेल्या हिंदी सिनेमासृष्टीत स्त्रीच्या दृष्टीने पुरुषाचे सौंदर्यही 'पाहण्याचा विषय' असू शकतो, असा धडा धर्मेंद्रने 'फूल और पत्थर' चित्रपटाच्या माध्यमातून घालून दिला. बलदंड कमावलेले शरीर व त्याच्या विसंगत आपुलकीने काठोकाठ भरलेला चेहरा प्रेम आणि प्रसंगी आपले रक्षणही करू शकतो हे आश्वस्त करणारा धर्मेंद्र यांचा अभिनय चित्रपटसृष्टीला नवी दिशा आणि नवा आयाम देणारा ठरला. शोले चित्रपटातील 'वीरू' कुणी विसरू शकेल? अनेक अजरामर चित्रपटांपैकी शोलेने गाजविलेला काळ विलक्षण असाच होता. म्हणूनच तर आजही आपल्या हक्कासाठी आंदोलने होतात, ती शोले स्टाईलने! हिंदी चित्रपटसृष्टीला नवे आयाम, अभिनयाच्या नवनवीन कक्षा वृद्धिंगत करण्याचे काम या अभिनेत्याने केले. ६५ वर्षे सिनेसृष्टीची सेवा केली; मात्र कुठेही वेगळा आविर्भाव नाही! अभिनेता म्हणून काम करताना, राजकारणात 'नेता' म्हणून काम करण्याचा प्रयत्न झाला, पण राजकारण त्यांना भावले नाही. फिल्मफेअर अवॉर्ड, २०१२ साली मिळालेला पद्मभूषण पुरस्कार हे धर्मेंद्र यांच्या अभिनयासह माणुसकीचे कौतूक करणारेच म्हणावे लागेल. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या संघर्षगाथा आता संपली असली, तरी त्यांच्या अष्टपैलू अभिनयाची, साधेपणा आणि स्वभावातील सौम्यतेची जी छटा असंख्य चाहत्यांच्या मनावर कोरली गेली आहे, ती पुसट होणे नाही. विविध धाटणीच्या व्यक्तिरेखा साकारताना ३०० हून अधिक चित्रपटांची देणगी देणारा हा अभिनेता 'ये दोस्ती हम नही छोडेंगे' म्हणत असला, तरी असंख्य दोस्तांना सोडून तो निघून गेला, हेच वास्तव आहे.

९७६३७१३४१

धर्म-संस्कृती

श्रीगीता - मोक्षसंन्यासयोग (भाग दुसरा)

प्रा. दिलीप जोशी

श्रीमद्भगवद्गीतेचा १८ वा अध्याय मोक्षसंन्यासयोग नावाने परिचित आहे. या अध्यायाच्या प्रथम लेखात आपण पहिल्या ४० श्लोकांवर विचार केला होता. त्यात आपण कर्मत्याग आणि कर्मसंन्यास यावर चिंतन पाहिले. त्यापुढील विचार पाहू... त्रिलोकातील सर्व जीव प्रकृतीच्या त्रिगुणातच बांधिल आहेत. आत्मज्ञान महत्त्वाचे असून त्यामुळेच मोक्षप्राप्तीचा मार्ग प्रशस्त होतो. गुणकर्मानुसार कर्म आणि त्यावरूनच समाजपुरुषाची ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही वर्णरचना आहे.

'शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥'

ज्याच्याजवळ शम, दम, शौच, क्षमा, सरळता, ज्ञान, विज्ञान आणि आस्तिक बुद्धी आहे तो ब्राह्मण.

'शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥'

ज्याच्याजवळ शौर्य, तेज, धृती, चतुरता, शत्रूला पाठ न दाखविण्याची हिंमत, दान आणि स्वामित्व वृत्ती असते तो क्षत्रिय.

'कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥'

ज्याच्याजवळ कृषी, गोपालन आणि व्यापार असतो तो वैश्य. ज्याच्याजवळ सेवाभाव असेल तो शूद्र.

'श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥'

आपल्या स्वकर्मात तत्पर पुरुषाला आत्मसिद्धी प्राप्त होते. ही आत्मसिद्धी कशी प्राप्त होते तर विश्वव्यापक भगवंताचे स्वकर्माने पूजन केल्यावर होते. इथे स्वकर्म म्हणजे स्वधर्म होईल. आपले स्वकर्म निष्ठेने केल्यामुळे नैष्कर्म अवस्था प्राप्त होते. म्हणजे कर्म करूनही कर्म न केल्याची अनुभूती.

'जे धावतया कर्माची लाणी, नैष्कर्म बोधाची खाणी ।
जे भूकेलिया धनी, साधनाची ।'

ही अवस्था यावी. त्यासाठी काय करावे तर-

'विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानस ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥'

नैष्कर्म अवस्थेसाठी नित्य स्वकर्मासोबत थोडा एकांतवास, अल्प आहार आणि ध्यान योग करावा.

'अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ॥'

अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध, संग्रह यांचा त्याग करून हे माझे, ते तुझे असा ममत्व भाव त्यागून अंत:करणात शांती असणारा पुरुष आत्मसिद्धी होण्यास पात्र ठरतो. असा पुरुष कायम ब्रह्मानंदात असतो. अखेर त्याला शाश्वत, अविनाशी असे वैष्णव पद प्राप्त होते. भगवंत पुढे सांगतात-

'मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्वमहाङ्कारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ॥'

म्हणून हे अर्जुना, माझ्यात चित्त स्थिर कर. माझ्या कृपेने भवसागर पार करशील. कर्माला नैष्कर्म कर आणि युद्ध कर.

'यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥'

मी युद्ध करणार नाही हा तुझा अहंभाव समज. तसेही युद्ध तुझ्या हातात नसून तुझी धारण झालेली प्रकृतीच आता तुला युद्धासाठी प्रवृत्त करेल.

'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारुढानि मायया ॥'

ईश्वर सर्वांच्या हृदयात विराजमान आहे. तोच मायेच्या साहाय्याने तुझे विहित कर्म करून घेईल. 'मी कर्ता म्हणशी, तेणे तू दुःखी कष्टी होशी'. म्हणून श्री कर्ता म्हण.

'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥'

हे अर्जुना, तू अनन्यभावाने शरण जा. कर्ता-करविता भगवंतच असल्याचे ध्यानात ठेवून यथायोग्य कर्म तू कर, हे सांगून भगवंत समारोपीय बोलतात.

'इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥'

तू मला अत्यंत प्रिय असल्यामुळे मी तुला हे गुह्यतिगुह्य ज्ञान तुला सांगितले. हे अर्जुना! तू माझ्यात मन ठेवणारा, माझे पूजन करणारा भक्त हो. त्यामुळे तू माझ्याच स्वरूपाला प्राप्त होशील, हे सत्य मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो आहे.

'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥'

सर्व धर्म म्हणजे तुझ्या गुणकर्मानुसार करत असलेल्या कृतींचा परित्याग करून केवळ मलाच शरण जा. मी तुला मोक्ष प्राप्ती करून देईन. हे गीताज्ञान मी तुला दिले आहे, पण हे तत्त्वज्ञान तू अभक्ताला, माझी निंदा करतो त्याला मुळीच देऊ नको. जो माझ्यावर नितांत श्रद्धा ठेवून हे गीतातत्त्व इतर भक्तांना सांगतो, तो माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतो. अशा पुरुषाहून अधिक प्रिय मला कोणीही नाही. जो या गीतेचे अध्ययन करतो तो माझी पूजाअर्चाच करतो. जो पुरुष श्रद्धायुक्त अंत:करणाने केवळ श्रवण करेल तो पापमुक्त होऊन पुण्यात्मा बनेल. हे अर्जुना! मला सांग, तुझा मोह नष्ट झाला का? त्यावर अर्जुन हृदयातून त्वरित उत्तरतो-

'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वप्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥'

तेव्हा अर्जुन म्हणतो की, हे अच्युता! माझा मोह पूर्णतः नष्ट झाला असून तुझ्या वचनाचे मी तंतोतंत पालन करेल. इथे कृष्णार्जुन संवादाची सांगता होते. आपल्याला हे माहीत आहे की, हा सर्व संवाद संजय धृतराष्ट्राला ऐकवत होता. हर्षित होऊन संजय धृतराष्ट्राला स्पष्टच बोलला-

'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥'

की हे राजा! जिथे योगेश्वर कृष्ण आहेत आणि धनुर्धारी अर्जुन आहेत तेथे श्री, विजय, वैभव व निश्चल नीती आहे. संजय धृतराष्ट्राला हेच समजावून सांगताहेत की, हे राजन, विजय पांडवांचाच होणार आहे. कारण ईश्वर त्यांच्यासोबत आहे. शक्य असेल तर अजूनही युद्ध थांबव. पण धृतराष्ट्र प्रवृत्ती राक्षसी प्रवृत्ती आहे. श्रीमद्भगवद्गीतेची सुरुवात धृतराष्ट्राने केली. सांगता संजयाने केली. मध्ये कृष्ण-अर्जुन संवाद आहे. ज्ञानेश्वरीत ओवी आहे-

'गुंतलो होतो अर्जुन गुणे । मुक्त जाहलो तुझिया गुणे ।
आता सांगणे पुसणे । काहीच न लगे !'

आपल्या सर्वांमध्ये धृतराष्ट्र नावाचा एक गुण किंवा प्रवृत्ती आहे. संजय नावाचा एक गुण किंवा प्रवृत्ती आहे. अर्जुन नावाचा एक गुण असतो आणि आपल्यातच श्रीकृष्ण नावाचाही गुण असतो. श्रीगीता म्हणजे धृतराष्ट्र प्रवृत्तीकडून संजय प्रवृत्तीकडे, संजय प्रवृत्तीकडून अर्जुन प्रवृत्तीकडे आणि अर्जुन प्रवृत्तीकडून श्रीकृष्ण प्रवृत्तीकडे जाणे. व्यष्टी ते परमेष्ठी अशी विकासात्मक उकल म्हणजे श्रीमद्भगवद्गीता होय.

९८२२२६२७३५

वाचक पत्रे

सोन्या-चांदीची घसरण सामान्यांना दिलासादायक

मागील काही महिन्यांपासून सोन्या-चांदीच्या दराने उच्चांकी झेप घेतली आहे. मात्र, दिवाळीनंतर सोन्या-चांदीच्या दरात घसरण पाहायला मिळत आहे. दीपावली सणानिमित्त सोने-चांदी खरेदी करण्याकडे सामान्य ग्राहकांचा ओढा असतो. त्यामुळे दरातही वाढ होत असते. वाढत्या मागणीमुळे सोन्या-चांदीच्या दरात ऐतिहासिक वाढ झाल्याचे दिसून आले. मध्यमवर्गीय जनतेसाठी ही दरवाढ अतिशय अनपेक्षितच होती. परंतु, आता सणासुदीचा हंगाम संपल्यानंतर सोने आणि चांदी यांची झळाळी कमी होताना दिसत आहे. यापुढील काळात किमती आणखी घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. युरोपपासून ब्रिटनपर्यंत व न्यू यॉर्कपासून मुंबईपर्यंत सोन्या-चांदीच्या दरात घसरण सुरू आहे. तेजीचे निशाण फडकावणाऱ्या सोन्या-चांदीची घसरणीकडे होत असलेली वाटचाल चर्चेचा विषय ठरत आहे. त्यामागच्या कारणांचा शोध घेता जागतिक पातळीवरील टॅरिफ तणाव कमी होत असल्यामुळे सोन्या-चांदीचे दरही सामान्यांच्या आटोक्यात येत असावेत. सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने खरेदी करण्याकडे भारतीय ग्राहकांचा कल राहिला आहे. अतिसामान्य कुटुंबातील व्यक्तीदेखील मुला-मुलींच्या लग्नानिमित्त तोळा-दोन तोळे सोने खरेदी करीत असतात. परंतु मागील काही महिन्यात सराफा बाजाराकडे न फिरकणारा ग्राहक दर घसरणीमुळे पुन्हा परतू शकतो. सणासुदीनंतर मागणी कमी झाल्यामुळे ही दर घसरण सुरू असली पाहिजे.

भारतीय महिलांना सोन्याच्या दागिन्यांचा प्रचंड सोस असल्याचा नेहमीच आक्षेप घेतला जातो. भारतीय कुटुंबात परंपरेनुसार स्त्रीधन म्हणूनदेखील सोन्याच्या दागिन्यांना महत्त्व आहे. या पृष्ठभूमीवर भारतीय ग्राहक कायमच सोने-चांदी बाजाराकडे आकर्षित होत आला आहे. त्याचबरोबर भारतीयांनी ही आवड लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात आपल्या देशात सोन्याची तस्करीही होत आली आहे. गुंतवणुकीसाठी सोने खरेदी करणाऱ्या प्रवृत्तीपेक्षा सामान्य ग्राहकांना विवाह कार्यानिमित्त दागिन्यांची करावी लागणारी खरेदी हीच बाजारातील तेजीचे कारण करत आले आहे. सध्या सुरू असलेली सोन्या-चांदीच्या दरातील घसरण अशीच राहावी, ही सामान्य ग्राहकांची अपेक्षा असली तरी आगामी लग्नसराईचा हंगाम पाहता सोने आणि चांदीच्या दरांमध्ये वाढदेखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रा. मधुकर चुटे /९४२०५६६४०४८

वारकरी संप्रदायाला वादात ओढू नका

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. येथे अनेक संत झाले. त्यांचे वेगवेगळे संप्रदाय आहेत. प्रत्येक संप्रदयाचे कार्य, नियम त्या संताच्या आचरणानुसार आहे. वारकरी संप्रदाय खूप जुना व मोठा आहे. त्या संप्रदायामध्ये बुवाबाजी, अंधश्रद्धा व भक्तवर्गात भेदभाव नाही. सर्व संतांचे वचन बोले तैसा चाले असेच आहे. परंतु बुवाबाजी, फसवणूक झालेल्या लोकांनी वारकरी संप्रदायाला दोष दिला. एका कीर्तनकाराच्या मुलीचा साखरपुड्याच्या कार्यक्रमाला सुद्धा वारकरी संप्रदायाशी जोडण्यात येत आहे, हा सर्व प्रकार चुकीचा आहे. सध्या किती जण संतांच्या वचन, प्रथेनुसार वागतात हाच प्रश्न आहे. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असलेले मानव सर्व क्षेत्रामध्ये भेटतील. तेव्हा वारकरी संप्रदायाला कुठल्याही वादात ओढू नये, हीच अपेक्षा.

मुकुंद काकीरवार/८८०६९९२७७८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

आजचे संघगीत-९४

बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५

यश तुझे झळकु दे दिगंतरी तू विसरु नको राष्ट्रास तरी

यश तुझे झळकु दे दिगंतरी तू विसरु नको राष्ट्रास तरी ॥धृ.॥

जीवनकलिका पूर्ण फुलू दे पावित्र्याचे तेज चढू दे
देशप्रीतिचा गंध भरू दे जीवन होइ व्यर्थ ना तरी ॥१॥

विसर जिवाला नच ध्येयाला विसर घराला नच देशाला
विसरु नको रे परंपरेला उज्ज्वल मनि इतिहास धरी ॥२॥

भूल पडावी भ्याडपणाची भूल पडावी अहंपणाची
भूल नको पण कर्तव्याची स्वार्थाची ती भूल बरी ॥३॥

धगधगती तत्त्वावर निष्ठा मान जिवाची हीच प्रतिष्ठा
अनुसरतील जन कळुनी येता तत्त्वपुजारी खरोखरी ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

महत्वाचे...

स्व.विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानच्या सामुदायिक विवाह सोहळ्यात २६ जोडप्यांचे होणार शुभमंगल

सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर-

स्व.विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानच्या वतीने मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे हे दुसरे वर्ष असून बुधवार दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजून ४२ मिनिटे या गोरज मुहूर्तावर हा विवाह सोहळा खा. लिंगराज वल्याळ मैदान कर्णिक नगर सोलापूर येथे पार पडणार आहे. आपणही समाजाला काहीतरी देणे लागतो, या भावनेतून आ. देवेंद्र कोठे यांनी सर्वधर्म सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्याचे महत्त्वाचे कार्य गेल्या काही वर्षांपासून सुरू ठेवले आहे. स्व.विष्णुपंत कोठे प्रतिष्ठान यांच्या वतीने दरवर्षी सोलापूर शहर जिल्ह्यातील गोरगरीब गरजवंतांसाठी मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. ज्या परिवाराला लग्न करण्याचा अनेक अडचणी येतात. अशा परिवारांना या सामुदायिक विवाह सोहळ्यातून एक आनंदाची पर्वणी मिळणार आहे. सालाबाद प्रमाणे यंदाच्यावर्षी देखील हा विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कर्णिक नगर येथील वल्याळ मैदानावर हा सामुदायिक विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न होणार असून या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन आ. देवेंद्र कोठे यांनी केले आहे.

पैसे देण्याच्या कारणावरुन दमदाटी करत घरावर फेकले दगड; तीन जणांवर गुन्हा

सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

पैसे देण्याच्या कारणावरून फिर्यादी इरण्णा शहाबादे यांना शिवीगाळ, दमदाटी करून रस्त्यावरील दगड उचलून घरावर फेकून बेडरूमची खिडकी तोडून वीस ते पंचवीस हजार रुपये चे नुकसान केले व तसेच मानवी जीवितास व सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती केल्याची फिर्याद शहाबादे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे.ही घटना २६ नोव्हेंबर रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास विशाल नगर जुळे सोलापूर येथे घडली.याप्रकरणी इराण्णा शहाबादे (वय-६७,रा. विशाल नगर,जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून केदार मुखे व इतर दोन इसमानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जाधव हे करीत आहेत.

राजकारण आणि पत्रकारिता पुस्तकाचे रविवारी प्रकाशन

सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

डॉ. रवींद्र चिंचोलकर लिखित 'राजकारण आणि पत्रकारिता' या पुस्तकाचे प्रकाशन सोहळा रविवार दिनांक ३० नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटर येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रकाशन सोहळ्यास माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, आ. सुभाष देशमुख हे प्रमुख पाहुणे आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सुधीर गव्हाणे हे प्रमुख वक्ते तर हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत येळेगावकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. राजकीय विश्लेषक राजा माने, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, डिजिटल मिडिया पत्रकार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष विजयकुमार बाबर, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक अदेप्पा यांची उपस्थिती राहणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील विद्या बुक्स पब्लिशर्सने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या सोहळ्यास उपस्थित रहावे, असे आवाहन प्रकाशक शशिकांत पिंपळापुरे, अ.भा. मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष पी.पी. कुलकर्णी यांनी केले आहे.

पॉलिटेक्निकच्या परीक्षा ४, ५ डिसेंबरला

सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

राज्यात २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपालिका, नगर परिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने (एमएसबीटीई) पॉलिटेक्निक अभ्यासक्रमाच्या लेखी परीक्षांच्या वेळापत्रकात आता बदल केला आहे. त्यामुळे १ व २ डिसेंबर रोजी निश्चित करण्यात आलेल्या या परीक्षा आता ४ आणि ५ डिसेंबरला होणार आहेत. निवडणुकांसाठी शैक्षणिक संस्थांच्या इमारती व वर्ग खोल्या सरकारने ताब्यात घेतल्या आहेत. निवडणुकीच्या आधीचा दिवस, प्रत्यक्ष मतदान आणि त्यापुढील एक दिवस या तीन दिवसांत परीक्षा घेणे शक्य होणार नाही. यापूर्वी पॉलिटेक्निक ची परीक्षा १ आणि २ डिसेंबर रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. मात्र निवडणुकीमुळे आता ही परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुधारित वेळापत्रकानुसार १ डिसेंबर रोजी होणारी परीक्षा ४ डिसेंबरला, तर २ डिसेंबरला होणारी परीक्षा ५ डिसेंबरला होईल. त्यानुसार परीक्षेचे नियोजन करावे, असे आवाहन एमएसबीटीईचे सचिव उमेश नागदेवे यांनी केले आहे. हा बदल मुंबईसह पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या विभागीय कार्यक्षेत्रात लागू होणार आहे.

सोलापुर महानगरपालिका, सोलापुर

इंद्रभुवन पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापुर - ४१३ ००१

Expression Of Interest

सोलापूर शहरात VMS (Variable Messenger System) व अनुषंगिक आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संरचना उभारणे व त्यापासुन उत्पन्नाचे स्त्रोत उभारण्याकरिता इच्छुक व पात्र संस्था/जाहिरात एजन्सी/CSR संस्थांकडून Expression of Interest (EOI) मागविण्यात येत आहे. तरी अनुभवी अभिकर्ते, इच्छुक व्यक्ती / संस्था यांनी दि.05/12 / 2025 अखेर कार्यालयीन वेळेत भुमी व मालमत्ता विभागाकडे बंद लिफाफ्यामध्ये आपले अर्ज सादर करावे. EOI बाबतची संपुर्ण माहिती हि आपणास www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे.

टीप :

१. हि जाहिरात फक्त EOI मागविण्यापुरती असुन, यामधुन कोणत्याही प्रकारे थेट कामगिरीचे /कंत्राटाचे आश्वासन दिले जात नाही.

२. अर्जासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र (असल्यास), बँक खात्याचा तपशील, मागील ०३ वर्षाचे आयकर विवरण प्रमाणपत्र, सहभागी होणेकामी र.रु.५०००/- प्रवेश फी भरुन त्याची पावती व र.रु.५०,०००/- चे डिमांड ड्राफ्ट सादर करावे.

३. कोणतेही अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार मा. आयुक्त, सो.म.पा. यांनी राखुन ठेवला आहे.

४. अर्ज दाखल झालेनंतर मा. आयुक्त यांचे आदेशानुसार पुढील उचित कार्यवाही ठेवणेत येईल.

सही/-
(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)
उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी
भुमी व मालमत्ता कार्यालय, सो.म.पा.

संजवाडमधील साठवण तलाव फोडणाऱ्यावर कारवाईची मागणी

लाखो लिटर पाणी वाया

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड येथील व्हनमाने वस्तीजवळील साठवण तलावाला अज्ञात व्यक्तीने फोडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे तलावातील लाखो लिटर पाणी गेल्या दोन-तीन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात वाया जात आहे. त्यामुळे भविष्यात पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

संजवाड गावासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा साठवण तलाव फोडल्यामुळे संतापलेल्या ग्रामस्थांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन तात्काळ अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची आणि त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याबाबत नागरीकांनी आमदार सुभाष देशमुख व पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्याकडे तक्रार करण्यात आली आहे.

व्हनमाने वस्तीजवळील हा तलाव परिसरातील शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाचा स्त्रोत आहे. मात्र, तलावाच्या बांध फोडल्यामुळे पाणी मोठ्या प्रमाणावर वाहून जात आहे. पाण्याची ही नासाडी पाहता, ऐन गरजेच्या वेळी ग्रामस्थांना पाण्याच्या तीव्र टंचाईला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे.

तलावाला फोडून पाणी वाया घालवणाऱ्या अज्ञाताचा शोध घेऊन तातडीने गुन्हा दाखल करावा , पाण्याच्या या कृत्रिम संकटासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीवर कडक कायदेशीर कारवाई करावी व संबंधितांनी त्वरित तलावाच्या दुरुस्तीचे काम हाती घेऊन पाण्याची नासाडी थांबवावी या मागणीसाठी गावातील नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडे तक्रार केली असून, प्रशासनाने आणि पोलिसांनी या गंभीर घटनेची नोंद घेऊन त्वरित कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेच्या वतीने माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

महापालिकेच्या वतीने माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त महानगरपालिका इंद्रभुवन आवारातील यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यलयात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस विभागीय अधिकारी सुनिता हिबारे व कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहायक अभियंता शाम कन्ना, कनिष्ठ अभियंता, सुचेता आमणगी, किशोर फत्तेवाले, आकाश पाटील सहाय्यक कनिष्ठ अभियंता गौरव सस्ते,अशोक खडके, सिद्राम तम्मिगार उपस्थित होते.

५४ मीटर रस्ता, ब्रिज परिसरातील कामांना गती द्या : डॉ. ओम्बासे

छत्रपती शिवरायांच्या पुतळा सुशोभीकरणाचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

शहरातील ५४ मीटर रस्ता तसेच या रस्त्यावर असलेल्या ब्रिज परिसरातील कामांना गती द्या, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर सुशोभीकरणाचे काम ३० डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्यात यावी, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी विभागीय कार्यालय क्रमांक ६ च्या हद्दीत विविध महत्त्वपूर्ण विकासकामांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या. यावेळी नगर अभियंता सारिका आकुलवार, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, विभागीय अधिकारी जावेद पानगल, प्रकाश दिवाणजी तसेच प्रकाश सावंत, मनोज जाधव, सागर खरोसेकार आदी उपस्थित होते.

५४ मीटर रस्ता तसेच ५४ रस्ता-ब्रिज परिसरातील सुरू असलेल्या कामांची पाहणी करताना आयुक्तांनी त्या कामांना गती देण्याचे आदेश दिले. नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीत अडथळा येऊ नये म्हणून रस्त्यांची

कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यावर त्यांनी भर दिला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे सुशोभीकरण सुरु असून आज छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात सुरू असलेल्या सुशोभीकरण कामांचीही आयुक्तांनी पाहणी केली.

हे काम अंतिम टप्प्यात असून ३० डिसेंबरपर्यंत सर्व कामे पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना संबंधित कंत्राटदारांना केली. हा परिसर अधिक आकर्षक व व्यवस्थित होण्यासाठी विविध घटकांची पाहणी करण्यात आली. त्यानंतर एक्जीबिशन सेंटर समोरील महापालिकेच्या नियोजित वर्किंग वुमेन्स हॉस्टेल तसेच रूपा भवानी मंदिराच्या मागील बाजूस प्रस्तावित भक्त निवास प्रकल्पांची पाहणी करून आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. प्रकल्पांसाठी आवश्यक कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याचा आदेशही देण्यात आले.

महानगरपालिका हद्दीत सुरू असलेल्या सर्व विकासकामांचे दर्जेदार व वेळेत पूर्णत्वासाठी प्रशासनाकडून सातत्याने पाहणी करण्यात येत असल्याचे आयुक्तांनी यावेळी सांगितले.

सार्वजनिक शौचालयाची आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी

दमाणीनगर परिसरातील सार्वजनिक शौचालयाची आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी केली. येथे शौचालय दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली असून लाईट व्यवस्था, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नियमित देखभाल याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच थोबडे वस्ती येथील सार्वजनिक शौचालयालाही भेट देत स्वच्छता व सोयीसुविधांची तपासणी केली. आवश्यक तेथे तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

प्रारुप मतदार यादीवर मंगळवारी ७५ हरकती

महापालिका निवडणूक

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर महापालिका निवडणूक कार्यालयाकडे आज दिवसभरात एकूण ७५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

पहिल्या दिवशी गुरुवार दि. २० नोव्हेंबर रोजी एकही हरकत आली नव्हती. शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी एकूण ६ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयात प्राप्त झाल्या होत्या. दरम्यान, दि. २४ नोव्हेंबर रोजी एकूण ५३ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. आज मंगळवारी ७५ हरकती प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागातून वगळण्यात यावीत आणि संबंधित प्रभागात समाविष्ट करण्याबाबतचे ७१ अर्ज तर इतर ३ अर्ज दाखल झाले आहेत. मतदार यादीत काही लेखनिकच्या चुका असल्याने त्याबाबतचा एक अर्ज आला आहे. आज एकाच दिवशी एकूण ७५ हरकती व सूचनांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. दि. २० ते २५ नोव्हेंबर दरम्यान एकूण १३४ हरकती व सूचना आल्या आहेत.

प्रसिध्द प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि.२० ते २७ नोव्हेंबर २०२५ अखेरच्या कालावधीत नमूद कारणाकरीता हरकती / सूचना महापालिका निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय.सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले, संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नांवे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नांवे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ठ करणे या संदर्भात सूचना करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकत वर्णनः- डि व सब डी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील ता. उत्तर सोलापूर पैकी न्यु पाच्छा पेठ येथील जागा टी. पी. स्कीम नं. १ पैकी प्लॉट नंबर २३, सि.स.नं. १०४३२ पैकी, सब प्लॉट क्र. ५७ कच्चा विट बांधकाम त्यांची हद्द पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर ४५ व उत्तरेस ४५ दक्षिणोत्तर पुर्व ५५ फुट पश्चिमेस ५५ यांचे असे एकूण २४७५ चौ. फुट अथवा ९२.९३ चौ. मी. इतके जागा असून सदर जागेचे मालक १०X१८ ची (१) एक खोली पन्हाळी पत्र्याची शेड मारलेली घरजागा आहे. त्या घरजागेपैकी २३X५५ असे एकूण १२६५ चौ. फुट इतकी आहे.

यासी चतुः सिमा पुर्वेस - ५८ ची जागा, पश्चिमेस गट नं. ५६ ची जागा, दक्षिणेस - रस्ता, उत्तरेस- ४४ ची जागा. येणेप्रमाणे चतुः सिमेतील घरजागा ही श्री. अंबादास नारायण आरगोंडा यांचे कब्जे मालकी वहीवटीचे असून. सदर घरजागा आमचे अशिलास कायम खुषखरेदी करून देण्याचे ठरलेली आहे. आमच्या अशिलाकडून तसा काही इसारा रक्कम स्विकारुन जागेची 'इसारापावती' लिहून देलेली आहे. तसेच सदर घरजागा निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे आशिलांस दिलेली आहे. सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद घरजागेवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, टाच, जप्ती, मृत्यूपत्र, कुटुंबाचे वारसदार, नातेवाईक अगर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अगर हक्क असल्यास अथवा सदर घरजागेबाबत कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद, विवाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. हा खरेदीपूर्वजाहीर नोटीस दिली तारीखः २५/११/२०२५.

सही/-
ॲड. मोहन सुदर्शन कुरापाटी
बी. कॉम (स्पेशल), एलएल. बी., एलएल.एम., जी.डी.एस. ॲन्ड ए, ए. एस. डब्लू,
ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी
ॲड. अनिल अंबादास वासम
एम.ए., एम.सी.जे., एल.टी.सी., एलएल. बी., एम.एस.डब्लू
ॲड. शामसुंदर पेंटप्पा आडम
बी.ए. एलएल.बी.
ऑफिस पत्ता :- जिल्हा व सत्र न्यायालय आवार समोर ५ स्टार हॉटिल समोर, सोलापूर
मो.नं. ८८८८४४५२८१, ९३७३५७९१८९, ७८४३०८१३४३.

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाची 'महापारेषण'ला तीन राष्ट्रीय पारितोषिके जाहीर

तभा वृत्तसेवा
मुंबई, दि. २३ नोव्हेंबर -

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील तीन पारितोषिके नुकतीच जाहीर झाली. यामध्ये सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँड पीआर, सर्वोत्कृष्ट फिल्म (इंग्रजी) व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला आहे. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे कौतुक केले आहे.

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया ही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणारी देशातील सर्वोत्तम संस्था आहे. डेहराडून (उत्तराखंड) येथील हॉटेल एमराल्डमध्ये १३ ते १५ डिसेंबरला होणाऱ्या ४७ व्या आंतरराष्ट्रीय जनसंपर्क महोत्सवाच्या उदघाटन समारंभात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. महापारेषणच्या जनसंपर्क विभागाची विविध पुरस्कारासाठी निवड करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत व बहिर्गत संपर्कासाठी राबविलेले उपक्रम, महापारेषण समाचार या गृहमासिकात केलेले डिजिटल बदल, क्यू-आर कोड तसेच इतर डिजिटल माध्यमांव्दारे सकारात्मक पध्दतीने वापर केला आहे.

नागरिकांनी उच्च दाब वीजवाहिनीची काळजी कशी घ्यावी, सेवा पंधरवड्यात राबविलेले विविध सामाजिक उपक्रम, महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी सुरळीत वीजपुरवठ्यासाठी केलेली कामगिरी, ड्रोनच्या सहाय्याने दुर्गम भागात अखंड वीजपुरवठ्यासाठी केलेली कामगिरी ही फिल्ममध्ये अनिमेशनचा वापर करून दाखविली आहे. या फिल्मची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे.

महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने क्यू-आर कोडच्या माध्यमातून नोकरभरतीच्या जाहिराती डिजिटल स्वरूपात केल्या. डिजिटल ई-न्यूजलेटर फ्लिपबुकच्या स्वरूपात मांडले. जनसंपर्क क्षेत्रात १४ राष्ट्रीय पुरस्कार व एक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळविणारी महापारेषण ही महाराष्ट्रातील पहिली शासकीय कंपनी ठरली आहे.

नवकल्पना व प्रभावी जनसंपर्काचा राष्ट्रीय सन्मान

"पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाकडून महापारेषणला एकाच वेळी तीन राष्ट्रीय पारितोषिके मिळणे, ही आमच्या जनसंपर्क विभागाच्या नवकल्पनाशील कार्यपध्दतीची आणि टीमवर्कची दखल आहे. डिजिटल माध्यमांचा सकारात्मक वापर, पारदर्शकता आणि प्रभावी जनसंपर्क यामुळे महापारेषणने राष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. जनसंपर्क विभागाचे हे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे."

- डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण

मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
यांत्रिक कामे

निविदा सूचना क्रमांक GEM/2025/B/6901048 दिनांक-24.11.2025

डीआरएम(एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित फर्म्स/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. 1) कामाचे नाव व त्याचा परिसर: सोलापूर विभागातील पंढरपूर स्थानकावरील प्लॅटफॉर्म रिटर्न (RBPC)/टर्मिनल यांत्रिकीकृत साफसफाई व पाणीपुरवठा करण्याचे कंत्राट तीन वर्षांच्या कालावधीसाठी रत्नजडीत कर्मचारी वर्गाच्या माध्यमातून मनुष्यबळावर देण्यात आले 2) निविदा प्रणाली: दोन पॅकेट प्रणाली. 3) कामाची अंदाजे किंमत: रु. 1,06,00,345.92/- 4)निविदा फॉर्मची किंमत: शून्य 5) निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता: डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. 6) जमा करावयाची बयाणा रक्कम: रु. 2,03,010/- 7) काम पूर्ण करण्याचा कालावधी: काम सुरू झाल्यापासून तीन वर्षे 8) निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: 17.12.2025 सकाळी 10.00 वाजता. 9) निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 17.12.2025 सकाळी 10.30 वाजता. 10. वेबसाइट विवरण आणि सूचना फलक स्थान जिथे निविदाची संपूर्ण माहिती पाहता येईल : www.gem.gov.in/ ANJ-66

आपल्या जनावरांना रेल्वे लाईन पासून अंतर ठेवा.

मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
संकेतस्थळ काम

डीआरएम (एस अँड टी) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या / कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. क्रमांक: 1 कामाचे नाव त्याच्या परिसर : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध स्थानकांवर फिरणारे क्षेत्र आणि संपर्क रस्ते यांच्यासह वस्तूंच्या शेडच्या विकासासाठी एस अँड टी केबलचे संरक्षण/स्थलांतर आणि एफओआयएस कनेक्टिव्हिटीची तरतूद. निविदा क्रमांक: SUR-N-T-2025-26-26 कामाची किंमत: रु. 60,74,704.12 निविदा फॉर्मची किंमत: शून्य जमा करावयाची बक्षिसे: रु. 1,21,500.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 8 महिने www.ireps.gov.in वर 18.12.2025 रोजी 15.30 वाजता निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ईमेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. ईमेस्ट मनी (EMD) चे पेमेंट फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या. ANJ-65

आपल्या जनावरांना रेल्वे लाईन पासून अंतर ठेवा.

IDFC FIRST Bank Limited
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक	कर्जाचे प्रकार	कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	कलम १३ (२) सूचना तारीख	कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम
1	153290199	मालमत्तेवर कर्ज	१. लक्ष्मण हरिदास जाधव २. जयश्री जाधव	11/10/2025	रुपये 7,68,170.57/-
मालमत्तेचा पत्ताः ग्रामपंचायतीचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल मिलकट क्रमांक १२१, एकूण परिसर २००० चौरस फूट, कोंडबावी गावात स्थित, ग्रामपंचायतीच्या हद्दीत कोंडबावी, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि सीमाः पूर्वः मनोज कांबळे पश्चिमः रस्ता उत्तरः रस्ता आणि सतीश जाधव दक्षिणः राम मदने					
2	138492520	मालमत्तेवर कर्ज	१. पांडुरंग यादव २. गौरी पांडुरंग यादव	27/09/2025	रुपये 8,44,366.63/-
मालमत्तेचा पत्ताः बांधकामाचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल मालमत्ता ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ४८२/२, क्षेत्रफळ १८४० चौ. फूट, बांधलेले क्षेत्रफळ १४४० चौ. फूट, गाव येथे स्थितः कोंडबावी, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि सीमाः-पूर्वः रस्ता पश्चिमः खुली जागा उत्तरः खुली जागा दक्षिणः दत्तू यादव					
3	138198653	मालमत्तेवर कर्ज	१. रविंद्र लक्ष्मण वाघमारे २. रुक्मिणी रविंद्र वाघमारे	30/09/2025	रुपये 10,18,784.71/-
मालमत्तेचा पत्ताः बांधकामाचा सर्व तुकडा आणि पार्सल मालमत्ता बेअरिंग ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ४६६, एकूण जमीन क्षेत्रफळ २४०० चौ. फूट आणि बांधलेले क्षेत्रफळ २००० चौ. फूट, , गाव मौजे येथे स्थितः कोंडबावी, तालुकाः माळसिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि सीमा अशी आहेः- पूर्वः विठ्ठल वाघमारे पश्चिमः रस्ता उत्तरः खुली जागा दक्षिणः रस्ता					
4	164193772	मालमत्तेवर कर्ज	१. सागर राजेंद्र लवटे २. सिंधू राजेंद्र लवटे	11/10/2025	रुपये 7,63,919.69/-
मालमत्तेचा पत्ताः सर्व तो तुकडा आणि पार्सल ग्रामपंचायत मिल्कट क्रमांक २८४, एकूण मोजमाप क्षेत्र. २०३४ चौ. फूट., गाव आळेगाव, खुर्द येथे वसलेले, ग्रामपंचायत आळेगाव, खुर्द, तालुकाः माढा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१२, आणि सीमाः पूर्वः दत्तात्रय माधव गोसावी पश्चिमः शिवाजी चंद्रकांत निकम उत्तरः ग्रामपंचायत आळेगाव, दक्षिणः येडू रोड					
5	157444232	मालमत्तेवर कर्ज	१. स्वाती संजय माने २. सुमित संजय माने	08/08/2025	रुपये 8,61,791.51/-
मालमत्तेचा पत्ताः विभाग सोलापूर, उपविभाग माळशिरस येथे असलेल्या मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, ग्रामपंचायत चाकोरच्या हद्दीत, ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ४६० चा भाग, एकूण क्षेत्रफळ २००० चौरस फूट, आणि, पूर्वः रस्ता पश्चिमः मोकळा परिसर उत्तरः गायगोठा दक्षिणः जालिंदर माने (घर)					

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : २६/११/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

महत्त्वाचे

महिला प्रीमियर लीगसाठी खेळाडूंचा लिलाव उद्या

नवी दिल्ली : गुरुवारी नवी दिल्ली येथे होणाऱ्या महिला प्रीमियर लीग २०२६ च्या मेगा लिलावात आठ अव्वल खेळाडू प्रमुख भूमिका बजावतील. महिला एकदिवसीय विश्वचषकात स्पर्धावीर म्हणून नव्याने नावाजलेली भारताची अष्टपैलू दीप्ती शर्मा मोठ्या बोली लागण्याची अपेक्षा आहे. गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने तिला करारमुक्त केल्यानंतर या गटात वेगवान गोलंदाज रेणुका सिंग ठाकूर ही एकमेव भारतीय आहे. गत हंगामात दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व करणारी मेग लॅनिंग आणि युपी वॉरियर्सचे नेतृत्व करणारी एलिसा हिली ही परदेशी खेळाडूंची नावे आहेत. २०२६ च्या लिलावासाठी अव्वल खेळाडूंची मूळ किंमत ५० लाख रुपये आहे, यात सोफी डिव्हाईन (न्यूझीलंड), सोफी एक्सेलस्टोन (इंग्लंड), अॅलिसा हिली (ऑस्ट्रेलिया), अमेलिया केर (न्यूझीलंड), मेग लॅनिंग (ऑस्ट्रेलिया), दीप्ती शर्मा (भारत) व रेणुका ठाकूर (भारत) यांचा समावेश आहे.

सक्सेना एएफएलमध्ये खेळू शकतो

नवी दिल्ली : तीग्व्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत निवड झाल्यानंतर भारतीय वंशाचा किशोर जय सक्सेना अव्वल श्रेणीच्या

ऑस्ट्रेलियन फुटबॉल लीग (एएफएल) क्लब कॉलिंगवुड एफसीकडून खेळू शकतो. येत्या एएफएल हंगामाची सुरुवात पुढील वर्षी मार्चमध्ये होईल. ऑस्ट्रेलियात भारतीय पालकांच्या पोटी जन्मलेल्या १८ वर्षीय या खेळाडूला जर्सी क्रमांक देण्यात आल्यानंतर क्लबकडून खेळण्याची उज्ज्वल संधी आहे. कॉलिंगवुडच्या नवीन खेळाडूंची नावे २०२६ च्या हंगामापूर्वी निश्चित झाले आहेत, असे कॉलिंगवुड एफसीने म्हटले आहे. जय सक्सेना आपल्या पदार्पणाच्या वर्षात काव्या आणि पांढऱ्या रंगाची ४३ क्रमांकाची जर्सी परिधान करेल. १९७० च्या दशकातील रिकी बरहमने या क्रमांकाची जर्सी परिधान केली होती, तर प्रीमियरशिपचा कर्णधार निक मॅक्सवेलने आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात ४३ क्रमांकाची जर्सी परिधान केली होती, असे त्यात म्हटले आहे. कॉलिंगवूडने २०२५ चा हंगाम चौथ्या स्थानावर संपवला. त्यांनी प्राथमिक अंतिम फेरीत प्रवेश केला, परंतु ब्रिस्बेन लायन्सकडून त्यांचा पराभव झाला.

सॉफ्टबॉल सिनियर पुरुष व महिला निवड चाचणी स्पर्धा उद्या

सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या वतीने सॉफ्टबॉल सिनियर पुरुष व महिला शहर व जिल्हा निवड चाचणी स्पर्धा गुरुवार २७ नोव्हेंबर रोजी श्री म ल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर विमानतळ समोर येथे दुपारी ४ वाजता होणार आहे. खेळाडूंनी आधार कार्डची झेरॉक्स व आवश्यक साहित्यसह मैदानावर उपस्थित रहावे यामधून निवडलेला संघ हा ४ ते ७ डिसेंबर अमरावती येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेत सहभागी होईल. खेळाडूंनी मैदानावर संघटनेचे सचिव प्रा.संतोष खेंडे ९८५०६६६७९५ अथवा गंगाराम घोडके ९४२३७२७२७७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष मा. सिद्धेश्वर पाटील, उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी यांनी केले आहे

सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या अनुष्काला राज्य कराटे स्पर्धेत कांस्य

सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

बारामती येथे झालेल्या शालेय राज्य कराटे स्पर्धेत सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या अनुष्का दीक्षित हिने १४ वर्षाखालील २२ किलो वजनी गटातून कांस्य पदक संपादिले. तिला क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर, प्रचिता जोगदंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ. राजशेखर येळीकर, अॅड. रेवणसिद्ध पाटील, चनबसप्पा नाडगौडा, प्रभुराज मैंदर्गीकर, विलास कारभारी, पशुपतिनाथ माशाळ, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे , पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

भारताला अजून ५२२ धावांची गरज

दक्षिण आफ्रिका दुसरा डाव ५ बाद २६० घोषित

गुवाहाटी, २५ नोव्हेंबर

येथे सुरु असलेल्या दुसऱ्या व अंतिम कसोटी क्रिकेट सामन्यात मंगळवारी ट्रिस्टन स्टब्स (९४) आणि टोनी डी झोर्झिने (४९) भारताच्या फिरकी आक्रमणाला आव्हान दिले आणि त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने आपला दुसरा डाव ५ बाद २६० धावांवर घोषित केला. त्यामुळे यजमानांना चौथ्या दिवशी विजयासाठी ५४९ धावांचे मोठे लक्ष्य मिळाले. लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने १५.५ षटकांत दोन गडी गमावित २७ धावा केल्या. भारताला अजूनही ५२२ धावांची गरज असून त्यांच्या हातात ८ फलंदाज शिल्लक आहेत. खेळ थांबला तेव्हा कुलदीप यादव व साई सुदर्शन खेळपट्टीवर नाबाद आहेत.

यशस्वी जयस्वाल १३ धावांवर जॅन्सनच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला, तर केएल राहुल ६ धावांवर बाद झाला. आता पाचव्या दिवशी घरच्या मैदानावर भारतासमोर कठीण आव्हान आहे- सामना वाचवणे आणि २-० पेक्षा १-० च्या फरकाने मालिका गमावणे हे आहे. भारतीय संघ सामना अनिर्णीत राखू शकतील का? हे आता उद्याच्या खेळावर व उर्वरित आठ फलंदाजांच्या कामगिरीवर अवलंबून असेल.

तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेने बिनबाद २६ धावांवरून पुढे आपल्या दुसऱ्या डावास सुरवात केली. ट्रिस्टन स्टब्स (९४), टोनी डी झोर्झिने (४९), सलामीवीर रायन रिकेल्टन (३५) व वियान मुल्डरच्या (नाबाद ३५) दमदार फलंदाजीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने ७८.३ षटकात ५ बाद २६० धावांवर आपला दुसरा डाव घोषित केला आणि भारतासमोर विजयासाठी ५४९ धावांचे लक्ष्य ठेवले.

ट्रिस्टन स्टब्स ९४ धावा

रवींद्र जडेजा ४ बळी

सकाळच्या सत्रात रवींद्र जडेजा व वॉशिंग्टन सुंदरने यश मिळविल्यामुळे दक्षिण आफ्रिकेची ३ बाद ७७ अशी स्थिती झाली होती. जडेजाने सलामीवीर रायन रिकेल्टन (६४ चेंडूत ३५ धावा) आणि एडेन मार्कराम (८४ चेंडूत २९ धावा) यांना बाद केले. सुंदरने कर्णधार टेम्बा बावुमाला (३) स्लीपवर नितीश कुमार रेड्डीकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. परंतु त्यानंतर ट्रिस्टन स्टब्स (१८० चेंडूत ९४ धावा) आणि डी झोर्झिने (६८ चेंडूत ४९ धावा) दृढ फलंदाजी करत १०१ धावांची भागीदारी करून संघाची स्थिती मजबूत केली. स्टब्सने पाचव्या गड्यासाठी वियान मुल्डरसोबत (३५ धावा) आणखी ८२ धावांची भागीदारी केली. भारताकडून अष्टपैलू रवींद्र जडेजाने ६२ धावांत ४ बळी, तर सुंदरने एक बळी टिपला.

(वृत्तसंस्था)

संगमेश्वर कॉलेजला शालेय राज्य स्पर्धेत सात पदके

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि २५ नोव्हेंबर-

शालेय राज्य तलवारबाजी व डायव्हिंग स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या खेळाडूंनी विविध प्रकारात सात पदके प्राप्त केले. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.

कामगिरी : तलवारबाजी : समृद्धी गणेश घाळे (वैयक्तिक व सांघिक सेबर मध्ये रौप्य), व्यंकटेश विजय खंडेलवाल (सेबरमध्ये रौप्य), यज्ञेश्वर रमेश पाटील (ईपीमध्ये रौप्य, आर्य दीपक कदम (फॉइलमध्ये कांस्य). **डायव्हिंग :** विपुल कुडक्याल (एक मीटर व तीन मीटरमध्ये रौप्य).

सुमित नागलची विजयी सुरुवात

ऑस्ट्रेलियन ओपन पात्रता फेरी

चेंगडू, २५ नोव्हेंबर

भारताचा अव्वल एकेरी टेनिसपटू सुमित नागलने मंगळवारी येथे चीनच्या मिंगहुई झांगविरुद्धच्या पहिल्या सेटमध्ये पिछाडीवर राहिल्यानंतर स्वत:ला सावरत ऑस्ट्रेलियन ओपन आशिया-पॅसिफिक वाईल्डकार्ड प्ले-ऑफच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

सहाव्या मानांकित नागलने सुरुवातीचा सेट गमावल्यानंतर संथ स्वत:ला सावरत पुढील दोन सेटमध्ये वर्चस्व गाजवले आणि २-६, ६-०, ६-२ असा विजय मिळवला.

सिचुआन इंटरनॅशनल टेनिस सेंटर येथे २४ ते २९ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या चेंगडू स्पर्धेत पुरुष आणि महिला एकेरी विजेत्यांना २०२६ च्या ऑस्ट्रेलियन ओपनच्या मुख्य ड्रॉमध्ये वाईल्ड कार्ड प्रवेश मिळेल.

भारतीय खेळाडूचा व्हिसाच्या प्रश्नामुळे आधीच त्याचा प्रवास अनिश्चित झाला होता. चीनमध्ये प्रवेश करण्यासाठी त्याचा प्रारंभिक अर्ज फेटाळण्यात आला होता, त्यामुळे नागलने चीनच्या अधिकाऱ्यांकडे सार्वजनिकपणे आवाहन केले.

नंतर हा प्रश्न सोडवण्यात आला आणि त्याला प्रवास करण्यास परवानगी देण्यात आली.

नागल आता उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित बु युनचाओकेते आणि झिजियांग यांग यांच्यादरम्यानच्या सामन्यातील विजेत्याशी खेळणार आहे.

(वृत्तसंस्था)

दुसऱ्या कसोटीपूर्वी ऑस्ट्रेलियाला दिलासा

हेझलवूड, कमिन्स सराव सत्रात परतले

सिडनी, २५ नोव्हेंबर

पुढील आठवड्यात इंग्लंडविरुद्ध दिवस-रात्र काळात होणाऱ्या दुसऱ्या ॲशेस कसोटी सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियाला मोठा दिलासा मिळाला आहे. जोश हेझलवूड आणि पॅट कमिन्सने मंगळवारी संघाच्या सराव सत्रात परतले असून त्यांनी गोलंदाजीचा कसून सराव केला.

पर्थमधील पहिल्या कसोटीच्या सहा दिवस आधी शेफील्ड शील्ड सामन्यात दुखापतीनंतर हेझलवूड दिसला नव्हता. पर्थ येथील पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने शनिवारी दोन दिवसांत आठ गड्यांनी विजय नोंदविला होता. ब्रेंडन डॉगेटने त्याची जागा घेतली होती.

कर्णधार कमिन्स सुद्धा पाठीच्या खालच्या दुखापतीमुळे अनुपस्थित होता, त्याची जागा स्कॉट बोलॅण्डने घेतली. स्थानिक माध्यमांनी सिडनी येथील क्रिकेट एनएससब्ल्यू मुख्यालयात दोन्ही खेळाडूंचे सराव करतानाचे छायाचित्रे सामायिक केली. त्यांनी वापरलेले चेंडू स्पष्ट होते. कमिन्स गुलाबी चेंडूने खेळत होता व हेझलवूड लाल चेंडूने खेळत होता.

४ डिसेंबर रोजी होणाऱ्या ब्रिस्बेन कसोटीसाठी हेझलवूडला मोठी शंका असताना, पर्थमध्ये नेट्समध्ये प्रभावी कामगिरी केल्यानंतर कमिन्सने आठवड्याच्या शेवटी सांगितले की माझ्याकडे अर्धी संधी आहे.सामन्याचा दिवस जवळ येईपर्यंत कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. हेझलवूड मालिकेदरम्यान कधीतरी उपलब्ध असेल, असे ऑस्ट्रेलियाचे प्रशिक्षक अँड्रू मॅकडोनाल्ड यांनी पत्रकारांना सांगितले. आम्हाला मालिकेत कुठे खेळता येईल हे ठरवण्यासाठी त्याच्या पुनर्वसनाचा विचार करावा लागला, परंतु तो मालिकेत भाग घेईल अशी आम्हाला अपेक्षा होती, असेही ते म्हणाले.

(वृत्तसंस्था)

महिला गटात सोलापूरची मोहोळवर मात; पुरुष व महिला शुटींगबॉल स्पर्धा

सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

जिल्हा अजिंक्यपद शुटींगबॉल स्पर्धेत महिलांच्या सलामीच्या सामन्यात सोलापूरने मोहोळ संघावर २१-२० अशी मात केली. सोलापूर संघाकडून सानिया सय्यद ,नौशीन चांदा, अनम रंगरेज यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. मोहळ संघातील वैष्णवी, कार्तिकी बचाव करू शकले नाहीत.

सोलापूर शहर व जिल्हा शूटिंग बॉल असोसिएशन च्या वतीने सुभाष बाग मैदान,शनिवार पेठ येथे पुरुष व महिला जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा घेण्यात आली. यात ५२ खेळाडूंनी भाग घेतला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन नगरसेवक अमर पुदाले यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी माजी महापालिका सभागृह नेते, पांडुरंग दिडडी, असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत, उपाध्यक्ष अलीम शेख, सचिव फैजअहमद बेगमपूर, प्रवीण दगें पाटील, शेषराव सिरसट, शकील नल्ला मंदू, हमीद हिरोली, इमरान हवालदार, माजी खेळाडू रशीद बागवान, मेहमूद मडकी यांची प्रमुख उपस्थिती होती. निवड समिती सदस्य म्हणून रफीक दिवाण, श्रीनिवास कामुर्ती, इकबाल दलाल यांनी काम पाहिले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ईनायत वलमपली , रफिक जेकलेर, विष्णू तळभंडारे, बिलाल रामपूरे व सैफू मनियार यांनी सहकार्य केले.

विभागीय खो-खो स्पर्धेत 'फॅबटेक' विजेते

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.२५ नोव्हेंबर -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे (रायगड) अंतर्गत विभागीय खो-खो स्पर्धेत फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला येथील मुलांच्या संघाने विजेतेपद पटकाविले.

ए. जी. पाटील महाविद्यालयात झालेल्या या स्पर्धेतून सिद्धार्थ उपासे ने सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडू म्हणून सन्मानचिन्ह गौरविण्यात आले.

संघास क्रीडा शिक्षक प्रा.बिरा वगरे, प्रा.मोहन वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे फॅब्टेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा. प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, उपप्राचार्य डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांनी अभिनंदन केले.

सोलापूर जिल्हा कुमार व मुली खो-खो संघ जाहीर

सराव शिबिर वेळापूर व वाडीकुरोली येथे उद्यापासून

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि २५ नोव्हेंबर-

स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर झालेल्या जिल्हा अजिंक्यपद कुमार व मुली खो-खो स्पर्धेतून निवड समिती सदस्य गुलाम मुजावर, मोहन रजपूत, सतीश कदम व प्राची बुऱ्हानपुरे या निवड समिती सदस्यांनी जिल्हा संघ निवडले. कुमार संघाचे सराव शिबिर वेळापूर (ता. माळशिरस) तर कुमारी संघाचे सराव शिबिर वाडीकुरोली (ता.पंढरपूर) येथे २६ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे.

कुमार खेळाडूंनी सोमनाथ बनसोडे (मो. ८८५५९१२९०६) व मुलींनी अतुल जाधव (मो. ९०९६६२७३१७) यांच्याशी २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत संपर्क साधावा. अन्यथा राखीव खेळाडूंना संधी देण्यात येईल याची निवड झालेल्या खेळाडूंनी नोंद घ्यावी, असे सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड यांनी कळविले आहे

निवडण्यात आलेले संघ असे

कुमार : शंभूराजे चंदनशिवे, अकबर शेख, अरमान शेख, सुहान आत्तार, सिद्धार्थ माने देशमुख, ओम लांडगे (अर्धनारी नटेश्वर, वेळापूर), रवी दरगोंडा, ओंकार राजपूत, परशुराम राठोड, आयर्न चव्हाण (किरण स्पोर्ट्स, सोलापूर), रोहन मोरे (शेवते पंढरपूर), अभय निंबाळकर (उत्कर्ष सोलापूर), माज पठाण (न्यू गोल्डन, मंद्रूप), कार्तिक पवार (न्यू सोलापूर क्लब), नामदेव राऊत (ए. एम. डोनज).

मुली : प्राजक्ता बनसोडे, अश्विनी मांडवे, अन्वयी मंडले, अनुष्का पवार, अंकिता लोखंडे(अर्धनारी नटेश्वर, वेळापूर), स्नेहा लामकाने, कल्याणी लामकाने,समृद्धी सुरवसे श्रावणी देठे, कोमल फसले (के. के. स्पोर्ट्स, वाडीकुरोली), साक्षी व्हनमाने, सृष्टी नारायणे (किरण स्पोर्ट्स, सोलापूर), अक्षता प्रचंडे, विनया क्षीरसागर (समृद्धी स्पोर्ट्स, सोलापूर), सृष्टी काळे (न्यू सोलापूर क्लब सोलापूर).

दिक्षा कुलकर्णी व दर्शन जाधव विजेते

आंतर विभागीय विद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धा

सांघिक स्पर्धेत मुलात जळगाव तर मुलीत सोलापूर विभागास विजेतेपद

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठांतर्गत राज्यस्तर आंतर विभागीय तंत्र शिक्षण व फार्मसी महाविद्यालयाच्या निवड बुद्धिबळ स्पर्धेत मुलींच्या गटात सोलापूर विभागाच्या नागेश करजगी ऑर्किड महाविद्यालयातील आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त दीक्षा कुलकर्णी हिने चमकदार कामगिरी करत चार गुण व १६ सरस बोकोल्स गुणांसह अव्वल स्थान पटकाविले. तर सोलापूरच्याच वैष्णवी येळदी हिने चार गुण व १३ बोकोल्स गुणांसह दुसरा क्रमांक पटकाविला. मुलांच्या गटात जळगाव विभागाच्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त दर्शन जाधव याने सुरेख खेळत ४.५ गुणांसह जेतेपद व कोल्हापूर विभागाच्या असिम सय्यद याने चार गुण व १४ सरस बोकोल्स गुणांसह दुसरा क्रमांक पटकाविला. तसेच सांघिक स्पर्धेत मुलात जळगाव विभागाने १३.५ गुणांसह विजेतेपद व कोल्हापूर विभागाने १३ गुणांसह उपविजेतेपद प्राप्त केले. मुलीत सोलापूर विभागाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद तर कोल्हापूर विभागाने १३ गुणांसह उपविजेतेपद पटकाविले.

नागेश करजगी ऑर्किड महाविद्यालयात सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या स्पर्धेचे पारितोषिक वितरण विद्यापीठाचे क्रीडा समन्वयक डॉ. बालाजी फुलचवाड व ऑब्झर्वर संजय वाईकर यांच्या हस्ते प्राचार्य डॉक्टर बीके सोनगे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य सचिन गायकवाड, प्रा. गणेश बगल, आयोजन समिती सदस्य प्रा. शिवशरण कोरे, पात्रता समिती सदस्य म्हणून अमित वडवेराव, प्रा. ए. एस. जामदार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी प्रमुख पंच म्हणून राष्ट्रीय वरिष्ठ पंच उदय वगरे, प्रज्वल कोरे यांनी यशस्वीरित्या काम पाहिले. स्पर्धा यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील लॅब असिस्टंट, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व्हॉलेंटियर्स यांचे सहकार्य लाभले.

अंतिम निकाल (अनुक्रमे १ ते ६, नाव, गुण, बोकोल्स गुण, विभाग) :

मुले : दर्शन जाधव - ४.५, (जळगाव), असिम सय्यद- ४,१४ (कोल्हापूर), विनित बागुल- ४, १३.५ (जळगाव), रोहित बुडाके - ४, १२.५ (कोल्हापूर), रितेश कौतकर - ३.५ (सोलापूर), अनिकेत गुलेद - ३, १३.५ (सोलापूर)

मुली : दीक्षा कुलकर्णी - ४,१६ (सोलापूर), वैष्णवी येलदी- ४,१३ (सोलापूर), पूनम खांडेकर - ४,११(सोलापूर), साक्षी जगदाळे - ४,१० (कोल्हापूर), श्रुती जाधव - ३,१५, (छत्रपती संभाजीनगर), सुजान पठाण - ३,१४ (कोल्हापूर विभाग)

पी. एस. इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरवात

सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

येथील श्राविका संस्था संचलित पी. एस. इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये प्री-प्रायमरी, प्रायमरी व हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. याचे उद्घाटन सोलापूर जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष संतोष खेंडे , राष्ट्रीय योगासन चॅम्पियन प्रणाली शिंदे यांच्या हस्ते झाले.

यावेळी श्राविका संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा, प्रायमरीच्या पर्यवेक्षिका कल्पना रामावत, प्री-प्रायमरी च्या समन्वयक अर्चना अक्कलकोटे, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे आदी उपस्थित होते. प्रायमरीचे क्रीडा शिक्षक रोहन घाडगे, हायस्कूलचे क्रीडा शिक्षक अजित पाटील, कराटे प्रशिक्षक. सोमनाथ मगर व नृत्यशिक्षक गणेश कुडक्याल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रायमरी व हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर पध्दतीने विविध कलाप्रकार सादर केले. सह शिक्षिका जयश्री गुंड यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सह शिक्षिका धनश्री शहा यांनी केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

महत्वाचे...

पंढरपुरात भाजपाच्या प्रचारफेरीस उस्फूर्त प्रतिसाद

पंढरपूर, दि. २५ नोव्हेंबर-

पंढरपूर शहरात निवडणुकीचा रंग आता चांगलाच भरला असून प्रचारात खऱ्या अर्थाने रंग भरत आहे. भाजप या सत्ताधारी सक्षम पक्षाकडून श्यामल लक्ष्मण शिरसट या नगराध्यक्ष पदासाठी लढत असून त्यांच्या विरोधात डॉ. प्रणिता भालके आहेत, मात्र सुरुवातीपासूनच शिस्तबद्ध प्रचाराने त्यांनी जनमानसात स्थान निर्माण केले आहे. दरम्यान मंगळवार दि.२५ नोव्हेंबर रोजी सकाळी प्रदक्षिणा मार्ग, कालिकादेवी चौक, भाई भाई चौक, संत पेठ भागात भव्य रॅली काढण्यात आली यावेळी या भागातील स्थानिक लोकांनी नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत लढणाऱ्या श्यामल शिरसट यांचे स्वागत केले. यावेळी भाजप नेते माजी आमदार प्रशांत परिचारक, लक्ष्मण शिरसट, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्यामल शिरसट, माजी नगरसेवक राजू सर्वगौड, इब्राहिम बोहरी उपस्थित होते.

किरनळ्ळीतील विहिरीवरील बांधकाम पडल्याने धोका

अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-

तालुक्यातील किरनल्ली येथील धोकादायक विहीरी वरील बांधकाम पडल्याने शाळेची मुले माणसं जनावरे यांना धोकादायक बनले आहे. ग्रामपंचायत कडून या धोकायक विहिरी बाबत हालचाल होत नसल्याने ग्रामस्थांकडून संताप व्यक्त होत आहे. किरनल्ली येथील जिल्हा परिषद शाळा आणि हनुमान मंदिराच्या समोरची धोकादायक विहीरी वरील बांधकाम पडल्याने रात्री अपरात्री अंधारात जनावरे, माणस, शाळेची मुले विहिरीत चुकुंन पडले तर यास जबाबदार कोण? या करिता सरपंच ग्रामपंचायत अधिकारी तात्काळ विहिरीचे बांधकाम करावी अशी मागणी गावकऱ्या कडून होत आहे.

श्रीराम मंदिरच्या शिखरावर ध्वजारोहण

अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-

अक्कलकोट तालुका विश्व हिंदू परिषद व बजरंग दल वतीने प्रभु श्रीराम मंदिरचा शिखरावर हिन्दु धर्माचा प्रतीक असलेला भगवा ध्वजारोहण तालुका सायाजोक मेजर बालाजी रजपूत यांच्या हस्ते करण्यात आला. ५०० वर्ष पासुन हिन्दु बांधवचे स्वप्न साकार होतें आहे. अयोध्या येथे प्रभु श्रीराम च शिकरावर हिन्दु धर्माचा प्रतीक भगवा चे ध्वजारोहण संपन्न झाला. त्याअनुषगाने अक्कलकोट येथे राजे फत्तेसिंह ग्राउंडसमोर प्रभु श्रीराम मंदिर येथे धरम ध्वज भगवा फडकविण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघचे ग्राम विकास मंडळ सदस्य संदीप कटकधोंड, विश्व हिंदू परिषद तालुका संयोजक मेजर बालाजी रजपूत व बजरंग दल तालुका संयोजक मदन कुमार राठोड बजरंगी सुनिल शिंदे बजरंगी कुरणुरचे बजरंगी लक्ष्मण केंगार आदी उपस्थित होते.

निधन वृत्त...

अंबादास मद्राल



सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

रविवार पेठेतील रहिवासी अंबादास रामय्या मद्राल (वय ७०) यांचे सोमवार, दि.२४ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, तीन मुले, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कुचन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.श्रीनिवास मद्राल यांचे ते बंधू होत.

शांताबाई परबळकर

मोहोळ, दि. २५ नोव्हेंबर-

येथील जुने श्रीराम मंदिराजवळील श्रीमती शांताबाई जालिंदर परबळकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७१ होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून चिन्हांबाबात दुजाभाव; तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा आरोप

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२५ नोव्हेंबर -

पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत आमच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला एक आणि नगरसेवकपदांच्या उमेदवारांना दुसरे चिन्ह देण्याचा घाट घालत येथील निवडणूक निर्णय अधिकारी दुजाभाव करीत असल्याचा आरोप तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.प्रणिता भालके यांनी केला.

या निवडणुकीच्या अनुषंगाने सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात असताना चिन्ह वाटपातील दुजाभावचा विषय पुढे आल्याने डॉ.प्रणिता भालके यांनी त्यांचे पती तथा विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके, नगरसेवक पदाचे उमेदवार आदित्य फत्तेपूरकर आदींसह निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडे धाव घेत संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत जाब विचारला. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षपदासाठीच्या उमेदवाराला आणि नगरसेवक पदाच्या उमेदवाराला एकच चिन्ह दिले जाणार की वेगवेगळी चिन्हे दिली जाणार? जर वेगवेगळी चिन्हे दिली तर तीर्थक्षेत्र विकास आघाडी आंदोलनाची भूमिका घेणार का? याकडे पंढरपूरवासियांचे लक्ष लागलेले आहे.

चिन्ह मिरवले जात आहे

निवडणुकीच्या कार्यक्रमा नुसार बुधवार, दि.२६ नोव्हेंबर रोजी चिन्हांचे वाटप केले जाणार आहे. मात्र येथील पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीकडून चिन्हा वाटपअगोदरच कपबशी हे चिन्ह कसे काय मिरवले जात आहे? असा सवाल डॉ.प्रणिता भालके यांनी उपस्थित केला.

वेळेत केला नाही अर्ज

नोंदणीकृत अमान्यताप्राप्त ज्या आघाड्या आहेत किंवा जे पक्ष आहेत त्यांच्या संदर्भात काही नियम आहेत. त्या नियमा प्रमाणे संबंधित आघाडीने उमेदवारी अर्ज दाखल होण्याच्या अगोदर तीन दिवस त्यांना जर काही एखादे चिन्ह हवे असेल तर जिल्हाधिकारी कार्यालयात त्यासंदर्भात अर्ज करणे आवश्यक असते. तो अर्ज केल्यानंतर तेथून त्यांच्यासाठी चिन्ह गोठविले जाते किंवा दिले जाते. तीर्थक्षेत्र विकास आघाडीने यासंदर्भात अर्ज केला होता. पण तो वेळेत न केल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून त्यांना चिन्ह गोठवुन दिले नाही, असे निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी स्पष्ट केले

चिन्हा बाबतचा दुजाभाव सहन करणार नाही

आमच्या नगराध्यक्षपदासाठी आणि सर्व नगरसेवक उमेदवारांसाठी एकच चिन्ह जर मिळाले नाही तर उद्या पासून आम्ही मतदानाच्या तारखे पर्यंत अर्थात २ डिसेंबरपर्यंत नगरपालिका कार्यलाया मध्ये धरणे आंदोलन किंवा ठिय्या आंदोलन करणार आहोत. आम्ही कोणताही प्रचार करणार नाही आहोत. चिन्हा बाबतचा हा दुजाभाव आम्ही कदापिही सहन करणार नाही.

- भगिरथ भालके,
प्रमुख तीर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर

एकच चिन्हाचा निर्णय उशिरा

आज दिवसभराच्या राजकीय धुमचक्रीनंतर येथील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी रात्री उशिरा तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्ष आणि नगरसवेकपदाच्या सर्व उमेदवारांना एकच चिन्ह देण्यात येणार असल्याचे जाहीर केल्याची माहिती तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

महेश इंगळे प्रचार कार्यालयास आ.देवेद्र कोठे यांची भेट

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-

अक्कलकोट नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ प्रभाग क्रमांक ११ भारतीय जनता पार्टी चे अधिकृत उमेदवार महेश इंगळे प्रचार कार्यालय येथे देवेद्र कोठे यांनी भेट दिली. भाजपा कार्यकर्ते व महेश इंगळे मित्र परिवार यांनी यावेळी आ देवेद्र कोठे यांचे स्वागत केले. प्रभाग क्र ११ मध्ये महेश इंगळे मित्र परिवार नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी, प्रभाग ११ उमेदवार महेश इंगळे आरती गायकवाडांचा प्रचार करीत आहेत.

यावेळी महेश इंगळे प्रथमेश इंगळे परिवार कायकर्त्यांना आ. देवेंद्र कोठे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रथमेश इंगळे, बाळाबाहेब एकबोटे, सुनिल पवार, निवास इंगळे, सागर इंगळे, मनोज इंगोले, सुरेश वाले, नंदकुमार जगदाळे रवि मलवे, श्रीकांत मलवे, सुरेश कुंभार, धोंडाप्पा कुंभार, महेश काटकर, गजू काटकर, ऋषिकेश लोणारी, श्रीनाथ पराणे, बाबा सुरवसे, चंद्रकांत सोनटक्के, सागर गोंडाळ, भिमा मिनगले, खाजप्पा झंपले, प्रशांत गुरव, गणेश दिवाणजी, सचिन दुर्गे, धर्मा गुंजले, लखन झंपले, गोटू माने, भीमा माने,, रमेश शिंदे, शंकर मिनगले, आप्पाशा मिनगले, सुनील नाईकवाडी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, संतोष पराणे, प्रसाद पाटील, शिवशरण अचलेर उपस्थित होते.

विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२६ मध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर झाले आहे. गेल्या वर्षी प्रवेशपरीक्षे मध्ये १४ लाख विद्यार्थ्यांनीनोंदणी केली होती. यामधील १२ लाख ४६ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली होती. सीईटी-सेलने वर्षातून दोनवेळा परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्याला एक प्रवेश परीक्षा देणे बंधनकारक असून दुसरी प्रवेश परीक्षा ऐच्छिक

असेल. जर विद्यार्थ्याने दोन प्रवेश परीक्षा दिल्यास त्याला दोन्ही पैकी ज्यामध्ये जास्तगुण असतील ते प्रवेशासाठी गृहीतधरले जातील.

सध्या २०२६च्या १७ प्रवेश परीक्षाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यामध्येपदवी १२, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या५ प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहेत.या प्रवेश परीक्षा सकाळी व दुपारी यासत्रात ऑनलाइन पद्धतीने महाविद्यालयात घेतल्याजातील. तर काही प्रवेश रीक्षासायंकाळच्या सत्रात घेतल्याजातील. या प्रवेश परीक्षा मार्चमहिन्याच्या शेवटच्या आठवड्यातसुरु होऊन मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत चालणार आहेत.

एमएच सीईटी पीसीबी ग्रुपची परीक्षा

- पहिली प्रवेश परीक्षा : २१ ते २६ एप्रिल २०२६
- दुसरी प्रवेश परीक्षा : १० व ११ मे २०२६

पीसीएम ग्रुपची परीक्षा

- पहिली प्रवेश परीक्षा : ११ ते १९ एप्रिल २०२६
- दुसरी प्रवेश परीक्षा : १४ ते १७ मे २०२६

यंदा हा फायदा

राष्ट्रीय-स्तरावर जेईईच्या (मेन)दोन प्रवेश परीक्षा होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना दोनदा संधीउपलब्ध होते. २ संधी महाराष्ट्रातील मुलांनाही मिळाव्यातम्हणून यावर्षापासून सीईटी कक्षाने या वर्षापासून एमएचसीईटी पीसीएम, पीसीबी व एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशपरीक्षा (सीईटी) दोन वेळेस घेण्याचा निर्णय घेतला आहे.

असे आहे परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक

एमबीए, एमएमएस या अभ्यासक्रमासाठी पहिली प्रवेशपरीक्षा ६ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ मध्ये होणार असून दुसरी प्रवेश परीक्षा ९ मे २०२६ मध्ये होणार आहे. मागील वर्षी १ लाख ३८ हजार विद्यार्थ्यांनी ही प्रवेश परीक्षा दिली होती. एमसीएची प्रवेश परीक्षा ३० मार्च २०२६, तीन वर्षीय विधीची प्रवेश परीक्षा १ व २ एप्रिल २०२६, पाच वर्षीय विधीची प्रवेश परीक्षा ८ मे २०२६, नर्सिंगची प्रवेश परीक्षा ६ व ७ मे २०२६, बीएडची प्रवेश परीक्षा २७ ते २९मार्च २०२६, बीपीएडची प्रवेश परीक्षा ४ एप्रिल २०२६,बीबीए, बीएमएस, बीबीएम, बीसीए व बी. एचएम सीटी प्रवेश परीक्षा २८ ते ३० एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. इतर सर्व पदवी व पदव्युत्तर प्रवेश परीक्षांच्या तारखा सीईटी कक्षाने जाहीर केल्या आहेत. या सर्व प्रवेश परीक्षा मार्च ते मे २०२६ दरम्यान होणार आहे.

बार्शीत शिंदेसेनेच्या मीरा नाळे नगरसेविका म्हणून बिनविरोध

माजी आमदार राऊत गटाची विजयी सलामी

तभा वृत्तसेवा
बार्शी, दि २५ नोव्हेंबर

बार्शी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु असताना, आज अचानकपणे प्रभाग क्रमांक ७ ब मधील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या उमेदवार निवेदिता जीवनदत्त आरगडे यांनी आपला उमेदवारी अर्ज माघारी घेतला. यामुळे या ठिकाणी त्यांच्याविरुद्ध उभ्या असलेल्या शिंदेसेनेच्या उमेदवार मीरा शीतल नाळे या बिनविरोध विजयी झाल्या आहेत.

नगरपरिषद निवडणुकीच्या २१ नोव्हेंबर रोजीच्या अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवसानंतर, ज्या उमेदवारांच्या हरकती आहेत आणि कोर्टात अपील परिस्थिती आहे अशा उमेदवारांसाठी अर्ज माघार घेण्याची मुदत २५ नोव्हेंबर होती. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार मीरा शीतल नाळे यांची थेट दुरंगी लढत असलेल्या विरोधी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या उमेदवार निवेदिता जीवनदत्त आरगडे यांच्या उमेदवारी अर्जावर आक्षेप घेत, सुचकाच्या खोट्या सही असल्याचा दावा दाखल केला होता. या दाव्याचा निकाल येण्याआधीच आज निवेदिता आरगडे यांनी आपला उमेदवारी अर्ज माघारी घेतला. यामुळे शिवसेनेच्या मीरा शीतल नाळे या बिनविरोध नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत.

बार्शी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पद व २१ प्रभागातील नगरसेवक पदाच्या ४२ जागांच्या निवडणुकीत एक जागा बिनविरोध झाल्याने आता ४१ जागांची निवडणूक होणार आहे. पक्षीय बलाबल पाहता महायुती भाजपचे माजी आमदार राजेंद्र राऊत गटाने या निवडणुकीत एक जागा बिनविरोध करत आघाडी घेतली आहे. उर्वरित नगराध्यक्ष पद व ४१ जागांकरिता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार दिलीप सोपल व माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांचा गट आणि महायुतीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या गटात चुरशीची लढत होताना दिसत आहे.

ॲड. वैजनाथ झळकी यांच्याकडून मुलींसाठी शौचालयाचे बांधकाम

अक्कलकोट : येथील ॲड. वैजनाथ एस. झळकी यांनी त्यांच्या ४५व्या वाढदिवसानिमित्त शाळेच्या मुलीसाठी स्वखर्चाने शौचालय बांधकाम सुरू करून विविध समाज उपयोगी काम करून साधे पणाने वाढदिवस साजरा केला. शेतकऱ्यांसह ग्राहकांच्या हितासाठी लढणाऱ्या आणि जय भारत माता सेवा समितीच्या राष्ट्रीय प्रवक्त्या असलेल्या वकील झळकी यांनी एक आदर्श निर्माण केल्याने लक्ष वेधले आहे.

वाढदिवस समितीचे जिल्हाध्यक्ष संदेश पवार यांच्या नेतृत्वाखाली फळे, ब्लँकेट आणि चादरी वाटण्यात आल्या. नंतर रुग्णालयाच्या आवाराबाहेर अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यसैनिकांच्या चरित्रांवर आधारित पुस्तके वाटून देशभक्ती विकसित करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी अखिल भारतीय उर्दू मंचचे प्रमुख सय्यद आर खस्ती, शैक्षणिक संस्थेचे प्राचार्य निंगाना केरुरा, शाळेचे मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक,कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

भीम प्रतिष्ठानकडून डॉ. हेडगेवार रक्तपेढीला संविधान पुस्तिका भेट

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-

भीम प्रतिष्ठानतर्फे डॉ. हेडगेवार रक्तपेढीला सदिच्छा भेट देऊन संविधान दिनानिमित्त रक्तपेढीला संविधान पुस्तिका देऊन संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रथमता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला वंदन करून डॉ. हेडगेवार रक्तपेढी संस्थेला भेट देण्यात आली. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी सुशांत कुलकर्णी यांनी रक्तपेढीच्या सर्व विभागाची व कार्याची माहिती दिली, त्यावेळी रक्तपेढीचे त्याला थॅलेसेमिया बाबतचे सेवा कार्य पाहून भिम प्रतिष्ठान अध्यक्ष वीरेंद्र यांनी रक्तपेढीस रु. पाच हजाराचे देणगी दिली.

शहरात रक्ताचा तुटवडा असताना गरजेच्या वेळी डॉ. हेडगेवार रक्तपेढीकडून गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून दिले, त्याबद्दल भिम प्रतिष्ठानचे संस्थापक बाबा बाबरे यांनी विशेष अभिनंदन केले. याप्रसंगी विविध सामाजिक संस्थेला भिम प्रतिष्ठानकडून संविधानाचे पुस्तक वाटप करण्यात येणार आहे, असे संस्थापक बाबरे यांनी माहिती दिली. डॉ. हेडगेवार रक्तपेढीकडून कडून रक्ताच्या सर्व तपासण्या करून रुग्णांना सुरक्षित रक्तपुरवठा केला जातो, असे उद् गार भिम प्रतिष्ठानचे अध्यक्ष विरेंद्र हिंगमिरे यांनी रक्तपेढीच्या भेटीदरम्यान काढले. जनसंपर्क अधिकारी सुशांत कुलकर्णी यांनी रक्तपेढीच्या सर्व विभागांची व कार्याची माहिती दिली. त्यावेळी रक्तपेढीचे थॅलेसेमिया बाबतचे सेवाकार्य पाहून भिम प्रतिष्ठानचे अध्यक्ष विरेंद्र हिंगमिरे यांनी रक्तपेढीस रु पाच हजारांची देणगी दिली.

यावेळी भिम प्रतिष्ठानचे पदाधिकारी दलितमित्र शिवाजी पवार, अकबर शेख, सिद्धांत बाबरे, सौदागर देवघन, उषा चव्हाण, कल्पना चव्हाण, हिरजचे उपसरपंच चंद्रकांत तमशेट्टी आदी उपस्थित होते. डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे सचिव मिलिंद फडके, संचालक प्रकाश कुलकर्णी, व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जनसंपर्क अधिकारी रवी कोटा आणि रक्तपेढीचे कर्मचारी उपस्थित होते. जनसंपर्क अधिकारी सुशांत कुलकर्णी यांनी आभार मानले.

नगरपालिका निवडणूक : मोहोळचे पांढरे, मैंदर्गीच्या बांगी यांचे अपील फेटाळले

तभा वृत्तसेवा,
सोलापूर,दि. २५ नोव्हेंबर-

सर्वत्र नगरपालिका निवडणुकीची धामधुम सुरु आहे. मोहोळ नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अर्ज भरलेले अविनाश पांढरे आणि मैंदर्गी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अर्ज भरलेल्या परवीनबानो बांगी यांचे अर्ज छाननीत नामंजूर करण्यात आले होते. त्याविरोधात पांढरे व बांगी यांनी जिल्हा न्यायालयात धाव घेत अपील केले होते. मात्र न्यायालयाने त्या दोघांचेही अपील न्यायालयाने फेटाळून लावले.

मोहोळ नगरपरिषदेच्या प्रभाग ५ ब मधून अविनाश तुकाराम पांढरे यांनी सर्वसाधारण गटातून नगरसेवक पदासाठी निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारी अर्ज भरला होता. परंतु त्यांनी सादर केलेल्या शपथपत्रामधील काही रकाने रिकामे ठेवले होते. तर काही रकान्यात निरंक असे लिहिले होते. त्यांचा हा अर्ज परिपूर्ण नसल्याचे कारण सांगत तो नामंजूर करण्यात आला होता.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाच्या विरोधात त्यांनी जिल्हा व सत्र न्यायालयाकडे धाव घेत अपील दाखल केले होते. त्यावर जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, शपथपत्रातील संपूर्ण मजकूर व संपूर्ण रकाने भरणे कायद्याने बंधनकारक आहे. तसे भरले नसल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना अर्ज नामंजूर करु शकतो. जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांनी केलेला हा युक्तिवाद ग्राह्य धरुन जिल्हा न्यायाधीश राजवैद्य यांनी अविनाश पांढरे यांचे अपील फेटाळून लावले. अविनाश पांढरे यांच्या वतीने ॲड एन. के. शिंदे यांनी काम पाहिले.

मैंदर्गी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी प्रभाग ६ मधून परवीनबानो मुजीब बांगी यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र त्यांच्या अर्जातील नाव आणि मतदार यादीतील नाव यात बदल असल्याचा मुद्दा उपस्थित करत शमीमबानो महिबूब दफेदार यांनी परवीनबानो बांगी यांच्या अर्जास लेखी हरकत नोंदविली होती. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संपूर्ण कागदपत्रांची पुर्नतपासणी करुन बांगी यांचा अर्ज नामंजूर केला होता.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाच्या विरोधात बांगी यांनी जिल्हा न्यायालयात धाव घेत अपील दाखल केले होते. याबाबत जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन बांगी यांचे अपील जिल्हा व सत्र न्यायाधीश राजवैद्य यांनी फेटाळून लावले. यात बांगी यांच्या वतीने ॲड. नीलेश ठोकडे यांनी काम पाहिले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

हजारो नागदिव्यांनी उजळले बाळे येथील खंडोबा मंदिर

- यळकोट, यळकोट जय मल्हारचा घोष
- चंपाषष्ठीनिमित्त आज भरीत रोडग्याचा नैवेद्य

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर-

बाळे येथील श्री खंडोबा देवाची पारंपरिक यात्रेस मंगळवारी उत्साहात प्रारंभ झाला. हजारो नागदिव्यांनी मंदिरसह परिसर उजळले होते. नागदिवे प्रज्वलित करण्यासाठी हजारो संख्येने वाती आणि तेलाचे संकलन करण्यात आले होते. बुधवार, दि.२६ नोव्हेंबर रोजी चंपाषष्ठीनिमित्त भरीत रोडग्याचा नैवेद्य दाखविण्यातअ येणार आहे.

मार्गशीर्ष शुध्दषष्ठी देवाची मार्गशीर्षपर्यंत येणाऱ्या प्रत्येक रविवारी म्हणजे दि.३० नोव्हेंबर ते १४ डिसेंबर या कालाधीत ही यात्रा भरणार आहे. मंदिर समितीकडून दर्शन रांगेची व्यवस्था, सुरक्षेच्या

दृष्टिकोनातून सीसीटीव्ही, पोलिस आयुक्तालय सोलापूर यांच्याकडून पोलिस बंदोबस्त, सोलापूर महापालिकेकडून सिटी बससेवा, पिण्याचे पाणी, दिवाबत्ती आदींची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्रींचा गाभारा स्वच्छ करण्यात येऊन गाभाऱ्यासह मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. भाविकांना श्रींचे दर्शन घेण्यासाठी कोणताही त्रास होऊ नये यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात्रा कालावधीत पहाटे ५ वाजता काकड आरती, सकाळी ८ आणि रात्री ७ वाजता महापूजा व अभिषेक करण्यात येणार आहे. दिवसभर जागरण गोंधळ, वाघ्या-मुरळी नृत्य, तळी-भंडारा उचलणे, भंडारा खोबरे उधळणे वारू सोडणे, नवस फेडणे, जावळ काढणे असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, असे मंदिराचे पुजारी गणेश पुजारी यांनी सांगितले.

यात्रा कालावधीत श्री खंडोबा देवाची मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी व यात्रेतील प्रत्येक रविवारी श्रींची पालखी, घोडा व मानाचे नंदीध्वज मिरवणूक निघणार आहे. पौष शुद्ध षष्ठी बांगरषष्ठी महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे, असे मंदिर समितीचे सचिव सागर पुजारी यांनी सांगितले.

सोलापूर शहर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील विशेषतः कर्नाटक आंध्र प्रदेशातील भाविक या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी आणि नवस पूर्ण करण्यासाठी आवर्जून उपस्थित राहतात, असे मंदिर समितीचे अध्यक्ष विनय ढेपे यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा

सोलापूरः हुतात्मा स्मृती मंदिर येथे सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्यालय संचनालयातर्फे महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित ६४वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत मंगळवारी सायंकाळी झपुर्झा नाट्यसंगीत सोलापूरने दोन अंकी ''हॅलो राधा मी रेहना'' हे नाटक सादर केले.

सोलापूर : संविधान दिनानिमित्त आंबेडकर चौकातील संविधान स्तंभास विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंगळवारी सायंकाळी टिपलेले छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)

तरुण भारत परिवार माझ्या 'माई'च्या कुटुंबासारखाच वाटतो

- सिंधुताई सपकाळ यांची कन्या ममताताई सपकाळ यांनी व्यक्त केली भावना
- दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालयास दिली सदिच्छा भेट

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर-

दैनिक सोलापूर तरुण भारत मला माझ्या 'माई'च्या कुटुंबासारखाच वाटतो, अशी आत्मिक भावना स्व.सिंधुताई सपकाळ यांची कन्या तथा प्रसिध्द समाजसेविका ममताताई सपकाळ यांनी व्यक्त केले. मंगळवार, दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी त्या दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्या बोलत होत्या.

मुख्य संपादक प्रशांत माने यांनी ममताताई सपकाळ व विनय सिंधुताई सपकाळ यांचा बुके, तरुण भारतच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या राष्ट्रयज्ञ के १०० वर्ष विशेषांक आणि सोलापूरी चादर देऊन सत्कार

केला. याप्रसंगी मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, वृत्तपसंपादक अजितकुमार संगवे, धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे, व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, उपसंपादक श्रीनिवास गाजूल, आरती कुसेकर, अमोगसिध्द मुंजे, यशवंत गुरव, रंजना घोडके, वैशाली कांबळे, नागसेन शिवशरण, दत्ता भोसले, प्रतिभा झाडे, सत्यम गायकवाड, सागर पवार आदी उपस्थित होते.

भेटीदरम्यान ममता सपकाळ यांनी तरुण भारत प्रेसच्या सर्व विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांची कार्यप्रणाली जाणून घेतली. संपादकीय, छपाई, वितरण आदी विभागांमध्ये त्यांनी पत्रकार व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

संपादकीय टीमशी संवाद साधताना त्या म्हणाल्या, माईंच्या संस्थेद्वारा आजही तेच काम म ोठ्या हिमतीने सुरु आहे जे माईंनी केले होते. समाजकार्य, महिला सक्षमीकरण आणि गरजू-अनाथ मुलांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांवर त्यांनी माहिती दिली. माध्यमांनी समाजातील सकारात्मक आणि रचनात्मक कार्यांना प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

तरुण भारतच्या प्रतिनिधींनी ममताताई सपकाळ यांच्या कार्याचे कौतुक करुन सामाजिक परिवर्तनासाठी माध्यमे आणि सामाजिक संस्था यांनी एकत्र काम करण्याची गरज व्यक्त केली. या भेटीमुळे परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ झाली असून भविष्यात माईंचे सेवाकार्य आणि विविध सामाजिक उपक्रमांत संयुक्त प्रयत्न वाढण्याची आशावाद व्यक्त करण्यात आला.

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

यादी क्रमांक १

आयोजित

"मला हवयं आदर्श सोलापूर "

या विषयावरील निबंध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची यादी...

अ. क्र.	विद्यार्थ्यांची नावे	शाळेचे नाव
१.	आराध्या कोकणे	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
२.	श्रुतिका गाजरे	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
३.	अनुष्का देवकते	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
४.	गार्गी दराडे	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
५.	वल्लभ खजूरकर	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
६.	शांतकुमार कोरे	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
७.	सायली थोरात	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
८.	वेदांत जगताप	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
९.	नामदेव गावडे	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
१०.	आर्या कुलकर्णी	कै.व्ही.एम.मेहता स्कूल, जुळे सोलापूर
११.	दर्शना सुरवसे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१२.	रेणुका सातपुते	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१३.	तेहरीन सय्यद	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१४.	स्नेहा नलावडे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१५.	मृणाली भोसले	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१६.	वहीदुनिस्सा शेख	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१७.	समृध्दी राऊत	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१८.	तनुजा भुसे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१९.	शिवांगी जबडे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
२०.	आर्या भोसले	सेवासदन प्रशाला, सोलापूर
२१.	अमरनाथ परदेशी	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
२२.	सारंग यादव	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
२३.	अमृता भोसले	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
२४.	सानिका सुतार	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
२५.	शांभवी जम्मा	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
२६.	स्वामिनी कोरे	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
२७.	रेणुका पद्मा	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
२८.	ऐश्वर्या चिंचोळकर	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
२९.	आदित्य ऐवळे	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
३०.	साहिल शेख	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
३१.	मानसी गुंड	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
३२.	पूजाश्री माळगे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
३३.	आरोही भोसले	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
३४.	प्रणव कांबळे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
३५.	शिव पवार	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
३६.	पूर्वा मसलखांब	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
३७.	सार्थक बीडबाग	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
३८.	अथर्व खंडाळे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
३९.	स्वरांजली कोडगिरे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
४०.	अनुष्का कोडगिरे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
४१.	मेहर पटेल	भारती विद्यापीठ, सोलापूर
४२.	स्फूर्ती पवार	भारती विद्यापीठ, सोलापूर
४३.	आदिती माळी	भारती विद्यापीठ, सोलापूर
४४.	स्वानंदी कुलकर्णी	भारती विद्यापीठ, सोलापूर
४५.	काव्या बनशेट्टी	भारती विद्यापीठ, सोलापूर
४६.	श्रेया मोरे	भारती विद्यापीठ, सोलापूर
४७.	रिध्दी माने	भारती विद्यापीठ, सोलापूर
४८.	सिध्दी माने	भारती विद्यापीठ, सोलापूर
४९.	वैष्णवी पाटील	भारती विद्यापीठ, सोलापूर
५०.	वैष्णवी म्हेत्रे	भारती विद्यापीठ, सोलापूर
५१.	साधना कांबळे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
५२.	ऋतुजा चटके	सेवासदन प्रशाला, सोलापूर
५३.	आफीया शेख	सेवासदन प्रशाला, सोलापूर
५४.	प्रतिक्षा कोळी	सेवासदन प्रशाला, सोलापूर
५५.	प्रगती भानवसे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
५६.	सोनम थिटे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
५७.	आर्या सुरडे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
५८.	जान्हवी शिखरे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
५९.	जान्हवी पवार	सेवासदन प्रशाला, सोलापूर
६०.	आदिती डोंगरे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
६१.	चैतन्य स्वामी	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
६२.	समर्थ विटकर	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
६३.	निवेदिता कर्ली	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
६४.	आदिती काळे	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
६५.	सृष्टी हराळे	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
६६.	सृष्टी माळी	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
६७.	अनुप्रिया तावरे	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
६८.	श्रेयश चौगुले	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
६९.	परमेश्वर कलशेट्टी	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
७०.	अथर्व डावरे	एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर
७१.	स्वराली वीटकर	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
७२.	स्वरा कुमारमुळे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
७३.	पियुष उदागे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
७४.	यंबुध्द सुर्वे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
७५.	शंभुराजे हावळे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
७६.	नव्या गणेश	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
७७.	शरयू भोसले	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
७८.	पूर्वी म्हमाणे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
७९.	त्रिवेणी भोसले	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
८०.	संस्कृती लव्हाळे	उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर
८१.	तेजस पवार	भारती विद्यापीठ, सोलापूर
८२.	शिवतेज जगताप	भारती विद्यापीठ, सोलापूर
८३.	अथर्वराजे खुने	भारती विद्यापीठ, सोलापूर
८४.	विक्रांत पाटील	भारती विद्यापीठ, सोलापूर
८५.	महावीर अलोक	भारती विद्यापीठ, सोलापूर
८६.	प्रज्वल गायकवाड	भारती विद्यापीठ, सोलापूर
८७.	पृथ्वीराज गौडनवरु	भारती विद्यापीठ, सोलापूर
८८.	युवराज अमाणे	भारती विद्यापीठ, सोलापूर
८९.	अतिफ शेख	भारती विद्यापीठ, सोलापूर
९०.	पवन बिराजदार	भारती विद्यापीठ, सोलापूर
९१.	वेदांती गवळी	सेवासदन प्रशाला, सोलापूर
९२.	ज्ञानेश्वरी गाडे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
९३.	अनुष्का भागवत	सेवासदन प्रशाला, सोलापूर
९४.	श्रद्धा व्यवहारे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
९५.	तेजश्री साळुंखे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
९६.	श्रेया खरात	सेवासदन प्रशाला, सोलापूर
९७.	गौरी कुलकर्णी	सेवासदन प्रशाला, सोलापूर
९८.	आराध्या कांबळे	सेवासदन प्रशाला, सोलापूर
९९.	कृतिका सोनटक्के	सेवासदन प्रशाला, सोलापूर
१००.	संस्कृती पिंपळकर	सेवासदन प्रशाला, सोलापूर

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत सोन्याची चैन लंपास

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

तुळजापूर बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत एका प्रवाशाची सोन्याची चैन चोरून नेण्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वडला विठ्ठल भारती (वय ५२, रा. साईबाबा नगर पांडूवस्ती, सुररम, ता. कुदबुलपापुर, जि. रंगारेड्डी, आंध्रप्रदेश) हे दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजता तुळजापूर बसस्थानकात बसमध्ये चढत होते.

त्यावेळी अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅम वजनाची, अंदाजे ८०,००० रुपये किंमतीची सोन्याची चैन चोरून नेली.

या घटनेबाबत पीडित वडला भारती यांनी २४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार तुळजापूर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तुळजापूर पोलीस चोरट्याचा शोध घेत असून पुढील तपास सुरू आहे.

संक्षिप्त वृत्त...

प्रेप, धाराशिवमध्ये जल्लोषात वार्षिक क्रीडा दिन साजरा

धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

प्रेप, धाराशिव येथे Jumbo in strings and sprints या थीमअंतर्गत वार्षिक क्रीडा दिन उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे डॉ. स्वप्नील यादव यांनी विद्यार्थ्यांना खेळांच्या मूल्यांची प्रेरणादायी जाणीव करून दिली. विद्यार्थ्यांसाठी फळांची सावलीशी जुळवा, हत्तीला शेपूट चिकटवा, भावनांशी जुळवा, कठपुतळीसारखे चालणे, योग पोजेस अशा मजेदार उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तर पालकांसाठी खास शर्यतीही घेण्यात आल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शरीर-समन्वय आणि भावनिक समज विकसित झाली. शेवटी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य वाल्मिक सोमसे सरांनी सर्वांचे अभिनंदन केले. क्रीडा दिन विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व संस्मरणीय ठरला.

शिवतेज भोसले यांना पीएच.डी. प्रदान

तुळजापूर, दि.२५ नोव्हेंबर -

येथील शिवतेज संभाजीराव भोसले यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या कडून राज्यशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. भोसले यांनी मानवतावादाची संकल्पना आणि मानवेंद्रनाथ रॉय यांचा नवमानवतावाद यावर आपला प्रबंध विद्यापीठास सादर केला होता.या कामी मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. निलेश शेरे, आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज, नळदुर्ग यांनी काम पाहिले. या यशाबद्दल माजी मंत्री तथा बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगावकर, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख, प्रा.डॉ. महेश मोटे, प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, उपप्राचार्य डॉ. प्रविण भाले, विठ्ठलराव गडदे, प्रा.डॉ. अंबादास बिराजदार, प्रा.डॉ. श्रीरंग लोखंडे, प्रा.डॉ. शिवाजी जेटीथोर यांनी अभिनंदन केले आहे.

नळदुर्ग : मतदान केंद्राध्यक्ष व अधिकाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण संपन्न

नळदुर्ग, दि.२५ नोव्हेंबर -

आगामी २ डिसेंबर रोजी होणारी नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक सुरळीत व निर्विघ्न पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण नळदुर्ग जि.प. प्रशाला (मुलांची शाळा) येथे २५ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आले. प्रशिक्षणाचे उद्धाटन अप्पर तहसिलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी रामकृष्ण जाधवर उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड यांनी सर्व उपस्थित कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक सूचनांचे सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात प्रमुखत्वे खालील मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. ईव्हीएम मशीनचे योग्य हाताळणी, मतदान अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, मतदान केंद्रावर पूर्ण करावयाची कागदपत्रे, मतदान सुरू असताना घेतली जाणारी काळजी यावर प्रशिंक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणास २० मतदान केंद्राध्यक्ष आणि १२५ मतदान अधिकारी उपस्थित होते.

24 तास पाणी, खड्डेमुक्त रस्ते, आकर्षक बागबगीचे आणि स्वच्छतेला प्राधान्य

आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे प्रतिपादन **भाजपाचा पाच कलमी निर्धार...**

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

धाराशिव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाकडून पाच कलमी महत्वाकांक्षी कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून २४ तास स्वच्छ व मुबलक पाणी, खड्डेमुक्त रस्ते, अद्ययावत स्वच्छता व्यवस्था आणि आकर्षक बागबगीचे ही शहराची गरज तातडीने पूर्ण करण्याचा निर्धार असल्याचे प्रतिपादन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पत्रकार परिषदेत केले.

पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठान भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत आमदार पाटील म्हणाले की, कधीकाळी १०० टँकरच्या आधारे पाणीपुरवठा करणाऱ्या धाराशिवला आज उजनी योजनेमुळे स्थिर पाणीपुरवठा मिळतो. आता त्याहून पुढे जाऊन २४ तास पाणी हे आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

उजनी पाणी योजनेनंतर शहराच्या प्रत्येक भागात अखंड पाणी उपलब्ध करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जाणार आहे.

खड्डेमुक्त रस्ते, नाली व विद्युत व्यवस्थेचे उन्नतीकरण शहरातील मूलभूत सुविधांसाठी पुढील पाच वर्षांत ३०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

अद्ययावत यंत्रसामग्रीच्या माध्यमातून दररोज कचरा संकलन व प्रक्रिया केली जाईल. कचर्याचे डोंगर आता भूतकाळात जमा होतील, असे आमदार पाटील म्हणाले.

शहरात दोन ठिकाणी प्रत्येकी चार कोटींची उद्याने मंजूर असून, आणखी एक 'नमो उद्यान' मिळाल्याची माहिती देत त्यांनी सांगितले की, सुमारे २५ कोटी रुपयांमध्ये बागबगीचे आणि वृक्षलागवड करून धाराशिवला हिरवाईने नटविले जाणार आहे.

नागरिकांना पालिकेत धाडसी फेर्या माराव्या लागू नयेत म्हणून व्हॉट्सअपद्वारे तक्रार नोंदणीची सुविधा, तसेच प्रशासनात पारदर्शकता आणणारे तंत्रज्ञान लागू केले जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या पद्धतीने राज्यकारभार गतीमान करतात, त्याच तंत्रज्ञानाचा वापर पालिका स्तरावर केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

यापूर्वीही शहरातील अनेक ऐतिहासिक विकासकामे आपल्याकडून घडवून आणली असून, पुढील काळात नागरिकांनी सुचविलेल्या अनेक मुद्द्यांचा विचार करून शहर अधिक प्रगत करण्याचा मानस असल्याचे आमदार पाटील यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेला नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार नेहा राहुल काकडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नेताजी पाटील, माजी नगराध्यक्ष मधुकरराव तावडे, संपतराव डोके, सुनील काकडे, युवराज नळे, नितीन भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

४९ वर्षीय महिलेवर फसवणूक व वारंवार लैंगिक अत्याचार

आरोपीवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

धाराशिव तालुक्यातील एका गावातील ४९ वर्षीय अनुसूचित जातीच्या महिलेची फसवणूक करून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पीडितेने दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरीनुसार ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी तरुणाला पीडित महिला अनुसूचित जातीची असल्याचे माहित असतानाही त्याने तिच्याशी बायकोसारखे वागण्याचे आमिष दाखवून वर्ष २०२२ पासून ते ०८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मानसिक व शारीरिक छळ केला. दोन मुलींचे शिक्षण व लग्नाची जबाबदारी घेण्याचे आश्वासन देत त्याने महिलेला विविध ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याहून धक्कादायक म्हणजे आरोपीने अत्याचाराचे व्हिडिओ चित्रीकरण करून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच पोलीसांकडे गेलीस तर तुला आणि तुझ्या मुलींना सोडणार नाही अशी दबाव टाकणारी धमकी दिल्याचेही पीडितेने तक्रारीत नमूद केले आहे.

पीडितेच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भा.दं.सं. कलम ६९, ३५१ (२) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३ (२) (व्हिए) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या गंभीर प्रकरणाचा अधिक तपास ग्रामीण पोलीस करत असून आरोपीचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

प्रचाराला वेग, पण वरिष्ठ नेत्यांच्या सभा अद्याप गायब

कळंब नगरपालिका निवडणूक तापली...

तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला
कळंब, दि.२५ नोव्हेंबर -

धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक महत्त्वाच्या राजकीय घडामोडीकडे सर्वप्रथम लक्ष वेधले जाते ते कळंब तालुक्याकडे. ग्रामपंचायत, सोसायटी, पंचायत समिती, जिल्हा परिषद असो किंवा कारखान्यांची निवडणूक - कळंब नेहमीच केंद्रस्थानी राहिला आहे. आता कळंब नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमुळे तालुक्यात पुन्हा एकदा निवडणूक वातावरण चांगलेच तापले आहे.

नगराध्यक्ष पदासह २० नगरसेवक पदांसाठी सुरू असलेल्या या निवडणुकीत स्थानिक पातळीवरील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले वैयक्तिक मतभेद, हेवे-दावे बाजूला ठेवत पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी तन-मन-धनाने झोकून दिले आहे. प्रत्येक उमेदवार घराघरात पोहोचून जनसंपर्क करत असून, रॅल्या, पदयात्रा, सोशल मीडिया मोहीमा यांना देखील मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे ही निवडणूक आता प्रतिष्ठेची ठरत चालली आहे.

मात्र, निवडणुकीसाठी केवळ चार दिवसच शिल्लक असताना कोणत्याही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची एकही जाहीर सभा किंवा कॉर्नर सभा न झाल्याने मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात नेमके कोणती आश्वासने दिली जातील, कोणत्या विषयांना प्राधान्य दिले जाईल, याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. स्थानिक स्तरावरील उमेदवारांनी मोर्चेबांधणी जोरात केली असली तरी आता सर्वांना पक्षातील मोठ्या नेत्यांच्या आगमनाची प्रतीक्षा आहे.

कळंबच्या राजकीय तापलेल्या वातावरणात आगामी काही दिवसांत वरिष्ठ नेते सभांसाठी येतात का, यावरच निवडणुकीतील पुढील समीकरणे आणि वातावरण रंगणार असल्याचे बोलले जात आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातून लोखंडी नांगर चोरी; अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

धाराशिव तालुक्यातील येडशी परिसरात चोरीची आणखी एक घटना समोर आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र येडशी येथून अंदाजे ४०,००० रुपये किंमतीचा लोखंडी नांगर अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची तक्रार धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

फिर्यादी उमेश पांडुरंग गायकवाड (वय ५०, रा. बौद्धनगर, येडशी) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे सुमारे १.४२ वाजता अज्ञात चोरट्याने त्यांच्या ताब्यातील लोखंडी नांगराची चोरी केली.

घटनेनंतर फिर्यादीने २४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरीनुसार धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

धाराशिव ग्रामीण पोलीस अधिक तपास करीत आहेत.

मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याप्रकरणी गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

येडशी टोलनाक्याजवळ मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविल्याप्रकरणी एका वाहनचालकाविरुद्ध धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही कारवाई २४ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहनवाज लियाकत बागवान (वय ३०, रा. मराठा गल्ली, आडस, ता. केज, जि. बीड) हे त्यांच्या ताब्यातील टाटा मांजा कार क्र. चक ४६ झ ४४१२ हायगतीने, निष्काळजीपणे आणि मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. ही घटना सुमारे दुपारी ४ वाजता येडशी टोलनाक्याजवळ घडली.

वरूडा आश्रमशाळेत प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांचे दमदार उद्घाटन

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते स्पर्धांना सुरुवात... **'आद्यक्रांतिवीर बिरसा मुंडा पुतळ्याचे अनावरण...**

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूरतर्फे आयोजित प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन धाराशिव तालुक्यातील वरूडा येथील सरकारी माध्यमिक आश्रम शाळेच्या मैदानावर मंगळवारी (दि. २५) जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे तसेच विस्तार अधिकारी प्रकाश पारवे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. विशेष अतिथी म्हणून आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे उपस्थित होते. यावेळी वरूडा सरपंच मीराताई गाढवे, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुधाकर भांगरे, संशोधन सहायक मनोहर पाटील, आदिवासी विकास निरीक्षक काशिनाथ राख, भागवत

आंधळकर, विशाल सरतापे, राजन चव्हाण, नाना काळे, वैशाली गंगावणे आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी आद्यक्रांतिवीर बिरसा मुंडा यांचा पुतळा आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे यांनी आश्रमशाळेला सुपूर्द केला. या पुतळ्याचे अनावरण जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मध्ये तीन शासकीय आणि दोन अनुदानित अशा एकूण पाच आश्रमशाळांमधील ३२० विद्यार्थी-खेळाडू सहभागी झाले आहेत. विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत प्रतिभेला वाव मिळावा हा या स्पर्धांचा उद्देश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विशाल सरतापे यांनी केले. शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष नाना काळे, सदस्य, ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब कोंढारे यांनी केले.

न.प. निवडणुकीत कमळाला 'घड्याळाची', हाताला 'पतंगाची' धास्ती

तभा वृत्तसेवा / विलास येडगे
नळदुर्ग, दि.२५ नोव्हेंबर -

नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक युती-आघाडीतील बिघाडीमुळे रंगतदार झाली आहे. पारंपरिक राजकीय समीकरणे ढवळून निघाल्याने कमळ, हात आणि घड्याळासोबतच एमआयएमच्या पतंगानेही संपूर्ण निवडणुकीचे गणित बदलले आहे.

सध्या चारही प्रमुख पक्षांचे उमेदवार डोअर-टू-डोअर प्रचार, डिजिटल डिस्प्ले वाहने, ध्वनीक्षेपक रॅली, यासोबतच सोशल मीडिया प्रचारात मोठ्या ताकदीने उतरले असून शहरात निवडणूक तापली आहे. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि एमआयएम या चारही पक्षांना शहरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

नगराध्यक्षपदासाठी बसवराज धरणे (भाजप), अशोक जगदाळे (काँग्रेस), संजय बताले (राष्ट्रवादी अजित पवार गट) व शहेबाज काझी (एमआयएम) हे तगडे आणि अनुभवी उमेदवार रिंगणात आहेत. त्यामुळे निवडणूक अटीतटीची होण्याचे संकेत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांनीही आता जोमात मैदानात उडी घेतली असून नगराध्यक्षपदाचे उमेदवार महेबुब शेख आणि त्यांच्यासोबत पक्षाचे नगरसेवक पदाचे उमेदवार - आनंद पुदाले, कैलास चव्हाण, चंद्रकांत दस, माजी नगराध्यक्षा मंगलबाई सुरवसे आदींनी आक्रमक प्रचाराला सुरुवात केली आहे.

युती आणि आघाडीमधील बिघाडामुळे पारंपरिक मतविभाजन तुटले आहे. भाजपच्या विजयाचे गणित घड्याळाने बिघडवले, तर काँग्रेसच्या हाताला एमआयएमच्या पतंगामुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे.

काँग्रेसची मुस्लिम मतदारांवर मोठी भिस्त आहे. मात्र एमआयएमचा वाढता प्रभाव हाताचे समीकरण ढवळून काढत आहे. नळदुर्ग शहरात आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झाल्याचा दावा भाजप करत आहे.

त्यामुळे निवडणूक विकासाच्या मुद्द्यांवर गेल्यास भाजपचे पारडे जड ठरू शकते, असे निरीक्षकांचे म्हणणे आहे.

> **जातीय राजकारणाची छाया...**
> निवडणूक जवळ येताच काही उमेदवार जातीय समीकरणांचा पिच्छा करताना दिसत आहेत. मात्र निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यांवर लढली गेली पाहिजे, असे नागरिकांचे मत आहे.

> **लिंगायत समाजाची ऐतिहासिक संधी धोक्यात...?**
> नगरपालिकेच्या ७० वर्षांच्या इतिहासात प्रथमच नगराध्यक्षपदाची संधी लिंगायत समाजाला मिळाली होती. परंतु या समाजाचे दोन मजबूत उमेदवार रिंगणात आल्याने मतविभाजन होण्याची शक्यता असून ही ऐतिहासिक संधी हुकू शकते, अशी स्थानिकांमध्ये चर्चा आहे.

मोटरसायकलच्या धडकेत पादचारी ठार

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२५ नोव्हेंबर -

मंगरुळ (ता. कळंब) गावातील विनायक राजेंद्र कापसे (वय ५३) यांचा मोटरसायकलच्या धडकेत मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २२ नोव्हेंबर २०२५ रोजी घडली. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात निष्काळजी वाहनचालकाविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विनायक कापसे हे रात्री सुमारे ७.३० वाजता देवधानोरा शिवारातील जयभवानी हॉटेलजवळून पायी जात असताना, मोटरसायकल क्रमांक एमएच ४४ एए १४४२ या वाहनाने त्यांना पाठीमागून जोराची धडक दिली. ही मोटरसायकल गुरुनाथ राजेभाऊ कसबे (रा. होळ, ता. केज, जि. बीड) यांच्या ताब्यात होती.

धडकेमध्ये विनायक कापसे गंभीर जखमी झाले आणि उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेबाबत मृताचे प्रतिक विनायक कापसे (वय २१, रा. मंगरुळ) यांनी २४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पुढील तपास शिराढोण पोलीस करत आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

मांजरा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा

संबंधित अधिकारी मूग गिळून गप्प

त.भा. वृत्तसेवा,

देवणी , २५ नोव्हेंबर : तालुका हा सीमा वर्ती भागात वसलेला असल्यामुळे रोज दिवस रात्र वागदरी, बोरोळ, सिंधीकामठ, गौंडगाव, बटनपुर, लासोना, इंद्राळ, वडमुरंबी आणि दवणहिप्परगा भागातुन वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर अवैध रित्या चालू

असतानो मात्र संबंधित देवणी तालुक्याचे अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून मुग गिळून गप्प बसले आहेत. यांचा फायदा संबंधित अवैध वाळू उपसा करणारे मालक माला माल होत चालले आहेत.

सर्वसामान्य नागरिकांना स्वस्तातील ६०० रुपये प्रति ब्रासप्रमाणे वाळू मिळावी हे शासनाचे धोरण जाहीर झाले.या धोरणानुसार मांजरा नदीवर सदर ठिकाणी वाळु डेपोही सुरू असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.पण अद्याप एकाही ग्राहकांना स्वस्तातील वाळु मिळाली नाही.उलट हे ठेकेदार दररोज हायवा भरुन अवैध विक्री करताना दिसुन येतात. मांजराकाठावरील वाळुची तस्करी करणाऱ्याला आवरा अशी साद महसूल प्रशासनाकडे सर्वसामान्य जनतेतुन केली जात आहे.

वाळमाफियांनी मांजरा काठावर सर्वसामान्यांना जणु उलटं टांगले आहे. कारण रेतीचे अलिखीत धोरण हेच सांगते, कमी कष्टाने प्रशासनाशी हातमिळवणी करत व सर्वसामान्यांशी दांडगाई करत वाममार्गाने भरपुर कमाई करता येते.वाळुमाफिया हा गुन्हेगारी शब्द शहरी व ग्रामीण भागात चांगलाच रुजला असताना... प्रशासनाने टेंडरच्या गोंडस नावाखाली अवैध धंदे वाल्यांना वैद्य करण्याची मोहर उमटविल्याने सामान्यांनी आता न्याय कोठे मागायचा जटील प्रश्न उपस्थित होतो आहे.

गावपातळीवरील सरपंच, पोलिस पाटील, तलाठी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी ते गौण खनिज अधिकारी यांना हा सर्व प्रकार माहित असताना गप्प का? याबाबत चौकशी केली असता यांना वारेमाप हप्ते देवून तोंडे बंद केली जातात अशी सर्वसामान्य नागरिकांतुन बोलले जात आहे.

आवर घालणार कोण...?

प्रशासनाच्या सल्ल्यानुसार अवैध वाळू उपसा करायचा परत तो साठा प्रशासनाला सांगुन जप्त करायचा व नंतर त्याचा लिलाव करुन तो ठेका आपणच घ्यायचा हा प्रशासनाचा सल्ला असल्याने वाळुमाफिया बिनधास्त झाले आहेत.शिवाय सर्वच हप्ते घेत असल्याने आता याला आवर कोण घालायचा..? महसुल विभागात इमानदार अधिकारी आहे का? अशी चर्चा मांजरा पट्ट्यात आहे.

विकासाला गती देण्यासाठी भाजपाला साथ द्या : आ. पवार

त.भा. वृत्तसेवा,

औसा, २५ नोव्हेंबर : औसा शहरात उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे काम जलदगतीने सुरु आहे. गेल्या तीस वर्षापासूनची मागणी असलेली माकणी पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली असून शहरातील रस्ते-नाल्याचे कोट्यवधीं रुपयांचे कामे पूर्ण झाली असून ५०० कोटी रुपयापेक्षा अधिक निधी शहरासाठी मिळवून दिला आहे. यापुढील काळात औसा शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी युतीला साथ द्या, असे आवाहन आमदार पवार यांनी केले आहे.

युतीच्या रॅली-बैठकींना उत्स्फूर्त प्रतिसाद

भाजप-शिवसेना-रिपाइं युतीच्या प्रचार मोहिमेला औसा शहरातील मतदारांचा उत्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रभाग ९ व प्रभाग २ मधील रॅली व कॉर्नर बैठका उत्साहात पार पडल्या. या बैठकीत आ. अभिमन्यू पवार बोलत होते.युतीचे अध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. ज्योती महादेव बनसुडे तसेच नगरसेवकपदाचे उमेदवार फातेमा उमर पंजेशा व सोमनाथ गुरुपदप्पा इळेकर, सुनील सिद्रामप्पा मिटकरी, सौ. ऐश्वर्या पवनराज राचट्टे उपस्थित होते.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, शहरात अनेक समस्या दूर झाल्या असून मुक्तेश्वर रस्ता, त्यालगतची नाली, दूरसंचार कार्यालयासमोरील रस्ता, अन्नपूर्णा नगर रस्ता यांसह प्रभागातील रस्ते, नाली, गटारी आणि मूलभूत सुविधांची एकूण ७८ कामे पूर्ण झाली आहेत.

कांही प्रलंबित कामे निवडणुकीनंतर तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन आ. पवार यांनी दिले. शहरात विकासाचे वारे ओसडून वाहत आहेत.

या विकासाच्या लाटेत औसेकर युतीच्या उमेदवारांना विजयी आशिर्वाद देतील असा विश्वास आ. पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

मतदारांनी सजग राहून मतदान करावे: रायभोले

त.भा. वृत्तसेवा,

अहमदपूर, २५ नोव्हेंबर : मतदान हे भारतीय राज्यघटनेने सर्वांना बहाल केलेला मौलिक अधिकार आहे. सर्व नागरिकांनी अत्यंत सजग राहून आपला मतदानाचा अधिकार बजावावा असे आवाहन पोलीस उपविभागीय अधिकारी अरविंद रायभोले यांनी केले.

येथील विकास मंडळ संचलित, महात्मा गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मतदान जनजागृती व शिस्तपालन विषयक कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित अहमदपूर येथील पोलीस उपविभागीय अधिकारी मा. अरविंद रायभोले यांनी मतदान जागृती आणि शिस्तपालन विषयक विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन करताना वर्तमान काळामध्ये लोक फसवणूकीचे अनेक फंडे वापरत असून सायबर गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. तरी

युवकांनी यापासून सावध राहणे आवश्यक आहे. त्याबरोबरच महाविद्यालयात वावरताना व आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी सर्वांनी शिस्तीचे पालन करणे ही काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी अहमदपूरच्या नायब तहसीलदार शुभांगी जवादे यांनीही विद्यार्थ्यांना लोकशाहीमध्ये मतदानाचे अत्यंत महत्त्व असून विद्यार्थ्यांनी याविषयी आपल्या कुटुंबात व समाजामध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेबरोबर एक आदर्श नागरिक घडण्यासाठी व भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयातील अग्नीवीर मध्ये भरती झालेल्या शिवभक्त राजेंद्र, कच्छवे सिद्धेश्वर, ढवळे संविधान, मुंढे शुभम, घुगे चंद्रकांत यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

व्यासपीठावर संस्थेचे प्राध्यापक प्रतिनिधी डॉ. आर. एम. कदम, प्रा. हेमंत पाटील, उपप्राचार्य डॉ. जे. पी. कलकर्णी, सिनेट सदस्य डॉ विनोद माने, पर्यवेक्षक प्रा. एस. के. गायकवाड, प्रा. ए. एन. शिंदे, एन. सी. सी. प्रमुख डॉ. ए. एम. शिंदे, ग्रंथालय प्रमुख डॉ. एस. आर. सुळसुळे, तसेच महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आर. डी. गुळवे यांनी केले आभार डॉ. विनोद माने यांनी मानले.

विशेष शिक्षकांना सुधारित आदेश देण्याचे आश्वासन

विशेष शिक्षक संघटनेचे सचिन वळके यांच्या पाठपुराव्याला यश । वेतन फरकाचा प्रश्न मिटला

त.भा. वृत्तसेवा,

औसा, २५ नोव्हेंबर : राज्य सरकारकडून निर्गमित झालेल्या आदेशानुसार सेवेत कार्यरत असलेल्या विशेष शिक्षकांना लागू केलेल्या वेतनश्रेणीनुसार सुधारीत आदेश तात्काळ द्यावेत.तसेच थकित वेतनातील फरकाची रक्कम देण्याची मागणी संघटनेचे सचिन वळके यांनी केली. या मागणीची दखल घेत प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी सुधारीत आदेश व वेतनातील फरकाची रक्कम देण्याचे आश्वासन यावेळी दिले. यामुळे विशेष संघटनेच्या मागणीनंतरच्या

पाठपुराव्याला यश आले आहे.

लातूर प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा तृप्ती अंधारे यांनी पदाभार स्विकारल्यानंतर संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यानंतर लातूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या व नव्याने नियुक्ती मिळालेल्या विशेष शिक्षक संघटनेच्या वतीने सचिन वळके यांच्या शिष्टमंडळाने शिक्षणाधिकारी अंधारे यांच्या समवेत जिल्हा स्तरावरील प्रलंबीत विविध विषयावरील अडचणी संदर्भात चर्चा केली. यावेळी राज्य सरकारकडून निर्गमित झालेल्या आदेशानुसार कार्यरत विशेष शिक्षकांना लागू असलेल्या वेतनश्रेणी नुसार सुधारित आदेश तात्काळ देण्यात यावेत. तसेच शासन निर्णयानुसार मागील वर्षाचे थकीत वेतन फरकही तात्काळ देण्यात यावा.अशी मागणी प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्याकडे करण्यात आली.

कांही दिवसापुर्वी संघटनेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांची भेट घेऊन मागणी केली होती. यावेळी तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या होत्या. यावेळी संघटनेचे नेते सचिन वळके पाटील, किशोर शिंदे, धनाजी मिसाळ, प्रीती साळुंके उपस्थित होते.

नर्सिंग कॉलेज विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जनजागृती

त.भा. वृत्तसेवा,

अहमदपूर, २५ नोव्हेंबर : संत तुकाराम नर्सिंग कॉलेज, अहमदपूर येथे नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने मतदार जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींना मतदानाचे महत्त्व व लोकशाहीतील सहभागाची गरज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. एकही मत व्यर्थ जाऊ नये व प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा असा संदेश यावेळी देण्यात आला.

निवडणुकीच्या लोकोत्सवात सर्वांनी योगदान देऊन अहमदपूर नगर परिषदेचे मतदानाची टक्केवारी वाढवावी. विविध घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. विद्यार्थिनी व उपस्थितांनी चांगल्या प्रशासनासाठी जबाबदार मतदार व्हा असा संकल्प केला. सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, मुख्याधिकारी नगरपरिषद अहमदपूरचे प्रतीक लंबे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या आदेशाने स्वीप कलापथकाद्वारे स्वीपचे सदस्य महादेव खळुरे, शिवकुमार गुळवे, मोहन तेलंगे, बस्वेश्वर थोटे, विवेकानंद भंडे यांनी प्रबोधन पर पोस्टर्सच्या माध्यमातून जनजागृती केली. संत तुकाराम नर्सिंग कॉलेज अहमदपूरचे संचालक दत्तात्रय दळवे अध्यक्ष दिपक दळवे, प्राचार्य ऋषिकेश केंद्रे, प्रा. प्रवीण लहाने, प्रा. कृष्णा वडवळे, प्रा.प्रतिक्षा गुंजरगे व दळवे हाँस्टेलचे सचिव तुकाराम मंगनाळे आदिसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

लोहपुरुष पटेल यांच्या जयंतीनिमित्त युनिटी मार्च

त.भा. वृत्तसेवा,

उदगीर , २५ नोव्हेंबर : उदगीर येथील जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळेच्या प्रांगणात

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त भव्य रैलीचे आयोजन उदयगिरी महाविद्यालय एनएसएस विभागात अंतर्गत करण्यात आले होते. यात शहरातील लालबहादूर शास्त्री विद्यालय, श्यामलाल विद्यालय, मातृभूमी कॉलेज छात्रसैनिक यांनी सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उदगीरचे उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तथा उदगीरचे तहसीलदारराम बोरगावकर उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाराष्ट्र उदयगिरी कॉलेजचे प्राचार्य डॉ.मस्के होते. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक बालाजी हुकरणे यांनी केले तर कार्यक्रमाचे जबाबदारी नगरपरिषद अधिकारी महारुद्र गालट यांनी उपस्थित राहून केले.

एकता रॅलीचा मार्ग जिल्हा परिषद मैदान, शिवाजी चौक ते लालबहादूर शास्त्री विद्यालय येथे होता. यात क्रीडा शिक्षक संतोष कोले, सहशिक्षिका लक्ष्मी चव्हाण व एनसीसी प्रमुख वि.र. तेलंग, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, कृष्णा मारावर, किरण नेमट हे उपस्थित होते.

सार्व. ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची जळकोट तालुका कार्यकारीणी

त.भा. वृत्तसेवा,

जळकोट, २५ नोव्हेंबर : सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची जळकोट तालुका कार्यकारीणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी यशवंत कुलकर्णी तर उपाध्यक्षपदी माधव मिरजगावे व सुमन आडे यांची निवड करण्यात आली आहे.

मंगळवारी जळकोट येथील हुतात्मा गुरुबस सार्वजनिक वाचनालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीला सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे राज्य संघटक विद्यासागर हणमंते, मराठवाडा विभागाचे कार्यध्यक्ष मनोहर गायकवाड, जिल्हाध्यक्ष श्रीधर स्वामी, सचिव

संतोष करमले आदींची उपस्थिती होती. यावेळी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीतील उर्वरित पदाधिकाऱ्यात कार्याध्यक्ष देविदास माने, सचिव बालजी सूर्यवंशी, सहसचिव गंगाधर हावा, खनिजदार अशोक कारभारी तर सदस्यपदी तानाजी सूर्यवंशी, राजपाल देवशेट्टे संग्राम कोळसे आदिची निवड करण्यात आली.

या बैठकीत राज्य संघटक हणमंते यांनी कर्मचारी विकास परिषदेची स्थापना कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळाले पाहिजे यासाठी करण्यात आली असून या मागणीसाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात ११ डिसेंबरला मोर्चा निघणार आहे.

या मोर्चाला जास्तीत जास्त संख्येने ग्रंथालयाशी संबंधित कार्यकारीणी पदाधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन केले. बैठकीचे सूत्रसंचालन संतोष करमले यांनी तर आभार प्रदर्शन माधव मिरजगावे यांनी केले.

राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत अहमदपूरच्या मुलींना रौप्य पदक

त.भा. वृत्तसेवा,

अहमदपूर, २५ नोव्हेंबर : दिल्ली येथे सुरु असलेल्या १५ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर दरम्यान ३६ व्या वरिष्ठ राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या इप्पी मुलींच्या संघाने उज्वल इतिहास रचला आहे. अहमदपूर (जि. लातूर) येथील चारही खेळाडूंनी मिळून खेळलेल्या या संघाने अप्रतिम वर्चस्व गाजवत रौप्य पदकावर आपले नांव कोरले.या ऐतिहासिक पथकात समाविष्ट आहेत - ज्ञानेश्वरी माधव शिंदे, माही किशोर अरदवाड, जान्हवी गणपतराव जाधव, रोहिणी देवराव पाटील या चौघींनी मिळवलेले रौप्य पदक महाराष्ट्राच्या तलवारबाजी इतिहासात पहिल्यांदाच इप्पी सांघिक मुलींच्या प्रकारात मिळालेले महत्त्वपूर्ण यश आहे.

या कामगिरीमुळे महाराष्ट्राने राष्ट्रीय पातळीवर दुसरा क्रमांक पटकावला असून, राज्याच्या खेळजगताची मान आणखी उंचावली आहे. खेळातील जिद्द, अचूक रणनीती, सततचा सराव आणि संघभावनेच्या जोरावर या मुलींनी अवघ्या देशाचे लक्ष वेधून घेतले आहे.

अहमदपूरच्या भूमीतून राष्ट्रीय स्तरावर अशी भव्य कामगिरी घडवून आणणाऱ्या या चारही खेळाडूंनी लातूर जिल्ह्याच्या क्रीडा परंपरेत अभिमानाची भर घातली आहे. या यशामुळे महाराष्ट्राच्या तलवारबाजी संघाला नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाली असून भविष्यात आणखी मोठी कामगिरी करण्यासाठी हा मैलाचा दगड ठरणार आहे.या विजयी पथकाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, खेळाडू, पालक व प्रशिक्षकांचा अभिमान दुणावला आहे. या खेळाडूंना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. दत्ता गलाले, वजीरोदीन काजी, मोसिन शेख, रोहित गलाले, आकाश बनसोडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गुणवंत खेळाडूंचे जिल्हा क्रीडा कार्यालय लातूर, शिवछत्रपती क्रीडा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त गणपतराव माने, लातूर तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष अभिजीत मोरे, प्रशांत माने, संतोष कदम, वैभव कज्जेवाड, मेहफूजखान पठाण लातूरच्या सर्व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले आहे.

परिसराची ओळख करून देणारी 'बगळा' कादंबरी : अंबुलगेकर

त.भा. वृत्तसेवा,

उदगीर , २५ नोव्हेंबर : परिसर आणि परिस्थितीनुसार चालीरीती, रूढी- परंपरा व राहणीमान आणि बोली बदलत असतात. त्यातूनच प्रत्येक गावची वेगळी ओळख निर्माण होते. श्रद्धा आणि समज हे प्रसंगाधिष्ठित असतात. अशा परिस्थितीचा कुटुंबासह बालमनावर परिणाम होतो. या सर्वांवर प्रकाश टाकत उदयगिरी बोली आणि परिसराची ओळख करून देणारी बगळा ही कादंबरी होय असे मत अंबुलगेकर यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत चालू असलेल्या वाचक संवादचे ३४९ वे पुष्प सुप्रसिद्ध साहित्यिक शिवाजी अंबुलगेकर यांनी उदगीरचे भूमिपुत्र प्रसाद कुमठेकर लिखित बगळा या कादंबरीवर संवाद साधून गुंफले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहि साहित्यिक राजेश्वर वेरुळकर हे होते. अत्यंत प्रभावी ठरलेल्या या कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ. म. ई. तंगावार यांनी केले, पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ. विठ्ठल गोरे यांनी तर आभार लेखक तुळशीदास बिरादार यांनी मानले.

'संविधान अमृत महोत्सव' राज्यभर लोकचळवळ म्हणून साजरा करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२५ नोव्हेंबर -

भारतीय संविधान हे जगातील सर्वाधिक लोकशाहीप्रधान व समतेवर आधारित संविधान मानले जाते. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाची हमी देणाऱ्या या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना संविधान अमृत महोत्सव हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता लोकचळवळीचे स्वरूप मिळावे, या मागणीसाठी कळंब येथील दयावान प्रतिष्ठानतर्फे उपविभागीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात राज्यभर खालील उपक्रम अधिकृतरीत्या राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. सर्व शासकीय व निम शासकीय कार्यालयांत सामूहिक संविधान प्रस्तावना वाचन, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, प्रत्येक जिल्हा व तालुकास्तरावर संविधान जनजागृती रॅली, ग्रामीण व शहरी भागात संविधान मूल्यांवर आधारित कार्यशाळा व प्रशिक्षण शिबिरे, युवकांमध्ये संविधानप्रेम निर्माण करण्यासाठी विशेष शैक्षणिक व सामाजिक अभियान.



> स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर साजऱ्या होणाऱ्या अमृत महोत्सवाच्या धर्तीवर हा 'संविधान अमृत महोत्सव' सामाजिक जागृतीचे अभियान आहे. युवा पिढीत संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी आणि हा महोत्सव औपचारिक न राहता लोकशाही मूल्यांची जनचळवळ व्हावी, यासाठी आमचा हा प्रयत्न.
>
> **- अभय गायकवाड,** दयावान प्रतिष्ठान, कळंब

निवेदनात नमूद केले आहे की, संविधान हा केवळ ग्रंथ नसून भारतीय लोकशाहीची आत्मा आहे. त्यातील मूल्ये समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचली पाहिजेत. अमृत महोत्सव हा सरकारी पातळीवर न राहता जनतेचा उत्सव झाला पाहिजे.

दयावान प्रतिष्ठानने राज्यभर हा महोत्सव मोठ्या प्रमाणावर, अधिकृत पातळीवर साजरा करण्यासाठी सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, तसेच घेतलेला निर्णय लवकरात लवकर कळवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

कार्यक्रमावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इम्रान मुल्ला, उपाध्यक्ष इम्रान काझी, तसेच समीर सय्यद, अक्षय सातव, विशाल फल्ले, शफिक शेख, मुन्ना तांबोळी, बबलू शेख, आकाश पवार, मोसिन मुल्ला, अलीम दारूवाले, आकाश किरवे उपस्थित होते.

आरोग्य विभागाच्या विविध समित्यांच्या महत्त्वपूर्ण बैठका संपन्न

टीबी मुक्त भारत, लसीकरण व गुणवत्तावृद्धीवर भर...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

आरोग्य विभागाच्या विविध समित्यांच्या महत्त्वपूर्ण बैठका २० नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी श्री.किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात घेण्यात आल्या. या सभेत जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने या बैठकीत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी डॉ.मैनाक घोष,मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., डॉ. सतीश हरिदास, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ.मारुती गोरे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग), डॉ. अभिजीत बनसोडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ.के.के. मिटकरी, जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी, डॉ. सुशील चव्हाण, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रमजान शेख, वैद्यकीय अधिकारी आर.बी. जोशी, प्रशासकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय सास्तुर तसेच सर्व वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय प्रमुख, सर्व तालुका आरोग्य अधिकारी आणि समिती सदस्य उपस्थित होते.

बैठकीत मुख्यत्वे खालील समित्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. यामध्ये रुग्ण कल्याण समिती (जिल्हा रुग्णालय धाराशिव), जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटी, आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८), पी.सी.पी.एन. डी.टी. सल्लागार समिती, तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती, आर.के.एस. समिती, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, जिल्हास्तरीय लसीकरण



टास्क फोर्स,१५ वा वित्त आयोग, जन्म-मृत्यू नोंदणी समन्वय समिती, अनधिकृत वैद्यकीय व्यावसाय (बोगस डॉक्टर) शोध समिती व राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमचा आढावा घेण्यात आला.

बैठकीत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रगती, मातृ-मृत्यू व बाल-मृत्यू दर कमी करण्यासाठीचे उपक्रम, कुपोषण निर्मूलन मोहिमेची स्थिती, प्राथमिक व ग्रामीण आरोग्य केंद्रांतील सुविधा, रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेची सद्यस्थिती, तसेच डेंग्यू, मलेरिया, क्षयरोग, कुष्ठरोग आदी आजारांविरोधातील उपाययोजना या सर्वांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सुधारणा आवश्यक असलेल्या बाबींवर मार्गदर्शनही करण्यात आले.

या सभेमध्ये जिल्ह्यातील आरोग्य संस्था-निहाय टीबीमुक्त भारत अभियानाचा देखील आढावा घेण्यात आला. यात २ लाख ८३ हजार १७४ जोखीमग्रस्त लोकसंख्येची निक्षय पोर्टलवर नोंदणी करायची असून १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत एक लाख १५ हजार ४४४ एवढी नोंदणी पूर्ण झाली आहे. तसेच ४४ हजार ६१३ एक्स-रे झालेल्या व्यक्तींची नोंदणी निक्षय पोर्टलवर करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागांमध्ये संशयित क्षयरुग्ण शोधण्याचे काम उद्दिष्टानुसार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या हस्ते दोन क्षयरुग्णांना पोषण आहार किट देण्यात आले. क्षयरुग्णांच्या पोषणासाठी दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी केले.

बैठकीच्या शेवटी, जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेच्या उन्नतीसाठी पुढील कालावधीसाठी सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

जळकोटवाडी नळ येथील सरपंचांसह अनेकांचा भाजपात प्रवेश

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२५ नोव्हेंबर -

तुळजापूर तालुक्यातील जळकोटवाडी नळ येथील सरपंच मंगलताई कमलाकर जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

आमदार पाटील यांच्या नेतृत्वाखाली तुळजापूर तालुका सातत्याने विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याने गावातील लोकप्रतिनिधी व नागरिकांचा कल वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर सरपंच मंगलताई चव्हाण, माजी सरपंच चंद्रकला वाघदरे, तसेच श्रीधर कदम, बारकुलबाई सोमवंशी, सुकुमार कदम, रघुनाथ जाधव, मनोज लष्करे, मनोज कदम, सुरेश पवार, सचिन कदम, अरुण कदम, प्रकाश राठोड, बालाजी घोरपडे, गंगाराम भांगे, परमेश्वर कदम, राजेंद्र वाघमारे, गोकुळ कदम, अप्पाराव कदम, बंकट राठोड, सचिन लष्करे, बब्रुवान पवार, हरीदास कदम, गुणवंत मुळे, बालाजी लष्करे व मच्छिंद्र सुरवसे यांनी भाजपात प्रवेश केला. या नवागत कार्यकर्त्यांचा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सत्कार करून पक्षात स्वागत केले.

या प्रवेशामागे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आशिष सोनटक्के आणि तांडा सुधार समितीचे अशासकीय सदस्य विलास राठोड यांचे प्रयत्न महत्त्वाचे ठरले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

तुळजापूर तालुक्यात भाजपची ताकद वाढवणारा हा सामूहिक प्रवेश उत्साहात पार पडला.

महाविस्तार ॲप : शेतकऱ्यांच्या हातात डिजिटल कृषिज्ञानाचे प्रभावी साधन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक स्मार्ट, वैज्ञानिक आणि उत्पादनक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरत असलेल्या महाविस्तार (MahaVISTR) ॲपने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक प्रतिसाद मिळवला आहे.

१६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्ह्यातील ५०३० शेतकऱ्यांनी हे ॲप डाउनलोड केले असून, शेतकरी डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारत असल्याचे हे सूचक उदाहरण असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सांगितले. शासनाने डिसेंबर २०२५ पर्यंत प्रत्येक गावातील किमान २० टक्के शेतकऱ्यांनी हे ॲप सक्रियपणे वापरण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

अवैध दारूविरोधात शिराढोण पोलिसांची मोठी कारवाई

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

अवैध दारू निर्मिती व विक्रीच्या विरोधात शिराढोण पोलिसांनी मोठी कारवाई करत चार ठिकाणी धाड टाकून मोठ्या प्रमाणात गुळमिश्रीत रासायनिक द्रव, गावठी दारू व देशी-विदेशी मद्य जप्त केले. या कारवाईत चार आरोपींविरोधात महाराष्ट्र मद्यनिषेध कायद्यान्वये स्वतंत्र गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

दि.२२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता घारगाव तांडा, ता. कळंब येथे पहिली कारवाई करण्यात आली. आरोपी मीरा रामराव पवार (वय ४६) जप्त: अंदाजे ६५,००० रुपये किंमतीचा १,००० लिटर गुळमिश्रीत रासायनिक द्रव व २५० लिटर गावठी दारू उद्देश: अवैध विक्री, आरोपी चांगुनाबाई जनक राठोड (वय ४४) जप्त: अंदाजे ४९,५०० रुपये किंमतीचा ७५० लिटर रासायनिक द्रव व २०० लिटर तयार गावठी दारू, आरोपी विनोद बालु पवार जप्त: अंदाजे ७४,५०० रुपये किंमतीचा १,२५० लिटर रासायनिक द्रव व २०० लिटर गावठी दारू.

तिन्ही ठिकाणी आरोपींच्या राहत्या घरांसमोरच मोठ्या प्रमाणात अवैध दारू निर्मितीचे साहित्य व दारूचा साठा मिळून आला.

रोटरीतर्फे कळंबमध्ये उद्या मतदार जागृती रॅलीचे आयोजन

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२५ नोव्हेंबर -

लोकशाहीच्या बळकटीसाठी प्रत्येक नागरिकाने मतदानात सक्रिय सहभाग घ्यावा, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी आणि तहसील कार्यालय, कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता भव्य मतदार जागृती रॅली आयोजित करण्यात येत आहे. रॅलीची सुरुवात तहसील कार्यालय परिसरातून होणार असून, स्थानिक शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, स्वयंसेवक आणि रोटरी सदस्य या रॅलीत सहभागी होणार आहेत.

या उपक्रमाचे आयोजन मा. तहसीलदार हेमंत ढोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचे अध्यक्ष रो. डॉ. अभिजीत जाधवर आणि सचिव रो. श्याम जाधवर यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे. याशिवाय प्रकल्प प्रमुख रो. रवि नरहिरे आणि रो. अरविंद शिंदे यांनी शाळांशी समन्वय, रॅलीतील उपक्रमांची आखणी तसेच जनजागृती

संदेशांची रचना यासाठी विशेष मेहनत घेतली आहे.

रॅलीदरम्यान विद्यार्थी घोषवाक्ये, फलक आणि जनजागृती संदेशांच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देणार आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक मतदाराचे मत मौल्यवान असल्याचा संदेश या रॅलीद्वारे पोहोचवण्यात येणार आहे.

नागरिक, पालक आणि सर्व सामाजिक घटकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मतदानाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

वाशी येथे दत्त मंदिर देवस्थानतर्फे दत्त जन्मोत्सवानिमित्त भव्य धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.२५ नोव्हेंबर -

दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट वाशी यांच्या वतीने दत्त जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून मुख्य दत्त जन्माचा कार्यक्रम गुरुवार, ४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता पार पडणार आहे.

या पवित्र उत्सवाची सुरुवात गुरुवार, २७ नोव्हेंबर पासून होऊन कार्यक्रमांची सांगता शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे. संपूर्ण आठवडाभर नामस्मरण, कीर्तन व विविध आध्यात्मिक उपक्रमांनी परिसर भक्तिमय वातावरणाने नटणार आहे.

दररोज रात्री ९ वाजता प्रसिध्द किर्तनरत्न ह.भ.प. सुनील महाराज आष्टीकर (सेलू, जि. परभणी) यांचे श्रुसाव्य किर्तन होणार आहे. तबलावादक : चैतन्य देशपांडे, हार्मोनियम वादक : तेजस रत्नपारखी (हिंगोली) यांचे कार्यक्रम होणार आहेत. त्यानिमित्त भाविकांना ज्ञान, भक्ती आणि अध्यात्मिक समाधान मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या कालावधीत दररोज सायंकाळी ४ ते ७ विविध संस्कृत व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, भाविकांसाठी गुरुचरित्र पारायण आयोजित करण्यात आले आहे.

गुरुवार, ४ डिसेंबर हा मुख्य उत्सव दिवस असून कार्यक्रमांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे सकाळी ६ वाजता श्री. रुद्राभिषेक, सकाळी ११ वाजता पालखी नगर प्रदक्षिणा, सायंकाळी ६ वाजता दत्त जन्म कार्यक्रम, दाते आणि महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

या पवित्र कार्यक्रमासाठी बंडू मोळवणे, महेश कुंभार, रवींद्र लिखिते, विवेक श्रीकृष्ण जोशी, नंदकिशोर बारगजे, भाऊसाहेब माळी, प्रकाश पत्की, हनुमंत अवधूत चेडे, देशमुख आदी मान्यवर दाते पंगत सेवेसाठी पुढाकार घेणार आहेत.

शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५ रोजी दत्तात्रय पांडुरंग महाजन यांच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सर्व कार्यक्रम श्री दत्त मंदिर देवस्थान, ब्राह्मण गल्ली, वाशी येथे होणार आहेत.

वाशी तसेच तालुक्यातील सर्व भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दत्त जन्मोत्सव कमिटी, वाशी यांनी केले आहे.

कळंब प्रकल्पात अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांसाठी ऑनलाइन भरती प्रक्रिया सुरु

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प (ग्रामीण), कळंब अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या रिक्त पदांसाठी सरळसेवेने (डू छोळपरींळेप) भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. संबंधित गावातील स्थानिक पात्र महिला उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाइन अर्ज प्रक्रिया २४ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झाली असून, अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ डिसेंबर २०२५, सायं. ६.१५ वाजेपर्यंत आहे. अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून एक प्रत बाल विकास प्रकल्प अधिकारी, कळंब कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करणे आवश्यक आहे. कळंब प्रकल्पातील विविध गावांमधील एकूण १६ रिक्त पदांसाठी ही भरती होत आहे. यामध्ये - सेविका पदे : बारातेवाडी (२), देवळाली, मंगरूळ, मलकापूर, रत्नापूर. मदतनीस पदे : आथर्डी, बोरगाव, इटकुर, करंजकल्ला, खामसवाडी, निपाणी, बांगरवाडी, पानगाव, परतापूर, उमरा शैक्षणिक पात्रता : किमान इयत्ता बारावी उत्तीर्ण अट : उमेदवार स्थानिक रहिवासी महिला असणे अनिवार्य आहे. वयोमर्यादा : १८ ते ३५ वर्षे (विधवा उमेदवारांसाठी ४० वर्षे) इतर अट : जास्तीत जास्त दोन हयात अपत्य, जात, रहिवास व शैक्षणिक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे बंधनकारक आहे. अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवारांचे कागदपत्र पडताळणी करून नियुक्ती आदेश देण्यात येतील. रुजू न झाल्यास किंवा पद रिक्त झाल्यास प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी दिली जाईल. प्रतीक्षा यादी एक वर्ष वैध राहणार आहे.

भरती प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक असून कोणत्याही मध्यस्थाच्या भ्रमात न पडण्याचे प्रशासनाने आवाहन केले आहे. तसेच भरतीदरम्यान दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकार करण्याचा प्रयत्न केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

अणदूरमध्ये श्री खंडोबा यात्रेनिमित्त रंगतदार कुस्ती स्पर्धा : रोहन पवार आणि राहुल मुळे ठरले मानकरी

तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.२५ नोव्हेंबर -

अणदूर येथील ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रेनिमित्त देवस्थान समिती व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कुस्ती स्पर्धा शनिवार रोजी मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांना गावच्या पारंपरिक हलग्यांनी विशेष रंग भरला तर उपस्थित प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात पैलवानांनी सादर केलेल्या अप्रतिम डावपेचांनी संपूर्ण वातावरण कुस्तीमय झाले.

स्पर्धेच्या सुरुवातीला अनुदुर्व परिसरातील कुस्ती क्रीडेला आयुष्यभर योगदान देणारे स्व. मारुती खोबरे गुरुजी यांना स्मृतिपूर्वक अभिवादन करण्यात आले. या रंगतदार स्पर्धेत मोहोळचा पैलवान रोहन पवार याने पुण्याच्या शुभम माने यास चितपट करून देवराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बाबूराव चव्हाण यांनी जाहीर केलेल्या लाख रुपये पारितोषिकावर नाव कोरले.

तर अणदूरचा पैलवान राहुल मुळे याने प्रभावी डावपेचातून प्रतिस्पर्ध्याला चितपट करत गावचा मान उंचावला. त्याला स्व. नीलकंठप्पा आलुरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शामराव आलुरे यांनी जाहीर केलेल्या ५० हजार रुपयांच्या पारितोषिकाचा मान मिळाला. राहुलच्या विजयानंतर अणदूर ग्रामस्थांनी आनंदोत्सव साजरा केला.

जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणातील आखाड्यात झालेल्या या स्पर्धांचे उदघाटन श्री नीलकंठेश्वर मठाचे मठाधिपती श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते झाले. सरपंच रामचंद्र आलुरे, माजी सरपंच धनराज मुळे, तंटामुक्ती समिती उपाध्यक्ष कल्याणी मुळे, यात्रा कमिटीचे अविनाश मोकाशे, माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे आदी मान्यवर उपस्थित होते. राज्यभरातील मल्लांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. स्पर्धेचे समालोचन गोविंद घारगे यांनी केले.

स्पर्धेत पंच म्हणून पोलीस निरीक्षक विनोद घुगे, सिद्धाराम धमुरे, सुंदर जवळगे, मार्तंड मोकाशे, शिवाजी क्हाडे, मनोज मुळे, शाम गायकवाड, गुरुनाथ मिटकरे, आप्पा साखरे, प्रकाश मुळे यांनी जबाबदारी पार पाडली.

कुस्ती स्पर्धा यशस्वी पार पडण्यासाठी गावातील देणगीदार, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक तसेच युवकांनी मोठे योगदान दिले. पैलवानांच्या कुस्त्या देणगीदारांच्या हस्ते लावण्यात आल्या.

स्पर्धेला श्री खंडोबा यात्रा कमिटीचे पदाधिकारी, विविध समित्यांचे पदाधिकारी व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली. संपूर्ण दिवस रंगतदार कुस्त्यांनी गाजलेला अणदूरचा आखाडा हे यात्रेचे विशेष आकर्षण ठरले.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

लातूर मनपात कार्यशाळा; आयुक्तांचे मार्गदर्शन

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, २५ नोव्हेंबर : ई ऑफिस प्रणाली या विषयावर लातूर मनपात एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.आयुक्त श्रीमती मानसी यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

महानगरपालिकेतील सर्व प्रशासकीय कामकाज पूर्णपणे डिजिटल पद्धतीने, अधिक वेगवान आणि पारदर्शक बनवणे हा या कार्यशाळेच्या आयोजनामागचा उद्देश होता. ई-ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून फाईल प्रक्रिया, पत्रव्यवहार, मंजुरी प्रक्रिया नोंदी ठेवणे तसेच दस्तऐवजांचे डिजिटल व्यवस्थापन अधिक सुलभ व सुटसुटीत होणार आहे.

प्रारंभी आयुक्त श्रीमती मानसी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी ई ऑफिस प्रणालीची गरज, शासनाच्या डिजिटलायझेशन धोरणाची अंमलबजावणी तसेच नागरिकांना मिळणाऱ्या जलद आणि पारदर्शक सेवांची माहिती दिली.

यावेळी ऑफिस पोर्टलमध्ये लॉगिन व युजर व्यवस्थापन,नवीन फाईल तयार करून पाठवणे,ई नोटींग व इतर ड्राफ्टिंग, दस्तऐवज अपलोड व ट्रेकिंग,मंजुरी प्रक्रिया, डिजिटल पद्धतीने पूर्ण करणे,प्रलंबित फाईलसचे निरीक्षण व मॉनिटरिंग यांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

लातूरच्या वाहतूक समस्येवर उपाय आहे, पण अंमलात आणणार कोण..?

त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी

लातूर, २५ नोव्हेंबर : लातूर शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर-समस्येवर कधी एकदा कायमचा तोडगा-उपाय शोधला जातो आणि आपण या वाहतुकीच्या समस्येतून मुक्त होऊ? असा विचार या कारणामुळे दररोज मनःस्ताप सोसणाऱ्या प्रत्येक सुजाण लातूरकरांच्या मनात येतो. कोणत्याही प्रश्नाची - समस्येची उकल अंतःकरणातून करण्याचा निर्धार केल्याशिवाय ती समस्या पूर्णतः सुटू शकत नाही. याचा अर्थ आजपर्यंत या समस्येचे समाधान या माध्यमातून शोधण्याचा प्रयत्नच केला गेला नाही, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. मात्र, यावर एक नाही अनेक उपाय, पर्याय अंमलात येऊ शकतात. पण त्याच्या अंमलबजावणीसाठी पुढे होणार तरी कोण..? हा खरा प्रश्न आहे.

आजमितीस लातूरच्या मुख्य रस्त्यावरच नव्हे तर अगदी गल्ली बोळातही वाहतुकीची कोंडी होताना सर्रास पाहायला मिळते. सायंकाळच्या सुमारास तर वाहतुकीची कोंडी पाहून जीव अक्षरशः मेटाकुटीला येतो. यादरम्यान गंज गोलाईत वाहनांऐवजी पायी चालत जायचे म्हटले तरी अनेकांची हिंमत होणार नाही. वाहतुकीची कोंडी एवढी भयाण होते की, पायी चालणेही अवघड होऊन जाते. लातूरच्या या वाहतूक कोंडीवर अनेकांना पीएचडी. सुद्धा करता येईल असेही उपहासाने म्हटले जात असल्याचे अनेकदा ऐकावयास मिळाले आहे. ते वास्तवही आहे, याची प्रचिती अनेकांना आलेली आहेच.

शहरातील विविध भागात दिवसातून अनेकवेळेस वाहतुकीची कोंडी होते. वाहतूक अक्षरशः जाम होऊन जाते. अशावेळी रुग्णवाहिकेतून एखाद्या अत्यवस्थ रुग्णाला रुग्णालयापर्यंत पोहोचविणेही दुरापास्त होऊन जात असल्याचे अनुभवास आले आहे, याबाबतीत काहीच दुमत नाही. लातुरातील गंज गोलाई, छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजीव गांधी चौक, कन्हेरी चौक, वसंतराव नाईक चौक, औसा बाह्यवळण रस्त्यावरील छत्रपती चौक, पाच नंबर चौक, अहिल्यादेवी होळकर चौक अशा अनेक चौकात गर्दीच्या वेळी मुख्यतः दररोज सायंकाळच्या वेळेस एवढी वाहतुकीची कोंडी होते की विचारता सोय नाही. वाढत्या वाहतुकीच्या तुलनेत शहर वाहतूक पोलीस शाखेकडे आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध नाही, असे सांगण्यात येते. जे मनुष्यबळ उपलब्ध आहे त्यापैकी बहुतांश पोलीस कर्मचारी शहराच्या विविध भागात वाहनधारकांच्या कागदपत्रांची तपासणी, वसुली मोहिमेत व्यस्त असल्याचे पाहावयास मिळते. वसुली, मग ती शासकीय असते की निमशासकीय? याबद्दल स्पष्ट शब्दात न बोललेलेच बरे.

लातूर शहरातील वाहतूक समस्येत सिग्नलची भूमिकाही अतिशय महत्वाची आहे. शहरातील अनेक भागातील सिग्नल केवळ शोभेच्या बाहुलीसारखे आहेत म्हणायला आहेत, एवढ्यासाठीच असल्याचे वर्षानुवर्षे

पाहायला मिळते. शहरातील अनेक भागात अद्यापही सिग्नल्सची आवश्यकता आहे. परंतु कार्यक्षम (?) प्रशासन अशा मागण्यांकडे कधीही गांभीर्याने पाहत नसल्याचे दिसून येते. प्रशासन योग्य ती उपाय योजनाही करत नाही किंवा त्यासंदर्भात त्वरित काही निर्णयही घेत नाही, याला म्हणायचे तरी काय? असा प्रश्न आता सामान्य नागरिकांपुढे निर्माण होताना दिसतोय.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतुकीची कोंडी त्या ठिकाणी एखादा वा-

हतूक शाखेचा पोलीस कर्मचारी वाढवून दूर करता येऊ शकते. फक्त तेथे कोणत्या वेळेस कोणत्या रस्त्यावरून येणारी वाहतूक खुली करायची आणि कोणती वाहतूक रोखून धरायची याचे तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. औसा रोडकडून येणारी वाहतूक खुली केली की, अंबाजोगाई रस्त्याकडून येणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक विस्कळीत होणार नाही, अन्य वाहनचालक आपले वाहन मध्येच दामटण्याचा प्रयत्न करणार नाहीत याकडेही लक्ष देणे आवश्यक असते. त्याकरिता छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सिग्नल व्यवस्था अद्यावत करून त्या ठिकाणी मनुष्यबळ वाढविणे अतिशय गरजेचे आहे. एकही वाहन लाईन सोडून पुढे जाणार नाही, तसेच वाहनधारकांनी शिस्त पाळली पाहिजे यासाठीही वाहतूक शाखेने सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक बनल्याचे दिसून येते.

वाहतूक पोलीस कर्मचारी डोळ्यासमोर दिसत असतानाही ट्रिपल सीट जाणे, त्यांच्यासमोर विरुद्ध दिशेने बिनधास्तपणे निघून जाणे, सिग्नल्सची शिस्त न पाळणे, झेब्रा क्रॉसिंगच्या पुढे आरामात जाऊन थांबणे यासारख्या छोट्या छोट्या बाबींकडेही यापुढे गांभीर्याने पाहणे काळाची गरज बनल्याचे दृष्टीपथास येते. हा झाला मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा भाग. शहराच्या अंतर्गत वाहतुकीलाही अनेक अडथळ्यांची शर्यत पार पाडावी लागते. गंज गोलाईत तसेच शहराच्या

अन्य भागातही अगदी रस्त्यावर, काही ठिकाणी रस्त्याच्या अगदी मधोमध आपले फळांचे, अन्य साहित्याचे गाडे लावून विक्री करणाऱ्या विक्रेत्यांमुळेही अंतर्गत वाहतुकीची खूपदा कोंडी होताना दिसते. याबाबत उदाहरणादाखल सांगायचे झाल्यास लातूर शहरातील गांधी मार्केट भागातील भालचंद्र रक्तपेढीच्या कॉर्नरवर होणारी वाहतूक कोंडी.

याठिकाणी रस्त्यालगत काही हातगाडीवाले हक्काने रस्त्यावर आपला व्यवसाय करताना आढळतात. आपल्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होतेय, हे पाहूनही ते जराही हलायला तयार नसल्याचे अनेकदा पाहायला मिळते. अशावेळी त्रस्त वाहनधारक त्यांच्याकडे रागाने ते बाजूला व्हावेत व वाहतुकीला रस्ता खुला करून द्यावा या आशेने बघतात. पण, तरीही हे हातगाडीवाले त्यांच्याकडे ढुंकूनही पाहताना दिसत नाहीत. हा प्रकार अतिक्रमणाचा असला तरी त्यांना त्याकरिता प्रोत्साहित कोण करते, तीच मंडळी त्यांना बाजूला हटवू शकतात. पण, ती मंडळी कोणालाही का जुमानत नाहीत? हे न सुटणारे कोडेच आहे. शहरातील प्रत्येक रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले तर वाहतुकीची कोंडी पूर्णतः सुटण्यास मोलाची मदत मिळू शकणार आहे. ही बाब लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनाही चांगलीच माहिती आहे. पण कोणाचे ना कोणाचे हितसंबंध त्यात आड येतात, हे वास्तव आहे. नेपोलियन बोनापार्टने म्हटलेच आहे ना, जगात प्रयत्न केल्यास अशक्य काहीच नसते. अगदी तसेच लातूरच्या या वाहतूक व्यवस्थेचेही आहे. ही व्यवस्था सुरळीत होऊ शकते, फक्त आवश्यकता आहे ती अंतःकरणातून दूर करण्याची. फक्त त्या उपाय योजनांची सडेतोडपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

बिल न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू

■ १०६९ वीजग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडीत

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, २५ नोव्हेंबर : महावितरणने नोव्हेंबर महिन्याची व थकीत वीजबिलांची वसुली मोहीम

हाती घेतली असून गेल्या पंचेवीस दिवसात केवळ ६५ टक्केच वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यात यश मिळाले आहे. उर्वरीत पाच दिवसात महावितरणला २० कोटी २ लाख रूपयांची थकबाकी वसुली करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी आपल्या थकीत वीजबीलांचा भरणा करून सहकार्य करावे अन्यथा नाईलाजास्तव वीजपुरवठा खंडीत करण्याची कारवाई करावी लागेल असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणच्या लातूर मंडळासाठी वरिष्ठ कार्यालयाने लघूदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडील वीजबील वसुलीसाठी नोव्हेंबर महिन्याचे चालू बिलाचे ५८ कोटी १८ लाख व थकबाकीचे १०१ कोटी ९३ लाख असे एकत्रीत १६० कोटी ११ लाख रूपयांचे लक्ष्य निर्धारीत केले आहे. या लक्ष्याचा पाठलाग करत मागील २५ दिवसात केवळ ३७ कोटी ९८ लाख रूपयांची वीजबील वसुली झालेली आहे. हे प्रमाण खूपच कमी असून येणाऱ्या पाच दिवसात उर्वरीत थकबाकी सोडून चालू महिन्याचे २० कोटी २ लाख रूपयांची वसुली होणे महावितरणसाठी तारेवरची कसरत ठरणार आहे. वसुलीसाठी मंडळातील सर्व अधिकारी, कर्मचारी दारोदार फीरत आहेत, मात्र जिल्ह्यातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील वीजग्राहकांकडून फारसा सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसत नाही. त्यामुळे वीजपुरवठा खंडीत करण्याशिवाय महावितरणसमोर दुसरा पर्याय उरलेला नाही. वीजबील न भरल्यामुळे आजपर्यंत १०६९ वीजग्राहकांचा तात्पुरत्या स्वरूपात वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

लातूर मंडळा अंतर्गत येणाऱ्या लातूर विभागातील लघुदाब वर्गवारीच्या वीजग्राहकांकडे नोव्हेंबर महिन्याची ३२ कोटी २८ लाख थकीत असून कालपर्यंत २२ कोटी ४ लाख रूपये वसुली झाली आहे. निलंगा विभागातील वीजग्राहकांकडे ९ कोटी ६४ लाख थकीत असून कालपर्यंत ५ कोटी ७८ लाख रूपये वसुली झाली आहे. तर उदगीर विभागातील वीजग्राहकांकडे १६ कोटी २६ लाख थकीत असून कालपर्यंत १० कोटी १६ लाख रूपये वसुली झाली आहे. वसुलीचे हे प्रमाण आत्तापर्यंतचे अत्यल्प प्रमाण आहे. थकबाकीदार वीजग्राहकांना एसएमएस द्वारे, प्रत्यक्ष फोन करून तसेच वीजकायद्यान्वये रीतसर नोटीस कालावधी उलटूनही गेला तरीही वीजग्राहक बील भरण्यास दिरंगाई करत असल्याचे दिसून येत आहे. वीजबील भरण्यासाठी महावितरणने विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. या सुविधांचा लाभ घेत वीजग्राहकांना घरबसल्याही बील भरता येणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी त्वरीत वीजबीलाचा भरणा करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

नागरिकांनी मतदार यादीतील नावाची पडताळणी करून घ्यावी

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, २५ नोव्हेंबर : आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाच्या वतीने प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यात आलेली आहे. या मतदार यादीमध्ये एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात जोडल्या गेल्या असल्याच्या तक्रारी होत आहेत. याबाबत शहर जिल्हा भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने मनपा आयुक्तांची भेट घेऊन मतदार यादीची दुरुस्ती करण्याचे निवेदन दिलेले आहे. शहरातील नागरिकांनी आपआपल्या मतदार यादीत आपल्या नावाची पडताळणी करून घ्यावी असे आवाहन करून या प्रकरणी तक्रार असल्यास प्रशासनाशी किंवा पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाच्यावतीने प्रारूप

मतदार यादी जाहीर केलेली असून यामध्ये अनेक चुका झालेल्या असून वेगवेगळ्या प्रभागातील विविध मतदारांची नावे वेगळीकडे जोडली गेली आहेत. तसेच शहरा नजीक असलेल्या वेगवेगळ्या ग्रामपंचायत हद्दीतील मतदारांची नावे समाविष्ट झाली असल्याच्या तक्रारी येत आहेत. या मतदार यादीतील चुकांमुळे अनेक मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. मतदार यादीचे वाचन केल्यानंतर शहर जिल्हा भाजपच्या शिष्टमंडळाने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वात मनपा आयुक्त मानसी मिना यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. मतदार यादीतील या चुका दुरुस्त करण्याची मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर याबाबतच्या हरकती लवकरच प्रशासनाकडे दाखल करण्यात येतील असे सांगितले आहे. मनपा प्रशासनाने निवेदनाची व हरकतींची दखल घेऊन मतदार यादी दुरुस्त करावी अशी भूमिका शहर जिल्हा भाजपने मांडली आहे. याबाबत आयुक्त मानसी मिना यांनी सकारात्मक प्रतिसाद देत हरकती नुसार

शहर जिल्हा भाजपाच्या वतीने आवाहन

मतदार यादीमध्ये दुरुस्ती करण्यात येईल असे सांगून मतदानापासून कोणीही वंचित राहणार नाही असा विश्वास दिला.

मनपा प्रशासनाने मतदार यादी दुरुस्त करण्यात येईल असे सांगितले असले तरी शहरातील नागरिकांनी आपआपल्या मतदार यादीत आपल्या नावाची पडताळणी करून घ्यावी असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी लातूरकरांना केले आहे. मतदार यादीबाबत काही आक्षेप असल्यास तो प्रशासनाकडे दाखल करावा असे सांगून याबाबत शहर जिल्हा भाजपा पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट साठी डॉ. अंबुलगेकर, डॉ. गावडे यांची निवड

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, २५ नोव्हेंबर : येथील एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील एम.पी.टी.एच. प्रथम वर्षातील विद्यार्थींनी डॉ. ऋतुजा नागोराव अंबुलगेकर व डॉ. स्नेहल दिनकर गावडे यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी नुकतीच निवड झाली आहे. राज्यातील शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतून सदरील संशोधनासाठी ही निवड झाली आहे.

गेल्या एप्रिल २०२५ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी राज्यभरातील बी.पी.टी.एच. व एम.पी.टी.एच. फिजिओथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव मागवले होते.

त्यामध्ये एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी संशोधन कार्यासाठी प्रस्ताव पाठवले होते. यामध्ये

२५ पैकी एम.पी.टी.एच. प्रथम वर्षातील विद्यार्थीनी डॉ. ऋतुजा अंबुलगेकर व डॉ. स्नेहल गावडे या विद्यार्थीनीच्या प्रस्तावाची निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल डॉ. ऋतुजा अंबुलगेकर व डॉ. स्नेहल गावडे यांचे एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, मार्गदर्शक डॉ. रिशा कांबळे, डॉ. पराग नारायणकर, विभाग प्रमुख डॉ. गौरव भटनागर, डॉ. सिंगारा वेलन यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांतून अभिनंदन होत आहे.

मुख औषधशास्त्र, क्ष-किरण शास्त्रातील राष्ट्रीय चरक पुरस्कार डॉ. कुलकर्णी यांना प्रदान

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, २५ नोव्हेंबर : भारतीय दंत संघटनेची मुख्य शाखा मुंबई यांच्या वतीने दंत चिकित्सा शास्त्रातील उत्कृष्ट कार्यासाठी दिला जाणारा राष्ट्रीय चरक पुरस्कार (शाखा: मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र) येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र विभागातील सहयोगी प्रा. डॉ. अभय कुलकर्णी यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

भारतीय दंत संघटनेची मुख्य शाखा मुंबई यांच्या वतीने दंत शाखेतील वेगवेगळ्या विषयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दंत रोग तज्ज्ञांना राष्ट्रीय चरक पुरस्कार दिला जातो. सन २०२५ मधील या पुरस्कारासाठी देशभरातून नामांकन अर्ज प्राप्त झाले होते. त्यामध्ये मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र शाखेत डॉ. अभय

चिलीचे कॉन्सुल जनरल गुस्तोवो गोंझालेझ यांच्या हस्ते डॉ. कुलकर्णी यांना पुरस्कार

कुलकर्णी यांनी केलेली रुग्ण सेवा, संशोधन, विविध पुस्तकांचे लेखन, कॉपी राईट व तंबाखु नियंत्रणासाठी केलेले भरीव कार्य लक्षात घेऊन सलग दुसऱ्यांदा हा पुरस्कार त्यांना जाहिर झाला. मुंबई येथील जिओ कन्वेन्शन सेंटर येथे दि. ८ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या सोहळ्यात चिलीचे कॉन्सुल जनरल श्री गुस्तोवो गोंझालेझ यांच्या हस्ते हा पुरस्कार डॉ. अभय कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्य सचिव डॉ. अशोक ढोबळे, प्रभारी डॉ. दिपक माखीजानी हे उपस्थित होते.

डॉ. अभय कुलकर्णी हे गेल्या १२ वर्षापासून दंत शाखेतील मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र या विषयात कार्यरत आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा 'अविष्कार २३' हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. त्यांची दंत आरोग्य विषयात सहा पुस्तके प्रसिद्ध आहेत. दंत आरोग्य जागृतीसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड या भाषेत ही पुस्तके प्रकाशीत केली आहेत. त्यांचे राज्यस्तरीय २०, राष्ट्रीय ६, आंतरराष्ट्रीय ३ नियतकालीकात शोधनिबंध प्रसिद्ध असून १७ कॉपीराईट आहेत. नाविन्यपूर्ण उपकरणे व संशोधनासाठी ते नेहमी प्रयत्नशील असून तंबाखु विरोधी मोहिमेसाठी सुध्दा ते सातत्याने कार्यरत आहेत. या यशाबद्दल डॉ. अभय कुलकर्णी यांचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. विजयलक्ष्मी माले, डॉ. प्रियंका लासणे, डॉ. रोहिणी दिवेकर, डॉ. सायोज्यता बांगर यांच्यासह महाविद्यालयातील विविध विभागाचे प्रमुख शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.